
टॉलस्टॉय
यांच्याशी पत्रसंवाद



ग. प्र. प्रधान

टॉलस्टॉय यांच्याशी पत्रसंवाद

ग. प्र. प्रधान

साधना प्रकाशन

टॉलस्टॉय यांच्याशी पत्रसंवाद

लेखक : ग. प्र. प्रधान

प्रथम आवृत्ती : २० नोव्हेंबर २००६
लिओ टॉलस्टॉय यांचा स्मृतिदिन

प्रकाशक :
साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ,
पुणे ४११०३०.

अक्षर जुळणी व छपाई :
साधना प्रेस
४३१ शनिवार पेठ,
पुणे ४११०३०.

मुखपृष्ठ : शेखर गोडबोले
[मुखपृष्ठावरील व आतील छायाचित्र
'सकाळ - ग्रंथालय, पुणे' यांच्या सौजन्याने.]

किंमत : रु. ८०/-

अनुक्रम



...

मनोगत

लिओ टॉलस्टॉय हे जगद्‌विख्यात विचारवंत लेखक आणि १९व्या शतकातील थोर ऋषी. त्यांचे जीवन आणि त्यांचे लेखन यांचा गांधीजींच्यावर आणि जगातील अनेकांवर प्रभाव पडला. मी कॉलेजमध्ये शिकत असताना १९४० साली टॉलस्टॉय यांच्या 'ॲना कॅरिनीना', 'वॉर ॲण्ड पीस' आणि 'रिसरेक्शन्' या कादंबऱ्या वाचल्या. पुढे कॉलेजमध्ये अध्यापन करताना मी टॉलस्टॉय यांचे समग्र साहित्य आणि आल्मेर मॉड यांनी लिहिलेले त्यांचे चरित्र वाचले. १९७५ साली आणीबाणीत तुरुंगात असताना मी टॉलस्टॉय यांची 'कन्फेशन्स', 'व्हॉट देन् मस्ट वुई डू' ही पुस्तके आणि त्यांचे धर्म व नीतिविषयक विचार पुन्हा वाचले. टॉलस्टॉय यांच्या जीवनाचा आणि साहित्याचा परिचय तरुण वाचकांना करून द्यावा असे मला अनेक वर्षे वाटत होते. दोन वर्षांपूर्वी मी टॉलस्टॉय यांचे सर्व साहित्य पुन्हा वाचले. सुमती देवस्थळी यांनी लिहिलेले 'टॉलस्टॉय एक माणूस' हे पुस्तक मराठीत उपलब्ध असल्यामुळे वेगळ्या रीतीने त्यांचा परिचय कसा करून द्यावा याचा मी बरेच दिवस विचार केला आणि नंतर 'टॉलस्टॉय यांच्याशी पत्रसंवाद' अशी सोळा पत्रांची मालिका मी लिहिली. माझे मित्र, साप्ताहिक सकाळचे संपादक श्री. सदा डुंबरे यांनी ही पत्रमाला साप्ताहिक सकाळमध्ये प्रसिद्ध केली.


आज पुस्तकरूपाने 'टॉलस्टॉय यांच्याशी पत्रसंवाद' प्रसिद्ध होत आहे याचा मला फार आनंद वाटतो. या सोळा पत्रांच्या व्यतिरिक्त परिशिष्टामध्ये लेनिन यांनी टॉलस्टॉयवर लिहिलेल्या लेखाच्या श्रेष्ठ विचारवंत प्रा. दि. के. बेडेकर यांनी केलेल्या मराठी भाषांतराचा समावेश केलेला आहे. हा लेख मला उपलब्ध करून दिल्याबद्दल मी माझे

मित्र श्री. मधू वाणी आणि सौ. सुलोचना वाणी यांचे आभार मानतो. एक वर्षापूर्वी 'टॉलस्टॉय आणि गांधीजी यांची परलोकामध्ये भेट' हा लेख मी 'साधना' साप्ताहिकामध्ये लिहिला होता. त्या लेखाचाही मी परिशिष्टामध्ये समावेश केला आहे.

साप्ताहिक सकाळचे संपादक श्री. सदा डुंबरे यांनी लेखांचे पुस्तक काढावे हे आग्रहाने सुचविले. पुस्तकाच्या निर्मितीसाठी साहाय्य करणारे 'साधना'चे संपादक डॉ. नरेंद्र दाभोलकर, कुमुद करकरे, सत्यजित वैद्य तसेच साधनातील व महाराष्ट्र सहकारी मुद्रणालयातील सर्व सहकारी आणि मुखपृष्ठकार शेखर गोडबोले यांचा मी आभारी आहे.

ग. प्र. प्रधान

•



१. महर्षी लिओ टॉलस्टॉय यांच्याशी पत्रसंवाद

आदरणीय लिओ टॉलस्टॉय,

सादर प्रणाम.


आपल्या ललित लेखनावर लुब्ध झालेला एक वाचक आणि आपल्या जीवनविषयक चिंतनाने आणि विविध समस्यांवरील आपल्या विचारांनी प्रभावित झालेला एक कार्यकर्ता, म्हणून मी आपणास काही पत्रे लिहिणार आहे. मी महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात १९४२मध्ये भाग घेतला. त्यांचा अल्पसा सहवासही मला लाभला. गांधीजींच्या विचारांनी मी प्रभावित झालो आणि त्यांच्या काही विचारांप्रमाणे आचरण करण्याचाही मी प्रयत्न केला. मला गुरुस्थानी असणाऱ्या म.गांधींना आपल्या जीवनापासून आणि विचारांतून काही बाबतीत प्रेरणा लाभली; म्हणजे आपण माझ्या गुरूंचे गुरू. गांधीजी दक्षिण आफ्रिकेत असताना त्यांनी कार्यकर्त्यांना एकत्र राहण्यासाठी जी वसाहत निर्माण केली होती तेथे सर्वजण नियमाने शारीरिक श्रम करीत. स्वच्छता, स्वयंपाक आदी कामे आळीपाळीने करीत. या वसाहतीस गांधीजींनी 'टॉलस्टॉय फार्म' हे नाव दिले होते; कारण तेथे सर्वजण आपल्या शिकवणुकीनुसार आचारण करीत होते, हे आपणास विदित आहेच. गांधीजी तेथे राहात असताना आपणास पत्रे लिहीत आणि आपणही त्यांना उत्तर लिहून मार्गदर्शन करीत होतात.

मला आपला सहवास लाभला असता, आपणाशी बोलायला मिळाले असते, तर ते माझे परमभाग्य झाले असते, परंतु आपले निधन झाल्यानंतर माझा जन्म झाला, त्यामुळे ते शक्य झाले नाही. असे असले तरी आपले व्यक्तिमत्त्व आणि विचार स्थलकालातीत आहेत; त्यामुळे आपण आज हयात नसलात तरी माझ्यासारख्या साधकाला आपणापासून प्रकाश मिळतो आणि चैतन्यही लाभते. त्यामुळेच मी आपणाशी हा

पत्रव्यवहार करणार आहे. आपणास जगातून अनेकजण पत्रे लिहीत असत आणि आपण सर्व पत्रांची दखल घेऊन, बऱ्याच पत्रांना उत्तरे लिहीत होतात. हे माहीत असल्यामुळेच मी यापुढे आपणास दर आठवड्याला एक पत्र लिहिणार आहे. आपल्या उदात्त जीवनाशी माझा जो भावबंध आहे, त्यामुळेच मला हे करावेसे वाटते. या पत्रांमुळे हा भावबंध अधिक दृढ होईल आणि माझ्या जीवनाच्या या संध्यासमयी तो मला मोठा आधार वाटेल.

आपला नम्र,

ग. प्र. प्रधान



२.

मानवी जीवनाचं चैतन्यपूर्ण दर्शन

आदरणीय लिओ टॉलस्टॉय,
सादर प्रणाम.

आपणाशी माझी पहिली भेट आपल्या 'रिकलेक्शन्स' या लहानशा पुस्तकातून झाली. १९४० मध्ये मी ज्युनिअर बी.ए.च्या वर्गात विद्यार्थी होतो आणि इंग्रजी साहित्य हा माझ्या अभ्यासाचा खास विषय होता. कॉलेजच्या ग्रंथालयातून 'रिकलेक्शन्स', तसेच 'चाइल्डहुड', 'ॲडोलेसन्स', 'यूथ' अशी एकत्र असलेली आत्मकथनात्मक कादंबरी-त्रयी आणि 'कोझॅक्स' ही कादंबरी, अशी आपली पुस्तके मी घेऊन आलो. 'कोझॅक्स' वाचण्यापूर्वी आपल्या जीवनाची ओळख करून देणाऱ्या 'रिकलेक्शन्स' आणि आत्मकथनपर कादंबरी-त्रयीकडे मी वळलो. आपल्या बालपणीच्या आठवर्णीत 'रिकलेक्शन्स'मध्ये आपण आपल्या आईसंबंधी लिहिले आहे, की आपण दीड वर्षांचे असतानाच तिचे निधन झाले आणि घरात तिचा फोटोही नव्हता. आपण ती लिहीत असलेली रोजनिशी आणि तिची काही पत्रे वाचली, तेव्हा त्यांमधून तिची दोन वैशिष्ट्ये व्यक्त झालेली आपल्याला जाणवली, ती म्हणजे तिची नम्रता आणि त्याचवेळी, आपण योग्य रीतीने वागत असलो तर कोण काय म्हणतात, याकडे लक्ष न देण्याची तिची वृत्ती. आपण लिहिले आहे, 'माझी आई मला मुळीच आठवत नाही. पण माझ्या मनात आईची एक चैतन्यमय मूर्ती आहे.' आपल्या वडिलांच्या व्यक्तिचित्रामध्ये आपण त्यांचा शिकारीचा छंद आणि स्वतःच्या शेतीकडे त्यांचे दक्षतेने असलेले लक्ष, यांचा उल्लेख केला आहे. मात्र माझ्या आजही लक्षात आहे ती आपली दूरची आत्या-आपल्या कुटुंबातच राहणारी आणि आपल्याला प्रेमाने वाढविणारी, आँट तातिआना. या आत्याच्या मायेच्या सावलीत आपले बालपण सुखात गेले. आपण आपल्या आठवर्णीमध्ये लिहिले

आहे, 'माझ्यावर तातिआना आत्याचा फार प्रभाव होता. तिने शब्दांनी कधी मला उपदेश केला नाही. शिकविले नाही; पण तिच्या व्यक्तिमत्त्वातूनच, इतरांवर प्रेम करण्यात आत्मिक आनंद मिळतो, हे मी शिकलो. त्याचबरोबर शांतपणे, संथ लयीत जगण्यातला आगळा आनंद हा मला तातिआना आत्यामुळेच उमगला.'

आपल्या लहानपणी रशियामध्ये काही अर्धवट चक्रम बैरागी, साधू, एका पवित्र ठिकाणाहून दुसऱ्या पवित्र क्षेत्राकडे असे हिंडत असत, आणि असे अनेकजण आपण राहत असलेल्या यास्नाया पोल्यानातील आपल्या घरीही येत असत. आपण आपल्या आठवणींमध्ये लिहिले आहे, की तातिआना आत्या त्यांना प्रेमाने आणि आदराने वागवीत असे. याचाही परिणाम आपल्यावर झाला. या बैराग्यांची सुखी जीवनाबद्दलची अनास्था पाहून आपल्याला आश्चर्य वाटे आणि त्यांच्याबद्दल आदरही वाटत असे. त्याचप्रमाणे एकदा आपल्या माळ्याच्या हाताखाली काम करणारा अकिम प्रार्थना म्हणत असताना आपण ती ऐकली आणि आपण स्तिमित झाला होतात. तो अर्धवट माणूस परमेश्वराला उद्देशून 'तूच माझा त्राता आहेस,' असे जणू जिवंत माणसाशी बोलावे, अशा आर्ततेने ती प्रार्थना म्हणत होता. एरवी वेडाबागडा दिसणारा अकिम देवाशी बोलत असताना गंभीर, प्रगल्भ माणूस दिसत होता, असे आपण लिहिले आहे. प्रार्थनेत एक आगळी शक्ती आहे, असा विचार त्यावेळी आपल्या मनात चमकून गेला. आपले तीन भाऊ– निकोलस, दिमित्री आणि सर्जी. या सर्वांमध्ये सर्जीबद्दल आपल्याला एक उत्कट अनामिक ओढ वाटत असे आणि त्याचे अनेक बाबतींत अनुकरण करावे, असेही वाटे. एकूणच एका सधन जमीनदार कुटुंबात वाढत असताना आपले बालपण सुखात गेले. 'चाईल्डहुड' या आत्मकथनात्मक कादंबरीत आपण लिहिले आहे, ''बालपणातील ते मुक्त आनंद, ती निरागस वृत्ती परत आयुष्यात कधी तरी येईल का? शैशवात जसा निर्मळ आनंद असतो, त्याचप्रमाणे आपल्याला सगळ्यांचे प्रेम मिळावे, असेही वाटत असते. लहानपणी आपल्या कोमल अंत:करणामुळे अनेकदा जे अश्रू येतात, त्यांच्याइतके सुंदर दुसरे काही असू शकेल का?''

पौगंडावस्थेची सुंदर ओळख

आपल्या आत्मकथनात्मक कादंबरीतील 'ॲडोलेसन्स' ही दुसरी कादंबरीही मला फार आवडली होती. वाढत्या वयात घोडागाडीत बसून

आपण जो पहिला– काहीसा दूरचा प्रवास केला, त्या प्रवासात आपल्याला मिळालेल्या आनंदाचे वर्णन मला अद्यापही आठवते. जंगलातून जाताना झाडांच्या पूर्वी न अनुभवलेल्या वासामुळे, वाऱ्यावर डोलणाऱ्या, वनवासी फुलांमुळे निसर्गातील रूप आणि गंध यांचा स्पर्श आपल्या मनाला कसा झाला आणि आपल्या चित्तवृत्ती कशा उल्हसित झाल्या, यांचे वर्णन बहारीचे आहे. आपल्या तेरा-चौदाव्या वर्षी एकदा घरात काम करणाऱ्या बाईची उघडी मान पाहून आपल्याला स्त्रीच्या शरीराबद्दल वाटलेल्या आकर्षणामुळे आपले मन एकदम बावरून कसे गेले, ते आपण प्रांजळपणे लिहिले आहे. त्या वयातील भावाभावांतील भांडणे, धुसफूस, अबोले आणि परत सहज होणारी दिलजमाई या साध्यासुध्या गोष्टींचे वर्णन करताना आपण पौगंडावस्थेतील मुलांच्या मनाची सहजसुंदर ओळख करून दिली आहे. आपण 'ॲडोलेसन्स'मध्ये आणि 'रिकलेक्शन्स'मध्येही एका गोष्टीचा उल्लेख केला आहे, तो म्हणजे आपण कुरूप आहोत, आपले नाक बसके आहे; या जाणीवेमुळे आपल्याला होणारे तीव्र दु:ख आणि त्यामुळे आपल्या देखण्या भावाचा आपल्याला वाटणारा हेवा. या कुरूपपणामुळे खंतावणाऱ्या आपल्या मनाला आपली कोणी थोडी जरी स्तुती केली तरी कसा आनंद होत असे, हेही आपण लिहिले आहे. या सर्वांमधून पौगंडावस्थेतील मुलाच्या शरीरातील आणि मनातील सूक्ष्म बदलांचे जे वर्णन 'ॲडोलेसन्स'मध्ये आपण केले आहे, ते अठरा-एकोणिसाव्या वर्षी वाचताना पाच-सहा वर्षांपूर्वी मी अगदी असाच होतो, हे आठवून मी आपल्या आत्मकथनावर एकदम लुब्ध झालो. मात्र या कादंबरी-त्रयीतील 'यूथ' ही तिसरी कादंबरी आज मला आठवतही नाही.

'रिकलेक्शन्स'मध्येही आपण आपल्या महाविद्यालयीन जीवनाबद्दल अगदी त्रोटकपणे लिहिले आहे. मॉस्को विद्यापीठात आपण शिकत होतात; परंतु तेथील शिक्षणात आपले मन रमले नाही, असे आपण लिहिले आहे. आपण ज्ञानोत्सुक होतात आणि आपण विविध विषयांवरील ग्रंथ वाचले, काही पौर्वात्य भाषांचा अभ्यासही केला. आपण कायद्याच्या अभ्यासास सुरुवात केली, परंतु विद्यापीठात जे शिकविले जात होते, त्यात आपल्याला रस वाटेना. त्यामुळे कसलीही पदवी न घेताच आपण विद्यापीठ सोडले. अवांतर वाचन करतानाच आपण गॉस्पेलसूमधील 'सरमन ऑन दि माऊंट' वाचले. रूसोचे 'कन्फेशन्स' हे आत्मकथनपर पुस्तक आणि 'एमिली' हे पुस्तक, तसेच डिकन्सची

'डेव्हिड कॉपरफील्ड' ही कादंबरी, गोगोल व पुष्किन या नामवंत रशियन लेखकांचे साहित्य आपण वाचले. रूसोचे साहित्य वाचून काही काळ आपण त्यांचे भक्तच बनला होतात, असे 'रिकलेक्शन्स'मध्ये आपण लिहिले आहे. आपण मॉस्को विद्यापीठात शिकत असताना आपल्या रोजनिशीत जे लिहिले आहे, त्यावरून आपल्या तरुणपणातील जीवनक्रमाची कल्पना येते. १८४७ साली ज्या वेळी आपण विद्यापीठ सोडले, त्या वेळी काही दिवस आजारी असताना आपण कझान येथील हॉस्पिटलमध्ये होतात. तेथील वास्तव्यात आपल्या रोजनिशीत आपण असे लिहिले आहे, की त्या ठिकाणी एकटे असताना विचार करता करता आपल्याला ही जाणीव झाली, की मॉस्कोमध्ये उच्चभ्रू समाजात वावरत असताना आपल्या हातून जे प्रमाद घडले, ते केवळ तरुण वयातील मोहवशतेमुळे केलेले नव्हते, तर वस्तुत: आपल्या मनाचा जो नैतिक अध:पात झाला होता, त्यामुळे ते सारे घडले होते. आपल्या रोजनिशीत त्याच वेळी आपण असेही लिहिले आहे, की जीवनाचा– केवळ व्यक्तीच्या जीवनाचा नव्हे– सर्वांगीण परिपूर्ण विकास व्हावा, यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करण्याचे उद्दिष्ट ठेवून जगले पाहिजे. आपण रोजनिशीत स्वत: पाळावयाचे काही नियमही लिहिले आहेत. मात्र त्या नियमांप्रमाणे आचरण करणे आपल्याला किती जमू शकले, हे मात्र लिहिले नाही.

आपल्या रोजनिशीतील हा सर्व भाग वाचताना आपल्या त्या वेळच्या मन:स्थितीची कल्पना येते. आपण सतत मोहाला बळी पडत होतात आणि नंतर मात्र आपले मन पश्चात्तापाने दग्ध होत असे. आपल्या रोजनिशीतून आपण वारंवार परमेश्वराची प्रार्थना करून परमेश्वराने आपल्याला सद्वर्तनी होण्यासाठी साहाय्य करावे, याकरिता त्याची करुणा भाकीत होतात, हे कळले. त्या काळच्या रशियातील बहुतेक सर्व श्रीमंत तरुणांप्रमाणे आपण वेश्यागमनही केले होते आणि नंतर दुबळेपणाने मोहाला बळी पडल्याबद्दल आपले मन कमालीचे दु:खीही झाले होते. आपण पैसे लावून पत्ते खेळत असताना नेहमी हरत होतात आणि तरीही जुगार खेळण्याचा मोह आपल्याला कधी आवरता आला नाही. जुगारात हरल्यामुळे झालेले कर्ज फेडण्यासाठी आणि त्याच वेळी देशाच्या उपयोगीही पडावे, या भावनेने आपण सेनादलात जायचे ठरविले. त्या निर्णयानुसार सेनेत दाखल झाल्यावर सैन्यात अधिकारी असलेले आपले

थोरले बंधू निकोलस यांच्यासमवेत १८५१च्या मे महिन्यात, वयाच्या तेविसाव्या वर्षी आपण कॉकेशसकडे प्रयाण केले.


जीवघेणा संघर्ष व काव्यात्मता

कॉकेशसमधील आपल्या अनुभवावर आधारलेली 'कोझॅक्स' ही कादंबरी मी प्रथम वाचली, तेव्हा आदिम जीवनातील जीवघेणा संघर्ष आणि काव्यात्मता यांचा आगळा मिलाफ असलेल्या त्या कादंबरीमुळे मी भारावून गेलो होतो. अलीकडेच 'कोझॅक्स' पुन्हा वाचतानाही माझे मन आपल्या ललित लेखनावर आणि त्यातील मानवी जीवनाच्या चैतन्यपूर्ण दर्शनावर पूर्वीसारखेच लोभावून गेले. कॉकेशस पर्वताच्या परिसरात राहताना आपल्याला तेथील लोकांच्या जीवनाचे जे दर्शन घडले, त्याचे चित्रण 'कोझॅक्स'मध्ये आपण केले आहे. 'कोझॅक्स'चा नायक ओलेनिन हा आपणासारखाच श्रीमंत जमीनदार कुटुंबातला आहे. त्यानेही मॉस्कोतील धनिक फॅशनेबल समाजात ख्यालीखुशालीत अनेक दिवस घालवले आहेत. आपणाप्रमाणेच ओलेनिनही अभ्यासक्रम सोडून सेनेत दाखल झाला होता आणि कॉकेशसकडे निघालेला होता. प्रवासात ओलेनिन मॉस्कोपासून जसजसा दूर जातो, तसतसे त्याचे मन जुन्या पाशांतून मुक्त होत होते आणि एक अननुभूत अशा चैतन्याचा स्पर्श त्याच्या मनाला होऊ लागला होता. त्याच्या घोडागाडीच्या तार्तर ड्रायव्हरने ज्या वेळी त्याला 'आता आपण कॉकेशस पर्वताजवळ आलो' असे सांगितले, त्या वेळी ओलेनिनने मोठ्या उत्सुकतेने आकाशाकडे पाहिले; परंतु त्या संध्याकाळच्या वेळी त्याला केवळ सगळीकडे ढग पसरलेले दिसले. दुसऱ्या दिवशी प्रात:काळी सूर्यकिरणांनी न्हालेली उत्तुंग हिमशिखरे त्याला दिसली, तेव्हा तो मंत्रमुग्ध होऊन एकसारखा त्यांच्याकडे पाहातच राहिला. घोड्यावर बसून जाणारे दोन कोझॅक तरुण त्याला दिसले. टेरेक नदीला वळसा घालून ओलेनिनची गाडी जात होती. बरेच अंतर ओलांडल्यावर तो नोव्होम्लिन्स्क या गावात थांबला. त्याच्या पलटणीच्या मुख्यालयाने त्याची तेथे राहण्याची व्यवस्था केली होती. या लहानशा कादंबरीत आपण कोझॅक्स लोकांच्या जीवनाचे केलेले वास्तव वर्णन चित्तवेधक आहे; परंतु त्यापेक्षा मला आवडले, ते ओलेनिनच्या मनोभावनांचे आपण केलेले चित्रण. कॉकेशस पर्वताच्या कुशीत वसलेल्या त्या गावात राहताना ओलेनिन त्याच्या पूर्वायुष्याचा कधी कधी विचार करतो आणि तथाकथित सुधारलेल्या जगापासून दूर आल्यावर

त्याच्या मनाला एक अनामिक शांतता का व कशी लाभली, हे त्याला उमगत नाही. इतरांवर प्रेम केल्यामुळेच खरे सुख मिळू शकेल, हाही विचार एकदा त्याच्या मनात येतो आणि हे सत्य नव्याने गवसल्यामुळे त्याचे मन प्रफुल्लित होते. ओलेनिनला त्याच्या पलटणीत नियमाने करावयाचे असे कोठलेच काम नसल्यामुळे, तो शांतपणे त्या लहानशा गावात राहात असतो. या कादंबरीचे कथानक लुकाष्का हा साहसी कोझॅक तरुण, ज्यांच्या घरात ओलेनिन राहत होता, त्यांची तरुण मुलगी, लुकाष्काची वागदत्त वधू मारिआंका आणि ओलेनिन या तिघांभोवती आपण सहजतेने गुंफलेले आहे. त्या भागातील शिकारीचे आणि कोझॅक तरुणांचे टेरेक नदीपलीकडच्या भागात राहणाऱ्या लोकांशी होणाऱ्या जीवघेण्या संघर्षाचे आपण वर्णन केले आहे. त्याचबरोबर शेतात आणि घरातही सारख्या कष्ट करणाऱ्या आणि द्राक्षांचे मळे पिकवून द्राक्षांची दारू बनविणाऱ्या कोझॅक स्त्रियांच्या कणखर जीवनाचेही वास्तव दर्शन आपण त्या कादंबरीत घडविले आहे. मॉस्कोच्या कृत्रिम सुखलोलुप समाजात लहानपणीची काही वर्षे घालवलेल्या ओलेनिनला, कॉकेशसच्या परिसरातील राकट निसर्गाचाच एक भाग बनलेल्या कोझॅक लोकांच्या जीवनात चैतन्य झुळूझुळू वाहत आहे, असे वाटते. ओलेनिन सुरुवातीस मारिआंकाकडे ग्रीक शिल्पाचे सौंदर्य असलेली कोझॅक तरुणी म्हणून तटस्थपणे पाहतो; पण नंतर तिच्याबद्दलच्या वाढत्या आकर्षणामुळे तो तिच्या प्रेमात पडतो. तेव्हा ओलेनिनला त्याच्या आयुष्यात निर्मळ प्रेमभावनेचा प्रथमच खराखुरा प्रत्यय येतो. अल्पकाळ प्रेमाची ही सफलता तो अनुभवीत असतानाच लुकाष्काच्या मृत्यूनंतर मारिआंकाच्या मनातील ओलेनिनबद्दलची प्रेमभावना लुप्त होऊन तिला त्याच्याबद्दल तीव्र दुरावा वाटू लागतो. तो तिने एका तुटक वाक्यात व्यक्त करताच, आपण या भूमीत उपरे आहोत, ही जाणीव होऊन ओलेनिन ते गाव सोडून त्याच्या पलटणीकडे निघून जातो. आज ही कादंबरी वाचताना आपल्या कादंबरीतील प्रेमाच्या त्रिकोणापेक्षा कॉकेशसमधील कोझॅक लोकांच्या आदिम जीवनाचे आपण जे चैतन्यपूर्ण दर्शन घडविले आहे, त्याच्यामुळेच माझे वाचक म्हणून आपणाशी कायमचे नाते जोडले गेले.

आपला नम्र,

ग. प्र. प्रधान



३.

युद्धाला सामोरे जाताना...

आदरणीय लिओ टॉलस्टॉय,
सादर प्रणाम.

मी पाठविलेल्या पत्राला आपले छोटेसे उत्तर आले आणि आपण पत्रव्यवहार चालू ठेवण्यास मला संमती दिली; यामुळे जो आनंद झाला तो व्यक्त करण्यास माझ्याकडे पुरेसे शब्द नाहीत. आपल्या ललित लेखनातील काव्यात्मता आणि आदिम जीवन यांच्या संगमामुळे मी भारावून गेलो, याबद्दल आपण लिहिले आहे, 'बावीस-तेविसाव्या वर्षी असे काव्यात्म लेखन आवडणे स्वाभाविक असले, तरी ऐंशी वर्षे ओलांडल्यानंतर मन थोडेबहुत प्रगल्भ झालेच पाहिजे.' मी नम्रपणे इतकेच लिहितो की, 'आपल्याला लहानपणापासून संगीत आवडत असे. बिथोवनच्या सिंफनी आपल्या पियानो वादनातून ऐकल्याचे आपल्या मित्रांनी लिहिले आहे. आयुष्याच्या अखेरीपर्यंत आपण नादलुब्ध होतात. माझ्याकडे ही रसिकता नाही. मात्र तेरा-चौदाव्या वर्षी ललित साहित्याने मला जो आनंद लाभला तो आजही मी अनुभवतो आणि हे अप्रगल्भतेचे लक्षण आहे, असे मला वाटत नाही. आपल्या वैचारिक भूमिकेबद्दल मला नितांत आदर आहे. त्याचबरोबर, आपण एक असामान्य कलावंत, लेखक आहात आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या त्या दैदिप्यमान पैलूवरही मी उत्कट प्रेम करतो.

वाचक ज्या परिस्थितीत एखादे पुस्तक वाचतो, ती परिस्थिती आणि त्या पुस्तकातील विषय आणि वातावरण एकच असेल, तर वाचक त्या पुस्तकाशी पूर्णपणे तल्लीन होऊन जातो. १९४४ मध्ये दुसरे महायुद्ध चालू होते. हिटलरने रशियावर आक्रमण केले होते आणि रशियन सैनिक व नागरिक प्राणपणाने आपल्या मातृभूमीचे रक्षण करीत होते. जर्मन सैनिकांनी सुरुवातीस जेव्हा मुसंडी मारली, तेव्हा रशियन सैनिक 'दग्धभू' धोरण स्वीकारून जर्मनांच्या ताब्यात जाणारा रशियन मुलुख जाळून-

पोळून उद्ध्वस्त करून नंतरच माघार घेत. त्यानंतर स्टालिनग्राडच्या सरहद्दीवर जर्मन तोफखान्याचा मारा सुरू झाला. जर्मन विमाने बाँबवर्षावही करीत होती आणि रशियन सैनिक जर्मनीच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देत होते. वृत्तपत्रांमध्ये या बातम्या वाचताना मी प्रक्षुब्ध होत असे, कारण मी कडवा फॅसिस्ट विरोधक होतो. साम्राज्य लालसेमुळे हिटलरने जगाचा विनाश आरंभला होता, याबद्दल माझ्या मनात तीव्र संताप होता. हिटलरच्या विरोधात रशिया व इंग्लंड यांची आघाडी असताना मी एकाच वेळी रशियाचा समर्थक आणि ब्रिटिश साम्राज्याचा विरोधक होतो. युद्धाच्या ज्वाळांमध्ये जग होरपळून निघत असताना आणि स्टालिनग्राडची लढाई चालू असताना मी आपले 'रिकलेक्शन्स ऑफ सेव्हॅस्टोपोल' वाचायला घेतले. ते वाचताना जणू स्टालिनग्राडच्या संरक्षणार्थ रक्त सांडणारे रशियन लोक आणि रशियन सैन्य मला माझ्या अंत:चक्षूंसमोर दिसत होते. काही दिवसांपूर्वी हेच पुस्तक मी पुन्हा वाचले; त्यावेळी मात्र माझी मन:स्थिती वेगळी होती. मध्यंतरीच्या काळात मी वार्ताहर म्हणून १९६५ मध्ये झालेल्या भारत-पाक युद्धामध्ये जम्मू-काश्मीरमधील रणभूमी आणि १९७१ मध्ये बांगला देश मुक्तिसंग्रामाच्या वेळी बांगला देशातील युद्धभूमी जवळून पाहिली होती आणि युद्ध हे किती अमानुष असते, हे माझ्या लक्षात आले होते. आजच्या अण्वस्त्रांच्या युगामध्ये युद्ध झाले तर मानवजात नष्ट होईल, हे समजत असल्यामुळे मी पूर्णपणे युद्धविरोधी आहे. तरीदेखील 'रिकलेक्शन्स ऑफ सेव्हॅस्टोपोल' हे आपले पुस्तक मी पुन्हा वाचले. आपण स्वत: त्यावेळी रशियन सेनेत अधिकारी होतात आणि क्रिमिअन युद्धात सेव्हॅस्टोपोलच्या रक्षणासाठी रशियाने केलेल्या लढाईत आपण सहभागीही झाला होतात. मात्र या पुस्तकात मातृभूमीवर उत्कट प्रेम असलेल्या आपल्या एका सेनाधिकाऱ्याच्या मनाला युद्धज्वराचा स्पर्शही झालेला नव्हता, हे पानोपानी जाणवले आणि मला आपल्याबद्दल अतिशय आदर वाटला.

पुस्तकाच्या सुरुवातीस आपण लिहिले आहे, 'पहाटेचा स्पर्श समुद्राला होत होता. लाटांच्या मर्मरध्वनीमुळे सकाळच्या शांततेचा थोडा भंग होत होता आणि मधूनच तोफेच्या धडाडण्याचाही आवाज ऐकू येत होता.' आपण पुढे लिहिले आहे, की 'सेव्हॅस्टोपोलला आल्यावर तेथील वातावरणाच्या प्रथम दर्शनाने आपला अपेक्षाभंग झाला; कारण लढाईतून निर्माण होणारा तणाव, मृत्यूला सामोरे जाताना दिसणारा निर्धार किंवा

जीवनाच्या रामरगाड्यात गुंतलेले सैनिक पाहताना आपल्या मनात आधी असलेला उत्साहाचा आवेग ओसरून गेला. एका जखमी सैनिकाशी बोलताना आपण त्याची प्रेमाने चौकशी केली. त्या वेळी एक पाय तोडलेला तो सैनिक शांतपणे म्हणाला, "सहा आठवडे होऊन गेले, आता थोड्याच दिवसांत मला हॉस्पिटलमधून बाहेर पाठवतील." दुसरा मृत्युशय्येवरील सैनिक, "छातीत फार जळजळ होते", असे अस्पष्ट बोलला आणि जवळची नर्स आपल्याला म्हणाली, "त्याची अवस्था फार वाईट आहे." इस्पितळातील ते जखमी सैनिक पाहताना, त्या खोलीतील ते विव्हळणे ऐकताना आपल्याला वाटले, की यांच्या मानाने माझ्या वाट्याला येणारी दु:खे किती निरर्थक आहेत आणि आपल्याला अपराधी वाटू लागले. दुसऱ्या एका सैनिकाजवळ आपण गेलात, तेव्हा डोळे मिटत थरथरत्या आवाजात तो म्हणाला, "गुड बाय ब्रदर्स." हे ऐकताना आपल्या चेहऱ्यावर दिसणारी वेदना पाहून एक अधिकारी म्हणाला, "हे दररोज चाललेलं आहे. सात-आठ जण तरी जातातच."

नंतर आपण प्रत्यक्ष रणभूमीवर असताना शत्रुपक्षाच्या बंदुकांतून सुटणाऱ्या गोळ्या सूंऽसूंऽ करीत जवळून जात असतात आणि तरीही आपण शांत असता. आपल्या मनाचे जणू उन्नयन झालेले असते आणि आपली खात्री पटलेली असते, की युद्ध कितीही भीषण असले तरी रशियन सैनिकांचे नीतिधैर्य कधी खचणार नाही. अलीकडेच हे वाचत असताना मला आठवले, की साठ वर्षांपूर्वी आपल्या पुस्तकातील हा परिच्छेद वाचताना माझ्या डोळ्यांसमोर स्टालिनग्राडच्या संरक्षणासाठी प्राणाहुती देणारा रशियन सैनिक उभा राहिला होता. आपण त्या प्रकरणाच्या शेवटी लिहिले आहे.' 'आणि आजचा दिवस सरला आहे... क्षितिजावरून सूर्य अस्ताला जात आहे आणि तोफांचा धडधडाट थांबला आहे." हे वाक्य वाचताना मला महाभारताच्या युद्धपर्वातील दिवस संपताना महर्षी व्यासांनी अगदी असेच जे लिहिले होते, त्याची आठवण झाली.

'सेव्हॅस्टोपोल रिकलेक्शन्स डिसेंबर १८५४' मध्ये आपण भोवतालच्या सर्व लहान-लहान घटनांचे वर्णन करीत त्या रणभूमीचे वास्तव चित्र रेखाटले आहे. सेनेतील एक अधिकारी दुसऱ्या अधिकाऱ्याला म्हणतो, "येथे पीटर्सबर्गप्रमाणेच चहा, ब्रेड, लोणी आहे. जवळच पियानोही आहे. किती विसंगत आहे हे भोवतालच्या वातावरणाशी!" दुसरा अधिकारी म्हणतो, "पण तोफखान्यावरील आपले

अधिकारी सैनिकांबरोबरच राहतात, जेवतात, आठ-आठ दिवस त्यांना आतले कपडेही बदलायला मिळत नाहीत. ते सैनिक, ते अधिकारी हे खरे 'हीरो.' त्याचवेळी दुसरा अधिकारी सांगतो, ''आपण जिथं राहतो तिथे बहुधा आज रात्री शत्रूचा जोराचा हल्ला होणार आहे.'' आणि रात्री प्रत्यक्ष तो हल्ला होत असताना एक अधिकारी त्याच्या सहकाऱ्याला म्हणतो, ''सारंच विलक्षण आहे. कित्येकदा आकाशातला तारा आणि दारूगोळ्यातून उडणाऱ्या ठिणग्या सारख्याच दिसतात.''

स्वत: रणभूमीवर लढल्यामुळे तेथे लढणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मन:स्थितीचे वर्णन करताना कोठेही अतिशयोक्ती न करता, कोठेही सैनिकांच्या वा अधिकाऱ्यांच्या हौतात्म्याचे रोमॅन्टिक वर्णन न करता, वास्तवाचे कठोर दर्शन आपण घडविले आहे. 'सेव्हॅस्टोपोल रिकलेक्शन्स डिसेंबर १८५४'मध्ये एका अधिकाऱ्याबद्दल लिहिले आहे, ''काही वेळा मृत्यूला यत्किंचितही न भिता शत्रूच्या तोफा धडाडत असताना बेडरपणे पुढे जाणाऱ्या त्या अधिकाऱ्याला काही वेळा मरणाचे भय वाटते आणि जीव वाचवावा म्हणून तो काही वेळ पालथा पडून राहतो. काही वेळा आपण शौर्य गाजवणारे आहोत आणि आपल्याला आपल्या मर्दुमकीबद्दल पदक मिळणार आहे, ही भावना त्याच्या मनाला व्यापून टाकते, आणि त्याचे बाहू स्फुरण पावतात आणि काही वेळा कशाचे काही वाटत नाही. शौर्य आणि भित्रेपणा सारेच मिथ्या वाटू लागते.'' हा भाग ज्या वेळी वाचत होतो, त्या वेळी मला पंडित नेहरूंच्या आत्मचरित्रातील 'लाठीमाराचा पहिला अनुभव' हे प्रकरण आठवले. सायमन कमिशनच्या विरोधातील अलाहाबादमधील निदर्शनांचे नेते म्हणून पंडित नेहरू मिरवणुकीच्या अग्रभागी असताना त्या मिरवणुकीवर ब्रिटिश सोल्जर्सनी जबरदस्त लाठीहल्ला केला. पंडित नेहरूंना लाठीचा पहिला जोराचा तडाखा बसला. त्या अनुभवाबद्दल त्यांनी लिहिले आहे, ''लाठीच्या त्या फटक्याने माझ्या शरीरातून तीव्र कळ उठली आणि मला तेथून पळून जावेसे वाटले; पण त्याचवेळी मी सत्याग्रही आहे आणि कितीही मार बसला तरी मी निर्धाराने तो सोसला पाहिजे, याची मला आठवण झाली. मग लाठ्यांचे फटके बसत असतानाही मी ठामपणे उभा राहिलो.'' पंडित नेहरूंनी पुढे लिहिले आहे, 'भित्रेपणा आणि शौर्य यांमधील सीमारेषा फार सूक्ष्म असते आणि आपण केव्हा, कोठे असू हे सांगता येत नाही.' (दि बॉर्डरलाईन बिट्वीन

कॉवर्डिस अॅन्ड करेज इज व्हेरी थिन्, अॅन्ड नन् नोज व्हेन् वन इज ऑन दि अदर साईड.) आपण सेव्हॅस्टोपोलमधील युद्धभूमीवरील अनेक प्रसंगांच्या ज्या आठवणी लिहिल्या आहेत, त्यांच्यामधून हेच कठोर वास्तव आपण स्पष्टपणे दाखविले आहे.

'सेव्हॅस्टोपोल इन मे १८५५'मधील आपण पुढील प्रसंगांचे जे वर्णन केले आहे, ते वाचताना माझे मन सुन्न झाले होते. मिखिलॉफ् आणि प्रॉस्कुकाईन सैन्याचे नेतृत्व करीत आगेकूच करीत असतात आणि त्यांना एकदम आदेश ऐकू येतो, "जमिनीवर खाली पडा". दोघेही अधिकारी खाली पडतात. प्रॉस्कुकाईन डोळे उघडतो. त्याला त्याचा सहकारी डोळे न उघडता पडलेला दिसतो आणि त्याच क्षणी जवळच भोवऱ्याप्रमाणे भिरभिरत येणारा एक लालभडक तुकडा त्याला दिसतो. एका क्षणात त्याच्या मनात अनेक विचार येऊन जातात. आपण मरणार, की मिखिलॉफ् मरणार, असा विचार करीत प्रॉस्कुकाईन हातांनी तोंड झाकून घेत स्वत:शीच म्हणतो, की या क्षणी स्फोट होण्याची शक्यता नाही आणि तो निर्भयपणे डोळे उघडणार, इतक्यात त्याच्यावर जबदरस्त आघात होतो. तो बेभानपणे उठतो, धावतो आणि लगेच खाली पडतो. आजूबाजूला शत्रूच्या तोफांचे गोळे पडत असतात आणि त्याच्या तुकडीतील जवान खाली पडत असतात. प्रॉस्कुकाईनला एकदम तहान लागते आणि त्याला ओरडावेसे वाटते, "अहो, मला न्या की इथून." पण त्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडत नाहीत. तो फक्त विव्हळतो आणि त्याच्या डोळ्यांसमोर ठिणग्या उडतात; पण त्याला दिसत नाही, ऐकू येत नाही, जाणवत नाही; कारण त्या क्षणी त्याचा प्राण गेलेला असतो. प्रॉस्कुकाईनबरोबर असलेला अधिकारी मिखिलॉफ् हाही जखमी झाला होता, परंतु स्वत:ची जखम किरकोळ आहे हे समजताच तो आपल्या सहकाऱ्याची चौकशी करतो. एक सोल्जर त्याला इतकेच सांगतो, की तो जखमी झालाय. तेव्हा त्याला आपण जाऊन आणलेच पाहिजे, असे मिखिलॉफ्ला वाटते. 'प्रॉस्कुकाईन मारला गेला' हे ऐकल्यावरही "तरीही त्याला आपण आणले पाहिजे" असे तो म्हणतो. आजूबाजूचे कोणीही त्याच्या बोलण्याकडे लक्ष देत नाहीत तेव्हा स्वत:शीच 'त्याला आणायला हवे होते' असे पुटपुटत मिखिलॉफ् त्याच्या जखमेला बँडेज बांधण्यासाठी हॉस्पिटलकडे जातो. रणभूमीवर मरण आणि जीवन शेजारीशेजारी कसे वावरते, त्याचे हे वर्णन मनाचा थरकाप उडवते.

पुढील तेरावे प्रकरण आपण अर्धा पानच लिहिले आहे; पण त्या अर्ध्या पानातील लेखनात अपार सामर्थ्य आहे. सुरूवातीस त्या रणभूमीवर पडलेल्या रक्तबंबाळ देहांचा उल्लेख करून आपण लिहिले आहे, "दोन तासांपूर्वी ज्यांच्या मनात अनेक इच्छा, आशा आणि स्वप्ने होती, त्यांचे देह अचेतन अवस्थेत पडले होते; आणि हे सारे घडत असताना आकाशातील तारे अंधुक होत होते. समुद्राच्या पृष्ठभागावरील धुके वितळत होते; पूर्व दिशा तांबूस झाली होती आणि... काही वेळातच नेहमीप्रमाणे सूर्योदयही झाला." या पंचवीस-तीस ओळी वाचताना माझ्या अंत:श्चक्षूंसमोर जीवनाचे रहाटगाडगे फिरत होते आणि मी अवाक् झालो होतो.

फ्रेंच सेनेचा विजय होतो आणि सेव्हॅस्टोपोल पडते. पराभूत रशियन सैन्य माघार घेते. या माघारीचे वर्णन मी १९४४ मध्ये वाचत असताना 'स्टालिनग्राडचे असे होणार नाही ना,' असे भीतीचे काहूर मनात उठले होते.

आपण पुढील आशयाचा मजकूर लिहिला आहे; 'पूल ओलांडून पैलथडी पोचल्यावर प्रत्येक रशियन जवान टोपी हातात घेऊन धारातीर्थी पडलेल्या आपल्या सहकाऱ्यांना प्रणाम करीत होता. माघार घेणाऱ्या त्या सर्वांच्या मनात अपराधित्वाची भावना उसळून आली होती आणि त्याचवेळी शत्रूबद्दलच्या द्वेषाने, संतापाने त्यांचे मन भरून गेले होते. प्रत्येकजण दु:खाचा सुस्कारा टाकताना शत्रूला, 'आम्ही एक दिवस याचा बदला घेऊ', अशा धमक्या देत होता आणि सेव्हॅस्टोपोलकडे अखेरचा कटाक्ष टाकून माघारी फिरत होता.

'सेव्हॅस्टोपोल इन डिसेंबर १८५४' या आपल्या पुस्तकाच्या पूर्वार्धात आपण देशाच्या रक्षणासाठी लढणाऱ्या सैनिकांबद्दल अभिमानाने लिहिले आहे; परंतु 'सेव्हॅस्टोपोल इन मे १८५५' आणि 'सेव्हॅस्टोपोल इन ऑगस्ट १८५५' या पुस्तकांमध्ये आपल्या लेखनाचे स्वरूप अगदी वेगळे झाले आहे. लढाईत कधीही भाग न घेता, रणभूमी न पाहता 'चार्ज ऑफ दि लाइट ब्रिगेड' लिहिणारा टेनिसन आणि रणभूमीवर प्रत्यक्ष लढण्याचा अनुभव घेताना युद्धाचे विनाशकारी, भीषण स्वरूप दाखविणारे आपण, हे दोन ध्रुवच आहात. आपण आपली मते कोठेही मांडली नाहीत; परंतु युद्धातील हिंसा किती हिडीस असते, हे आपण अशा रीतीने आपल्या लेखनात दाखविले आहे, की आपले लेखन वाचून लोक युद्धविरोधी

होतील, अशी भीती सेन्सॉर समितीला वाटली आणि त्यांनी आपल्या लेखनातील काही भागाला कात्री लावली. आपल्या लेखनात काटछाट करून ते विपर्यस्त रीतीने प्रसिद्ध करणाऱ्या अधिकाऱ्याने लिहिले आहे, ''टॉलस्टॉय यांचे लेखन अप्रतिम आहे, परंतु त्यातील सत्य आज युद्ध चालू असताना प्रसिद्ध करणे इष्ट नाही.''

युद्ध चालू असताना मृत सैनिकांना मूठमाती देण्यासाठी रशियन व फ्रेंच सेनांच्या अधिकाऱ्यांनी काही काळ लढणे तहकूब केले. त्या वेळी दोन्ही बाजूंचे सैनिक काही काळ शत्रुत्व विसरून मृतात्म्यांना श्रद्धांजली वाहत होते. आपण यासंबंधी लिहिले आहे : 'प्रेतांचे ढीग हलवले जात होते. दोन्ही बाजूंचे सैनिक माणसे म्हणून एकमेकांकडे पाहात होते. प्रेम आणि त्याग ही ख्रिस्ताची शिकवण परमेश्वरापुढे गुडघे टेकताना त्यांच्या मनात जागी झाली असणार-' असे लिहिल्यानंतर परिच्छेदाच्या शेवटी आपण लिहिले आहे : 'मृतांना श्रद्धांजली वाहण्यासाठी काही काळ केलेल्या तहाची वेळ संपली होती. शांततेचा निदर्शक पांढरा ध्वज उतरवण्यात आला. थोड्या वेळातच निरपराध जवानांचा बळी घेणाऱ्या तोफा धडाडू लागल्या. काही वेळेपूर्वीची शांतता संपली होती. मरणाच्या दारातील जखमी सैनिकांचे विव्हळणे पुन्हा ऐकू येऊ लागले होते.'

आपण शेवटी लिहिले आहे, ''युद्धाच्या या कथेतले अनिष्ट काय आहे आणि इष्ट काय आहे? या कथेचा नायक कोण आणि खलनायक कोण आहे? सगळेच चांगले आहेत आणि सगळेच वाईटही आहेत की काय?.... ज्याच्यावर माझा अंतरात्मा प्रेम करतो आणि जो सतत सुंदरच राहणार आहे तो माझ्या कथेचा नायक आहे– तो म्हणजे 'सत्य.''

हे आपले लेखन वाचताना मला कीट्सच्या कवितेतील ओळ आठवली– 'ट्रुथ इज ब्यूटी अॅन्ड ब्यूटी ट्रुथ' (सत्य हे सुंदर आहे आणि सौंदर्य सत्य आहे.) त्याचवेळी परमेश्वरामध्ये सत्य, शिव आणि सुंदर यांची एकात्मता झालेली आहे, हे सांगणारे भारतीय संतही मला आठवले.

'सेव्हॅस्टोपोल डिसेंबर १८५४' हा भाग लिहितानाच आपल्या मनाच्या समरभूमीवर विचारांचे द्वंद्व सुरू झाले आणि 'सेव्हॅस्टोपोल मे १८५५' लिहिताना युद्ध हा मानवी मनाचा अध:पात आहे, हे आपल्याला स्पष्टपणे उमजले. वेगवेगळ्या राष्ट्रांच्या युद्धपिपासू घोषणांतील खोटेपणा आपल्या लक्षात आल्यावर पुढे काही काळाने आपण त्यांचे स्वरूप कसे विकृत आहे, ते जगाला स्पष्टपणे सांगितले. काही वर्षांनंतर आपणाला


गॉस्पेल्सचा जो खरा अर्थ उमगला, त्या प्रक्रियेचा उगम सेव्हॅस्टोपोलच्या रणभूमीवर झाला होता, असे मला वाटते.

आपण क्रिमियन युद्धाच्या काळात सैन्यात अधिकारी असतानाच युद्धाचे हे भीषण स्वरूप आपण जगासमोर मांडले. आपल्याबरोबर सैन्यात असलेल्या एका अधिकाऱ्याने तीस वर्षे उलटून गेल्यानंतर 'रिकलेक्शन्स ऑफ सेव्हॅस्टोपोल' हेच शीर्षक असलेले पुस्तक लिहिले. त्या पुस्तकात त्या अधिकाऱ्याने लिहिले आहे, 'युद्धातील रक्तपात, मृत्यू हे सारे भीषण असतात. हे सारे दु:ख कमी करण्यासाठी रेडक्रॉस सोसायटीची आवश्यकता आहे.' आपण या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली आहे. त्यातील एक वाक्य मी कधीच विसरू शकणार नाही. आपण लिहिले आहे, ''आपल्याला रेडक्रॉसची नव्हे, तर ख्रिस्ताच्या क्रुसाची गरज आहे. कारण माणसाच्या शरीराच्या जखमांपेक्षा त्याच्या आत्म्याची जी चिरफाड झाली आहे, ती थांबविणे आवश्यक आहे.''

•

आपला नम्र,

म. क. गांधी



४.

स्वप्नवत् शाळा आणि नवे प्रयोग

आदरणीय लिओ टॉलस्टॉय,

सादर प्रणाम.

क्रिमिअन युद्धानंतर आपण कॉकेशसला काही दिवस जाऊन आलात आणि नंतर परत आपण मॉस्को येथे राहू लागलात. मधूनमधून आपण यास्नाया पोल्यानाला जात होता. या अनुभवाबद्दल आपण लिहिले आहे, ''मॉस्कोच्या निवासात सवंग रीतीने सगळी शारीरिक सुखे भोगल्यानंतर स्वत:तील स्खलनशील प्रवृत्तीच्या जाणिवेने मनाला उद्वेग येत असे. मॉस्कोचे विलासी जीवन सोडून यास्नाया पोल्यानाला आल्यावर निसर्गाचाच एक भाग असलेले तेथील शांत, संथ लयीतील जीवन आणि सर्वांच्यावर प्रेम करताना कोणालाही कधी उपदेश न करणाऱ्या तातिआना आत्याचा प्रेमळ सहवास यामुळे माझ्या मनाला विलक्षण आनंद होत असे.'' यास्नाया पोल्याना येथे आपण आपल्या शेतावर नेमाने काम करीत होता आणि भरपूर शारीरिक श्रम केल्यावर आपल्याला समाधान वाटत असे. या काळातल्या आपल्या जीवनक्रमाबद्दल लिहिताना आपण एके ठिकाणी म्हटले आहे, ''त्या दिवशी शेतामध्ये खत टाकण्याचे काम ज्या रीतीने चालले होते, ते मला पसंत नव्हते. मला खूप राग आला. पण नंतर मी घाम येईपर्यंत शेतात काम केले आणि मला सगळे काही चांगले वाटू लागले. माझ्याबरोबर काम करणाऱ्या प्रत्येक माणसाबद्दल मला प्रेम वाटू लागले.'' आपले शरीर धडधाकट होते. आपल्याला शारीरिक श्रमांची आवड होती आणि आपले धरती-मातेशी जिव्हाळ्याचे नाते होते. त्यामुळे हा आनंद आपल्याला मिळू शकला. आपल्या शेतात उफान्न या नांगरट करणाऱ्या शेतकऱ्याच्या धिप्पाड, ताकदवान शरीराच्या, बळकट स्नायूंच्या हालचाली आपल्याला आकर्षक वाटत आणि काही वेळा आपणही त्याच्यासारखेच आपले कोपर जोरजोराने हलवीत होतात.

आपण जमीनदार आहोत, ही आपली कुळे आहेत, याचा आपल्याला पूर्ण विसर पडे आणि शेतावर राबणारे आपण सगळे धरतीमातेची लेकरे आहोत, या भावनेने आपण अन्य शेतकऱ्यांसमवेत हवे तितके कष्ट आनंदाने करीत होतात.

१८४०च्या सुमारास आपल्या शेतावर काम करणाऱ्या शेतमजुरांच्या मुलांसाठी आपण शाळा काढली होती; पण आपल्याला यास्नाया पोल्याना सोडावे लागल्यामुळे ते काम तसेच राहून गेले. मात्र आपल्या मनात तो विचार वारंवार उसळून येई, कारण शेतकऱ्यांच्या मुलांना शिकविल्याशिवाय रशियाची प्रगती होणार नाही, असे आपणास मनोमन वाटत असे.

१८५९ मध्ये आपण शाळा काढण्याचे ठरविले, कामाला थोडी सुरुवात केली आणि युरोपमधील काही देशांतील शिक्षणाचे प्रयोग प्रथम पाहण्याचा निर्णय आपण घेतला. आपले थोरले भाऊ निकोलस यांना हवाफेर करण्यासाठी युरोपात घेऊन जाताना फ्रान्स, जर्मनी आदी देशांतील शिक्षण पद्धतीचा अभ्यास करण्याचे आपण ठरविले. जर्मनीत फ्रोबेल यांनी किंडर गार्डन पद्धती पूर्वी सुरू केली होती. त्यांचे पुतणे ज्युलिअस फ्रोबेल यांना आपण भेटलात आणि किंडर गार्डन शिक्षण पद्धतीमागचा विचार त्यांच्याकडून समजून घेतला. फ्रान्समध्ये जाऊन तेथील शिक्षणतज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना ज्ञान मिळविण्यात गोडी वाटावी आणि त्यासाठी आवश्यक ते वळण त्यांच्या बुद्धीला लागावे यांकरता काय केले, हे समजून घेण्यासाठी तेथील अनेक शाळांना आपण भेटी दिल्यात; मात्र आपल्याला तेथील शिकवण्याची पद्धत समाधानकारक वाटली नाही. चर्चमार्फत दिले जाणारे शिक्षण पाहून आपण लिहिले आहे, की त्या शिक्षणामुळे निर्माण होणारे नागरिक दांभिक आणि अंधश्रद्धाळू बनणे अपरिहार्य होते. पॅरिसमधील सांस्कृतिक जीवनातून होणाऱ्या संस्कारांचाही आपण विचार केला. आपल्याला आढळून आले, की शाळांमध्ये इतिहास चुकीच्या पद्धतीने शिकविला, तरी अनेक फ्रेंच नागरिक अलेक्झांडर ड्यूमाच्या कादंबऱ्या आवडीने वाचत होते आणि त्या कादंबऱ्यांतूनच त्यांना इतिहासाचे आकलन होत होते आणि सामाजिक न्याय म्हणजे काय, ते त्यांना समजत होते. 'अशा साहित्याच्या वाचनातून आणि फ्रान्समधील कॅफेमध्ये ज्या गप्पा आणि चर्चा चालत त्यांमधून निदान वीस टक्के लोकांचे जे तोंडी शिक्षण होत

होते, ते शाळांतील सक्तीच्या शिक्षणापेक्षा कितीतरी अधिक प्रभावी होते,' असे आपण लिहिले आहे.

जर्मनीमध्ये जेना या गावी केलर या गणिततज्ज्ञाशी आपली ओळख झाली आणि आपल्या शैक्षणिक प्रयोगात मदत करण्यासाठी आपण केलर यांना आपल्यासमवेत यास्नाया पोल्यानाला घेऊन गेलात. १८६१च्या एप्रिल महिन्यात आपण मोठ्या अपेक्षेने बर्लिन येथील टीचर्स सेमिनारच्या प्रमुखाची भेट घेतली; परंतु शाळेतील नियम आणि चाकोरीतील शिक्षणपद्धती यांतूनच मुलांचे शिक्षण करणे इष्ट आहे, अशी ठाम भूमिका असलेल्या त्या तथाकथित शिक्षणतज्ज्ञांच्या उथळपणामुळे आपला पूर्ण भ्रमनिरास झाला.

शिक्षणातले अभिनव प्रयोग

१८५९ ते १८६२ या तीन-साडेतीन वर्षांच्या काळातच आपण मुख्यत: शैक्षणिक कार्य केले आणि अभिनव प्रयोग करीत शिक्षण कसे असावे, यासंबंधीच्या सत्याचा शोध घेतला. मुलांना आपण स्वत:च शिकवायला लागलात आणि आपल्या स्वभावाप्रमाणे अत्यंत उत्साहाने आणि जीव ओतून आपण शिक्षणक्षेत्रात एक प्रयोग केला. हे काम करतानाच आपण शैक्षणिक विषयाला वाहिलेले मासिकही सुरू केले आणि त्यामध्ये लेख लिहून आपले शिक्षणविषयक विचार मांडले. आपण शाळा चालवताना प्रत्यक्ष शिकविण्याचे जे काम करीत होता, त्याचे सर्व वृत्त तपशीलवार देतानाच आपण आपल्या लेखांतून आपला शिक्षणविषयक दृष्टिकोनही मांडला. इच्छा असूनही आपले हे विचार मला मुळातून वाचायला मिळाले नाहीत, याची मला खंत वाटते. ज्यांनी या लेखांचे इंग्रजी भाषांतर केले आहे, त्या आल्मेर मॉड यांनी लिहिले आहे. ''टॉलस्टॉय यांनी त्यांच्या शिक्षणविषयक लेखांमध्ये अनेक मौलिक आणि स्वतंत्र विचार मांडले होते. त्यांचे काही सिद्धांत काहीसे एकांगी वाटले तरी विद्यार्थ्यांच्या मनाचा आणि बुद्धीचा विकास कसा करावा, त्यांना काय आणि कसे शिकवावे याबद्दलचे त्यांचे प्रगल्भ विचार वाचताना त्यांच्या प्रतिभावान मनाची, त्यांच्या प्रज्ञेची झेप कशी असामान्य होती, हे समजून येते. त्याचबरोबर मुलांचे मन कसे असते हे त्यांना बरोबर समजले होते आणि या मुलांचे मन ज्यात रमेल असे शिक्षण त्यांना दिले पाहिजे, हा विचारच त्यांच्या शिक्षणविषयक प्रयोगांच्या केंद्रस्थानी होता.''

शिकणे, ज्ञान मिळणे हा एक आनंददायी अनुभव मुलांना आला, तरच त्यांचे मन शिकण्यात रंगून जाईल, हा विचार आपण आपल्या लेखांमध्ये आग्रहाने मांडीत होतात आणि त्याच रीतीने आपण मुलांना शिकवीत होतात. मुलांना बरोबर घेऊन लांब फिरायला जाणे, रस्त्यात झाड दिसले की त्याची सगळी माहिती मुलांना सांगणे, त्यांनी कसलाही कोणताही प्रश्न विचारला की न कंटाळता त्यांचे समाधान करणे, अशी आपली ही मुक्त शाळा चालत असे. सॉक्रेटिसला 'वॉकिंग फिलॉसॉफर' म्हणत. आपण त्याच्याचप्रमाणे चालताबोलताना मुलांना शिकवीत होतात.

शिक्षक आणि विद्यार्थी हे एकाच पातळीवर वावरत असले पाहिजेत, असा आपला आग्रह असे आणि शिकताना मुलांच्या मनांत अधिकाधिक ज्ञान मिळण्याची ऊर्मी निर्माण झाली पाहिजे, यासाठीच आपली अक्षय धडपड चालू असे.

आपण एका लेखात लिहिले आहे, ''स्वच्छंदाने शिकणारा मुलांचा समूह आणि त्यांचा शिक्षक यांच्यात मुलांना अधिक महत्त्व असते. परंतु प्रचलित शिक्षण पद्धतीत मात्र शिक्षक हा त्याच्या इच्छेप्रमाणे, मेंढ्यांना हाकणाऱ्या मेंढपाळासारखा वागत असतो.''

शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये जिव्हाळ्याचे नाते कसे निर्माण करावे, यासंबंधी आपण लिहिले आहे, की विद्यार्थ्यांच्या मनांशी, त्यांच्या आशा-आकांक्षांशी एकरूप होणारा शिक्षकच चांगले शिक्षण देऊ शकेल. आपण चालविलेल्या शाळेला शेतीच्या हंगामात सुट्टी असे. मुले त्या ऋतूत शेतावर काम करीत. हेही शिक्षणच आहे असे आपले मत होते, कारण जीवन आणि शिक्षण यांची फारकत होऊ नये, असा आपला आग्रह होता. यास्नाया पोल्यानातील शेतकऱ्यांनी प्रथम ज्यावेळी आपल्याला मुलांबरोबर फिरताना पाहिले, त्या वेळी अशा शाळेत आपली मुले काय शिकणार, असे त्यांना वाटले; परंतु काही दिवसांनी मुले आनंदाने वाचतात, लिहितात, वेगवेगळ्या विषयांची त्यांना नवनवीन माहिती मिळते, हे पाहिल्यावर त्या शेतकऱ्यांना आपल्या शाळेबद्दल आपुलकी वाटू लागली. आपल्या शाळेत सुरुवातीस सात ते दहा या वयाची चाळीस मुले होती. आपण, मुले हजर होती की नाही हे कधी पाहिले नाही. 'मुलांना शिकणे आवडले तर ती नेमाने शाळेत येतील,' ही आपली भूमिका होती. काही दिवसांतच मुलांची संख्या सत्तरवर गेली. १८६२ मध्ये यास्नाया पोल्यानाच्या आसपासच्या गावांत तेरा शाळा निघाल्या.

एक लहानशी झोपडी, काही बाके आणि फळा इतक्या तुटपुंज्या सामानावर शाळा सुरू होई. कॉलेज सोडलेल्या काही तरुणांना शिक्षक म्हणून आपण तयार केले आणि त्यांच्या मनात ध्येयवादाचे बीजारोपण केले. हे तरुण शिक्षक अल्प वेतनावर काम करीत. हिवाळ्यात सकाळपासून संध्याकाळपर्यंत ते मुलांच्यात रमलेले असत. त्यांना शिकवीत, त्यांच्याबरोबर जेवत आणि त्यांच्यासमवेत गाणी म्हणत. बिअकॉव्ह यांनी शाळा पाहिल्या. त्यांनी लिहिले आहे की तीन वर्षांमध्ये आपल्या या प्रयोगाबद्दल त्या परिसरातील अनेकांना आकर्षण वाटू लागले, आणि वीस-पंचवीस मैल दूर असलेल्या गावांतील शेतकरीही त्यांची मुले आपल्या शाळांमध्ये पाठवू लागले.

शिक्षणामध्ये शारीरिक श्रमांना स्थान असले पाहिजे, अशी आपली भूमिका असल्यामुळे आपल्या शाळेच्या कार्यक्रमात मुलांनी नियमाने रोज शेतावर काम करावे, अशी योजना आपण केली होती.

आपला हा शिक्षणाचा प्रयोग सार्वजनिक व्हावा म्हणून आपल्याला 'सोसायटी फॉर दि एज्युकेशन ऑफ दि पीपल' स्थापन करावयाची होती; परंतु रशियातील सरकारने या योजनेस मान्यता दिली नाही. त्यामुळे आपल्याला शैक्षणिक प्रयोगासाठी व्यापक क्षेत्र मिळू शकले नाही. आपण त्यामुळे मर्यादित क्षेत्रातच आपले शैक्षणिक प्रयोग करीत राहिलात आणि अनेक बाबतीत ते वैशिष्ट्यपूर्ण ठरले. आपण मुलांना शाळेत सांगितलेल्या एका गोष्टीची फेडका आणि स्योमका या मुलांनी पुनर्रचना केली आणि त्यामधून त्यांच्यातील कलात्मक अभिव्यक्ती करण्याचे सामर्थ्य जेव्हा प्रकट झाले, तेव्हा आपले मन आनंदाने फुलून गेले. फेडकाने लिहिलेली गोष्ट आपण आपल्या शैक्षणिक मासिकातही छापली. शिक्षा आणि बक्षिसे या दोन्ही गोष्टी येथे नव्हत्या. अशी मुक्त शाळा चालविण्याच्या आपल्या प्रयोगाचे अनुकरण झाले पाहिजे, असे मला आजही वाटते. आपल्याला ज्या तऱ्हेचे शिक्षण शेतकऱ्यांच्या मुलांना द्यावयाचे होते, त्यासाठी योग्य अशी पाठ्यपुस्तके नव्हती. या संदर्भात आपले, 'एबीसी बुक फॉर बिगिनर्स' मला वाचायला मिळाले नाही, याची माझ्या मनाला फार रुखरुख वाटते; परंतु आपण मुलांसाठी लिहिलेल्या अनेक कथा मी वाचल्या आहेत. जगातील अनेक भाषांमध्ये भाषांतर झालेल्या, अनेक देशांतील मुलांनी आवडीने वाचलेल्या या कथा अप्रतिम आहेत. साध्या सोप्या शैलीत लिहिलेल्या या लहान लहान गोष्टी आपण लिहू शकलात; कारण


आपल्याला लहान मुलांचे मन कसे असते, कशात रमते याची पूर्ण कल्पना होती. जगातील साहित्य क्षेत्रातील समीक्षकांनी आपल्या कथा, कादंबऱ्यांच्या कलात्मकतेची मुक्त कंठाने स्तुती केली आहे. आपण जे बालकुमारांसाठी साहित्य लिहिले आहे, त्यातूनही आपण किती थोर लेखक होता, याचा प्रत्यय मला आला. जगातील काही लेखकांनी मुलांसाठी लिहिलेल्या परीकथांपेक्षा आपल्या गोष्टींचे स्वरूप अगदी वेगळे आहे. निसर्ग आणि आयुष्यातील काही अनुभव यांचे अद्‌भुतरम्य चित्र आपण मुलांसाठी लिहिलेल्या गोष्टींतून पाहायला मिळते.

आनंद अनुभवला

१८५९ ते १८६२ या आपल्या आयुष्यातील शैक्षणिक कार्याला वाहिलेल्या वर्षांबद्दल आपण लिहिले आहे, "तो माझ्या आयुष्यातला ओजस्वी कालखंड होता. मुलांनी आणि अनेक लोकांनी माझ्यावर प्रेमाचा वर्षाव केला. त्या काळात मी खरा उत्कट आनंद अनुभवला." या काळात आपण अन्य कोणतेही लेखन केले नाही. पुढे बारा-तेरा वर्षांनी १८७२ मध्ये आपण यास्नाया पोल्यानाच्या आजूबाजूच्या गावांतील दहा-बारा शिक्षकांना बोलाविले. ते आपल्या घरातच राहिले. आपण आजूबाजूची निरक्षर मुले गोळा केली आणि काही दिवस आपली रीत स्वीकारून त्या शिक्षकांनी त्या मुलांना शिकवण्याचा प्रयोग केला, तेव्हा मनातील ज्ञानाबद्दलची सुप्त ओढ कशी जागृत करता येते, हे दिसून आले. आपला दुसरा नियोजित प्रकल्प 'युनिव्हर्सिटी इन बार्क शूज' हा होता. रशियातील शेतकरी 'बार्क शूज' घालतात. या शेतकऱ्यांना शिक्षक बनण्यासाठी नव्या रीतीने शिकविले तर ते खेड्यांतील मुलांना शिकवू शकतील, असा आपल्याला विश्वास होता. हा प्रयोग मात्र आपण करू शकला नाहीत. आपल्या कल्पना साकार करण्यासाठी आपण सुरू केलेल्या शाळाही फार वर्षे चालल्या नाहीत. पण हे सर्व शैक्षणिक प्रयोग करताना आपण मांडलेल्या मुख्य शिक्षणविषयक विचाराला– शिकताना मुलांचे मन फुलले पाहिजे, शिक्षकाने ते फुलविले पाहिजे– या विचाराला जगात आपण आज मान्यता मिळवली आहे. शिक्षणक्षेत्रात आपल्या ज्या पाऊलखुणा उमटल्या, त्या कधीच पुसल्या जाणार नाहीत.'

आपला नम्र,

ग. प्र. प्रधान



५.

मृत्यूचे भीषण स्वरूप

आदरणीय लिओ टॉलस्टॉय,

सादर प्रणाम.

क्रिमिआतील युद्धात सेनेतील एक अधिकारी म्हणून आपण जे लेखन केले त्यासंबंधी मी आपणास लिहिलेल्या पत्राला आपण जे चार ओळींचे उत्तर लिहिले आहे, त्यात आपण लिहिले आहे, ''एक वा अनेक व्यक्तींचा मृत्यू पाहत असताना आपल्याला प्रत्येक वेळी जीवनाचा नवा अर्थ समजतो.'' हे आपले वाक्य वाचताना आपणाला तरुणपणी आलेले दोन अनुभव मला आठवले. आपले थोरले बंधू निकोलस यांना क्षयरोग झाला होता आणि त्यांच्यावर उपचार करण्यासाठी आणि हवापालटही करण्यासाठी आपण त्यांना घेऊन युरोपात गेला होतात; परंतु त्यांची प्रकृती खालावतच गेली आणि अखेर १८६०च्या सप्टेंबर महिन्यात त्यांचे निधन झाले. त्यांच्या अखेरच्या दिवसांत आणि त्यांच्या जीवनाच्या अखेरच्या क्षणीही आपण त्यांच्याजवळ होतात. या दु:खद घटनेसंबंधी आपण तातिआना आत्या आणि आपले दुसरे बंधू सर्जी यांना लिहिलेली पत्रे मी वाचली आहेत. आपले आपल्या बंधूंच्यावर उत्कट प्रेम होते आणि तरुणपणी एक वर्षाच्या आजारानंतर त्यांची जीवनज्योत मालवली, त्या क्षणांचे सर्जीला आपण लिहिलेल्या पत्रातून जे वर्णन केले आहे, ते वाचताना आपल्या दु:खाची तीव्रता जाणवते. निकोलसच्या अकाली मृत्युसंबंधी आपण लिहिले आहे, 'त्याच्या अंतकाळच्या वेदनांची आठवण झाली, की 'हे का?' म्हणून तो विचारीत असणार, असे वाटते. मजजवळ आजही या प्रश्नाचे उत्तर नाही.'

या मृत्यूनंतर आपण पॅरिसला गेल्यावर एका धट्टयाकट्टया माणसाचे मुंडके गिलोटिनने उडवताना जे पाहिले, ते मृत्यूचे स्वरूप फारच भीषण होते. या अनुभवानंतर आपण लिहिले आहे,

'गिलोटिनमुळे माझी झोपच उडाली आणि विचारांचा कोलाहल माझ्या मनात सुरू झाला.' त्यावेळी आपण तत्काळ पॅरिस सोडून जीनिव्हाला गेला होता. सेव्हॅस्टोपोलमध्ये आपण पाहिलेला युद्धातील नरसंहार, आपले बंधू निकोलस यांचा आपल्या छातीवर डोके ठेवून झालेला मृत्यू आणि गिलोटीनने केलेला एका व्यक्तीचा भीषण शेवट, या तीनही घटनांच्या संदर्भात आपण मला लिहिलेल्या पत्रातील वाक्याचा अर्थ किती खोल आहे, हे माझ्या लक्षात आले.

मला आपण लिहिलेली 'थ्री डेथस्' (तीन मृत्यू) ही कथाही आठवली. या कथेत वर्णन केलेल्या तीन मृत्यूंपैकी एका श्रीमंत कुटुंबातील स्त्रीच्या अखेरच्या दिवसांचे वर्णन मला आठवते. सुखलोलुप वृत्तीने जगण्यात आयुष्य घालवलेल्या त्या स्त्रीचा आजार बळावला होता. हवाफेर केल्यास थोडेतरी बरे वाटेल, या आशेने ती हवापालट करण्यासाठी जात असते. प्रवासात तिची बडदास्त ठेवणाऱ्या, तिच्या तरुण नोकराणीच्या चपळ हालचालींचाही तिला हेवा वाटतो. कारण एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर वळतानाही त्या श्रीमंत बाईला त्रास होत असतो. तिच्याशी प्रतारणा करणारा तिचा रंगेल नवरा तिच्या दुखण्याला आणि सततच्या कुरकुरण्याला कंटाळला असला, तरी वरवर मात्र तो आपल्याला बायकोच्या प्रकृतीची फार चिंता वाटते, असे नाटक करीत असतो. स्वत:मध्येच फक्त गुरफटलेली ती बाई अखेरच्या क्षणापर्यंत केवळ स्वत:च्या शरीराचा विचार करीत जगण्याचा जो अट्टाहास करीत असते, त्याचे वर्णन वाचताना मानवी मनाच्या दुबळेपणाची आणि मरण समीप असतानाही आत्मकेंद्रित वृत्तीमुळे त्या रुग्ण स्त्रीच्या मनाच्या झालेल्या अध:पतित अवस्थेची मला घृणा वाटली. मृत्यू समयीच्या मानवी स्वभावाच्या क्षुद्रतेची मला उबग आली. याच कथेत आपण दुसरा मृत्यू दाखविला आहे, तो थिओडोर या ड्रायव्हरचा. थिओडोर म्हातारा झाला होता. बरेच दिवस आजारीही होता. तो खोकत होता, त्याचा श्वास कोंडत होता; पण मृत्यू हा निसर्गक्रमाचाच भाग आहे, हे अशिक्षित, आयुष्यभर कष्ट करीत जगलेल्या थिओडोरने स्वीकारले होते. त्याच्या खोलीतील भोवतालच्या अन्य ड्रायव्हरांनाही 'म्हातारा आता जाणारच,' असे वाटत होते. सर्जी या तरुण ड्रायव्हरला थिओडोरचे अद्याप चांगले असलेले बूट हवे होते; पण ते कसे मागायचे, असे त्याला वाटत होते. अखेर तो मागतोच. थिओडोरही म्हणतो, ''घेऊन जा की खुशाल; मात्र

मला जेथे पुरतील तिथे एक दगड तरी उभार.'' सर्जी ते बूट घेतो. थिओडोरचा त्या रात्रीच मृत्यू होतो. तो दूरच्या कोठल्या तरी गावातून आलेला असतो आणि कोणीही नातेवाईक त्याच्या जवळ नसतात. दुसऱ्या दिवशी त्याच्या खोलीतले लोक त्याला जंगलापलीकडच्या स्मशानभूमीत पुरतात. हा दुसरा मृत्यू.

एक महिना उलटतो; पण सर्जीने थिओडोरच्या नावाने दगड उभारलेला नसतो. खोलीतला आचारी सर्जीला म्हणतो, ''तू थिओडोरला दिलेले वचन पाळीत नाहीस, हे पाप आहे. निदान एक लाकडी क्रूस तरी उभा कर.'' सर्जी ते मान्य करतो. दुसऱ्या दिवशी तो जंगलात जातो. एका झाडाच्या बुंध्यावर कुऱ्हाडीचे अनेक घाव घालतो, ते झाड थरथरते आणि अखेर कोसळते. हा त्या कथेतील तिसरा मृत्यू. अगदी थोड्या शब्दांमध्ये आपण त्या झाडाच्या संवेदनांचे जे वर्णन केले आहे, ते वाचताना 'निसर्गाशी एकरूप होणे' या शब्दांचा मला नवीनच अर्थ कळला. कुऱ्हाडीच्या घावाने विव्हळ झालेल्या त्या झाडाच्या मृत्यूचे वर्णन वाचताना माझेही मन विव्हळ झाले. या मृत्यूचे इतके आर्त वर्णन थोडक्यात केल्यावर जगाचे रहाटगाडगे चालूच असते, हे दाखवताना आपण लिहिले आहे, 'ते झाड थरथरते, अखेर कोसळते आणि बाजूची झाडे मोकळ्या झालेल्या जागेत त्यांच्या फांद्या पसरतात.'

'वॉर अँड पीस' या आपल्या कादंबरीत आन्द्रे बोल्कोन्स्कीची तरुण पत्नी लिसा प्रसूत होऊन, प्रसूतीतच दगावते. आपण लिहिले आहे, की मरणाच्या यातना असह्य झालेल्या त्या मातेची चर्या जणू म्हणत होती, 'तुमच्या सगळ्यांवर माझं प्रेम आहे. मी कधी कुणाचे वाईट चिंतिले नाही आणि तरीदेखील माझ्याच वाट्याला इतक्या यातना का हो आल्या?' लिसा जणू आन्द्रेला म्हणत होती, 'तुम्ही तरी मला वाचवा हो!' लिसाच्या मृत्यूचे वर्णन करताना आपण मानवी जीवनातील कोमलता आणि मृत्यूची भीषणता यांचे एकाच वेळी जे दर्शन घडविले आहे, त्यामुळे माझे मन सुन्न झाले.

लिसाच्या मृत्यूपेक्षा प्लेटॉं या युद्धकैद्याचा मृत्यू अगदीच वेगळा आणि तरीही तितकाच मनाला भिडणारा आहे. प्लेटॉं हा पूर्वीचा साधाभोळा शेतकरी. रणभूमीवरही तो सर्वांवर सतत प्रेम करीत असतो. आपले मरण जवळ आले आहे, हे त्याला समजलेले असते आणि तरीही तो हसतमुखच असतो. तो पिअरेला म्हणतो, 'नशिबालाच काय ती सत्ता

आहे, असे नाही, साहेब! आल्या प्रसंगाला आपण सुखाचा बनवतो का दु:खाचा बनवतो, याच्यावर सगळं आहे बघा!'' इतर युद्धकैद्यांबरोबर प्लेटाँला चालवत नाही म्हणून त्याला गोळी घालण्यात येते. त्यावेळी प्लेटाँचे मृत्यूपूर्वीचे शब्द आठवून पिअरेला जणू जीवनाचा अर्थ कळतो. आपण मला लिहिलेल्या पत्रातील 'मृत्यूच्या दर्शनाने जीवनाचे नवे आकलन होते,' हे वाक्य वाचताना प्लेटाँचा मृत्यू माझ्या अंत:श्चक्षूंच्या समोर उभा राहिला.

यापेक्षा मृत्यूचे अगदी वेगळे दर्शन आपल्या 'डेथ ऑफ ऑयव्हॅन इलिच' आणि 'मास्टर ॲण्ड मॅन' या दोन कथांमधून होते. आयव्हॅन इलिचचे आयुष्य म्हणजे एका मध्यमवर्गीय सरकारी नोकराचे रटाळ आयुष्य. जन्मभर खोटेपणाशी तडजोडी करीत, भांडकुदळ बायकोबरोबर कसाबसा संसार करणारा, स्वत:च्या कामापेक्षा ब्रीज खेळण्यात रस घेणारा आयव्हॅन इलिच म्हणजे स्वार्थी, आपमतलबीपणाचा नमुना. पन्नाशी उलटल्यानंतरचे त्याचे आजारपण, डॉक्टरांच्या तपासण्या, पोटाच्या दुखण्याच्या वेदनांमुळे त्याचे सतत ओरडणे, हे सारे आपण विस्ताराने का लिहिले आहे, असे मला गोष्टीचा पूर्वार्ध वाचताना वाटत होते; परंतु गोष्टीच्या उत्तरार्धात आयव्हॅनचे ओरडणे इतरांना असह्य होत असताना, आयव्हॅन इलिचचा तेरा-चौदा वर्षांचा मुलगा त्याच्या जवळ येतो, आयव्हॅन इलिचचा हात ओठांजवळ नेतो आणि रडू लागतो आणि आयव्हॅनला एकदम वाटू लागते, की तो आजवर त्याच्या पत्नीच्या, मुलाच्या दु:खाला कारणीभूत झाला, हे बरोबर नव्हते; ही चूक दुरुस्त करायला हवी. असे त्याला मनोमन वाटते. हे त्याला बोलावेसे वाटते. 'फरगिव्ह' हा शब्दही तो अर्धवट 'फर्गो' असा उच्चारतो आणि त्याचे मन भरून येते. इतरांच्यावर प्रेम करण्यात किती आनंद आहे, असे त्याला वाटते आणि मृत्यूची काळीकुट्ट सावली त्याच्या डोळ्यांसमोरून दूर होऊन त्याला प्रकाशकिरण दिसतो. तो स्वत:शीच म्हणतो, 'व्हॉट जॉय?' दोन तासांनी आयव्हॅन इलिचची प्राणज्योत मालवते. या कथेच्या पूर्वार्धातील आयव्हॅन मृत्यू समीप येताच पूर्णपणे बदलूनच जातो. या कथेच्या पूर्वार्धात आयव्हॅन इलिचच्या मित्रांच्या स्वार्थी वागण्याचे, त्याच्या बायकोच्या क्षुद्र मनाचे आपण चित्रण केले आहे. या सर्व आपमतलबी जगातच जगलेल्या, वाढलेल्या आयव्हॅन इलिचचे आत्मकेंद्रित वागणे व मरण जवळ येऊ लागताच भयग्रस्त होऊन ओरडणे आणि मृत्यूपूर्वी थोडा वेळ आपण

इतरांना दु:ख देता कामा नये, ही जाणीव होताच, आयव्हॅनला दिसलेला प्रकाशकिरण, मिळालेली मन:शांती या सर्वांतून आपण मृत्यूचे एक वेगळेच दर्शन घडविले आहे.

'मास्टर अँड मॅन' या आपल्या कथेतील व्हॅसिली आंद्रेव्हिचचा मृत्यू तर मी कधीच विसरू शकणार नाही. हा जमीनदार लोभी, स्वार्थी असतो. एक जमीन त्याला विकत घ्यायची असते आणि स्वस्तात होणारा तो सौदा दुसऱ्या दिवशी करणेच आवश्यक असते म्हणून सेंट निकोलस डे साजरा झाल्याबरोबर व्हॅसिली जमीन विकणाऱ्या तरुण शेतकऱ्याच्या गावाला जाण्यासाठी निघतो. त्याच्याकडे काम करणाऱ्या निकिता या पन्नाशी उलटलेल्या नोकराला तो बरोबर घेऊन घोडागाडीने सायंकाळी निघतो. त्याला जेथे जायचे होते ते गाव फार दूर नव्हते. रस्ताही त्याला सुपरिचित होता, पण बर्फाचे वादळ होऊन तो रस्ता चुकतो. तीन तासांनी एका गावात कसाबसा पोचतो. त्या गावातला एक सुखवस्तू जमीनदार व्हॅसिलीला ओळखत असतो. तो त्याला व निकिताला खाऊ-पिऊ घालतो आणि 'आता रात्रीचे इथे रहा,' असे त्यांना सांगतो; पण व्हॅसिली त्याचे ऐकत नाही. ते निघतात. पुन्हा वाट चुकतात. व्हॅसिलीच्या अंगावर दोन गरम कोट असतात. निकिताचा कोट मात्र जीर्ण फाटका असतो. घोड्याला ते सोडतात आणि गाडीत एकमेकांना मिठी मारून झोपतात. सगळीकडून बर्फ अंगावर येत असतो. निकिताला झोप लागते. व्हॅसिली सकाळ केव्हा होणार, याची वाट पहात असतो आणि आपण मरणार तर नाही ना, असे काहूर त्याच्या मनात उठते. काही क्षणांतच त्याच्या मनातले ते वादळ शमते. व्हॅसिलीला त्याचे पूर्वायुष्य आठवते आणि त्याला अनेक गोष्टी आपण करायला नको होत्या, असे वाटू लागते. निकिता गारठून मरू नये म्हणून तो स्वत:चा कोट त्याच्या अंगावर टाकतो. निकिता खाली झोपलेला असतो आणि व्हॅसिली त्याच्या अंगावर पडून राहतो. त्या क्षणी त्याला कोणाचे तरी 'मी येतोय, मी येतोय' असे शब्द ऐकू येतात, आणि त्याचे मन आनंदाने भरून जाते. व्हॅसिलीला आपण आता मुक्त झालो असे वाटते. त्यानंतर त्याला काही दिसत नाही, ऐकू येत नाही. बर्फ पडतच असतो आणि निकिताच्या अंगावर व्हॅसिली पडून राहतो. दुसऱ्या दिवशी सकाळ झाल्यावर बर्फात रुतलेली ती गाडी पाहिल्यावर आजूबाजूचे शेतकरी धावत येतात. बर्फ बाजूला करून व्हॅसिली आणि निकिताला बाहेर काढतात. व्हॅसिलीचे शवच त्यांच्या हाती लागते. निकिताच्या


शरीरात मात्र थोडी धुगधुगी असते. ते त्याला दवाखान्यात नेतात आणि त्याच्या पायाची तीन बोटे कापावी लागली तरी तो जगतो. व्हॅसिलीच्या मृत्यूचे आपण केलेले वर्णन, निकिताचे प्राण वाचवण्याची धडपड करतानाच त्याला मरण्याची भीती वाटेनाशी होणे आणि इतरांसाठी जगण्यात आणि दुसऱ्यासाठी मरण्यातही आनंद आहे, हे सत्य गवसताच व्हॅसिलीच्या मनाचे झालेले उन्नयन– हे मी कधी विसरू शकणार नाही.

या सर्व मृत्यूंच्यापेक्षा मनाच्या विकल अवस्थेत स्वत:ला रेल्वे गाडीखाली झोकून देणाऱ्या ॲनाचा मृत्यू अगदीच वेगळा आहे. त्याचे विवेचन करण्याचे सामर्थ्य मजजवळ नाही; परंतु एपिग्राफ़मध्ये गॉस्पेलमधील 'व्हेंजन्स इज माईन, आय शॅल रीपे' हे जे शब्द आपण उद्धृत केले आहेत, ते वाचताना ॲनाच्या मृत्यूतील नियतीची अपरिहार्यता मला उमगली आणि आपण नियतीच्या हातांतील खेळणी आहोत, हे थॉमस हार्डीचे शब्दही आठवले.

आपण प्रत्यक्ष जीवनात पाहिलेल्या मृत्यूंचे वर्णन वाचताना आणि आपल्या कथा-कादंबऱ्यांतून आपण चित्रित केलेल्या मृत्यूच्या वेगवेगळ्या रूपांचा विचार करताना मला आपण पत्रामध्ये लिहिलेल्या वाक्याचे आकलन झाले, असे वाटते.

आपला नम्र,

ग. प्र. प्रधान



६.

अमर कलाकृती : 'ॲना कॅरिनिना'

आदरणीय लिओ टॉलस्टॉय,

सादर प्रणाम.

एखादे गाणे आपण ऐकतो आणि त्यात स्वत:ला हरवून बसतो. ते गीत आयुष्यात कितीही वेळा ऐकले, तरी आपल्या मनाला त्या गीतातील शब्दांचा आणि सुरांचा स्पर्श झाला की आपण मंत्रमुग्ध होतो. आपली 'ॲना कॅरिनिना' ही कादंबरी आज चौथ्या वेळा वाचताना मला हाच अनुभव आला. सतराव्या वर्षी, कॉलेजमध्ये विद्यार्थी असताना मी ती प्रथम वाचली. त्यानंतर अध्यापन करताना मी ती दोन वेळा वाचली आणि आजही ती वाचताना पहिल्या वेळेप्रमाणेच मी आपल्या या अमर कलाकृतीमध्ये स्वत:ला हरवून बसलो.

'सुखी कुटुंबे एकसारखीच असतात. परंतु प्रत्येक दु:खी कुटुंबाचे दु:ख मात्र अगदी वेगळ्या प्रकारचे असते.' 'ॲना कॅरिनिना' या कादंबरीतील या पहिल्याच वाक्यामुळे आपण एका दु:खी कुटुंबाच्या दुर्दैवी जीवनात प्रवेश करणार आहोत, असे मला वाटले. परंतु सुरुवातीच्या ज्या एका कौटुंबिक कलहाचे आपण वर्णन केले आहे, ते खऱ्या अर्थाने दु:ख नव्हतेच. स्टीफन आणि त्याची पत्नी यांचे स्टीफनच्या एका लफड्यामुळे भांडण झालेले असते आणि ते मिटविण्यासाठी स्टीफनने त्याची बहीण ॲना हिला बोलावलेले असते. ॲना कादंबरीत प्रवेश करते, ती एक प्रगल्भ, विवाहित स्त्री म्हणून; परंतु तिच्या जीवनात एक अनपेक्षित वादळ सुरू होते आणि अल्पकाळातच ॲना आणि व्हॉन्स्की या प्रेमाच्या आवर्तात कसे सापडतात, ते आपण दाखविले आहे. ॲनाच्या वरवर शांत, समाधानी वाटणाऱ्या वैवाहिक जीवनाच्या अंतरंगात धुमसणारा अतृप्ततेचा अग्नी, व्हॉन्स्कीबद्दल तिच्या मनात उफाळलेली प्रेमभावना, प्रेमसाफल्यामुळे तिला काही काळ लाभलेला अनिर्वचनीय आनंद आणि त्या आवेगात तिचे

पतीला आणि मुलालाही सोडून प्रियकराकडे राहायला जाणे, उच्चभ्रू समाजातील दांभिक जीवनाच्या सापळ्यात ॲनाच्या मनाची झालेली घुसमट, आपण सर्वस्व देत असताना व्हॉन्स्की मात्र पहिल्यासारखा उत्कट प्रतिसाद देत नाही, या शंकेमुळे तिच्या मनाची होणारी तडफड आणि मनाच्या या विकल अवस्थेत तिने केलेला आत्मघात, ही सुख-दु:खाच्या, आशा-निराशेच्या सूक्ष्म धाग्यांनी विणलेली ॲनाची शोकपर्यवसायी जीवनकथा अविस्मरणीय आहे.

विस्मयकारक तफावत

या कादंबरीत रशियाच्या समाजजीवनातील एकमेकांपेक्षा अगदी भिन्न असलेल्या दोन स्तरांचे अत्यंत वास्तव चित्रण आपण केले आहे. या दोन्ही स्तरांतील लोकांच्या जीवनशैलीतील तफावत विस्मयकारक आहे. एकीकडे शहरात राहणाऱ्या श्रीमंत, ऐदी, उच्चभ्रू समाजाची दांभिकता आणि खोटेपणा आहे; तर दुसरीकडे ग्रामीण भागातील शेतकरी समाजाचे मोकळेढाकळे अकृत्रिम जीवन आहे. ॲनाचा भाऊ स्टीफन आणि ॲनाचा नवरा कारेनिन यांची आत्मकेंद्रित वृत्ती आणि त्यांच्या वागण्यातील खोटेपणा मनाला उबग आणणारा आहे. कारेनिनला स्वत:ची अधिकाराची जागा, प्रतिष्ठा यांपलीकडे काही समजतच नाही. त्यामुळे त्याची पत्नी ॲना हिचे जीवन नीरस, रूक्ष होऊन गेले आहे. दुसऱ्या टोकाला शहरी डामडौलाने बुजणाऱ्या आणि शेतीमध्ये श्रम करण्यात रमून जाणाऱ्या लेव्हिन या जमीनदाराचे निरागस जीवन आहे. शहरी लोकांना लेव्हिनचे वागणे अरबूज, गावंढळ वाटले तरी लेव्हिनच्या जीवनातील निर्मळपणा आणि चैतन्याचा अंत:प्रवाह हेच त्यांच्या जीवनाचे खरे वैशिष्ट्य आहे, हे आपण दाखविले आहे. आपल्या कुशल कुंचल्याने समाजाच्या या दोन्ही स्तरांतील जीवनाच्या साऱ्या छटा रंगवतानाच आपण असेही दाखविले आहे, की परस्परांपेक्षा अगदी वेगळे असणारे स्टीफन आणि लेव्हिन हे दोस्त आहेत. एकमेकांच्या उणिवा समजत असूनही त्यांच्यामध्ये मैत्री आहे. या दोन टोकांच्या समाजाच्या अंतरंगाची वैशिष्ट्ये दाखवतानाच आपण तेथील सुख-दु:खांतील मूलभूत फरकही स्पष्टपणे चित्रित केला आहे. लेव्हिन आणि किटी यांच्या समाधानी कौटुंबिक जीवनामुळे आणि मुख्यत: निसर्गाशी लेव्हिनच्या जीवनाच्या झालेल्या एकरूपतेमुळे माझ्या मनाला मंद शीतल वाऱ्याच्या झुळुकीचा सुखद स्पर्श झाल्यासारखे वाटले.

'ॲना कॅरिनिना' या आपल्या कादंबरीचा आणखी एक पैलू मला जो भावला, त्याचा मी उल्लेख करू इच्छितो. ॲना आणि व्हॉन्स्की एकमेकांच्या प्रेमात पडले तरी त्या दोघांच्या प्रेमाच्या वेगवेगळ्या स्वरूपांचे चित्रण करताना स्त्री आणि पुरुष यांच्या जीवनात प्रेमाचे स्थानच वेगळे असते, हे आपण दाखविले आहे. ॲनाच्या व्हॉन्स्कीवरील प्रेमाने तिचे सर्व जीवनच व्यापून टाकले होते, म्हणून तिच्या मुलालाही सोडून ती व्हॉन्स्कीची मिस्ट्रेस म्हणून त्याच्या घरी राहायला जाते, आणि यामुळेच ती व्हॉन्स्कीवर सारखा हक्क गाजवत असते. ती कमालीची 'पझेसिव्ह' बनते. व्हॉन्स्कीचे ॲनावर उत्कट प्रेम असले, तरी त्याचे प्रेम हा त्याच्या जीवनाचा एक भाग असतो. त्याचे घोड्यांवरील प्रेम, सेनेत अधिकारी होण्याची त्याला मिळत असलेली संधी, यांनाही त्याच्या जीवनात स्थान आहे. त्यामुळे ॲनाच्या 'तू मला सर्वस्वी हवास', या वृत्तीमुळे तो चिडतो, नाराज होतो. ॲना आणि व्हॉन्स्की यांच्या प्रेमाची शोकपर्यवसायी कथा ही एका अर्थाने ॲनाच्या व्यक्तिजीवनाची कहाणी आहे आणि त्याचवेळी त्या कथेतील स्त्री व पुरुष यांच्या प्रेमाच्या वेगवेगळ्या स्वरूपाचे चित्रण हे प्रातिनिधिक स्वरूपाचे आहे. एकाच वेळी असे चित्रण हे आपल्यासारख्या महान लेखकालाच शक्य झाले.

'ॲना कॅरिनिना'बद्दल मी अधिक काही लिहिण्यापेक्षा दोस्तोव्हस्की यांच्या या कादंबरीवरील लेखाबद्दल मला लिहावेसे वाटते. दोस्तोव्हस्की हे आपल्यापेक्षा वेगळ्या दृष्टीने जीवनाकडे पाहणारे आणि आपल्यापेक्षा अगदी वेगळ्या रीतीने कादंबऱ्या लिहिणारे एक श्रेष्ठ लेखक. दोस्तोव्हस्की यांनी 'ॲना कॅरिनिना' वाचल्यानंतर त्यांचे जे मनोगत एका लेखात व्यक्त केले आहे, ते मी पूर्वी वाचले नव्हते. अलीकडेच मी ते वाचले, तेव्हा मला त्या लेखामध्ये आपण आणि दोस्तोव्हस्की या दोन महान लेखकांमधील संवादच जणू ऐकू आला. दोस्तोव्हस्की यांनी त्यांच्या लेखाला 'रशियन व्ह्यू ऑफ ह्यूमन गिल्ट अँड क्राइम' असे शीर्षक दिले असून आपण रशियाच्या अंतरंगाचे उद्गाते आहात, असे म्हटले आहे. दोस्तोव्हस्की यांनी त्या लेखात लिहिले आहे, ''मानवी मनात सत्यापासून आणि नैतिकतेपासून विचलित होण्याची दुष्ट प्रेरणा खोलवर दडलेली असून तिच्यामुळेच माणसांच्या हातून पाप घडते. टॉलस्टॉय यांनी मानवाच्या स्खलनशीलतेचे आणि सुष्टदुष्ट प्रेरणांचे अत्यंत सूक्ष्म आणि वास्तव चित्रण करून माणसांच्या अंत:करणातील विवरांच्यावर जो प्रकाश टाकला आहे, तो केवळ अद्वितीय

आहे.'' दोस्तोव्हस्की यांनी असे लिहिले आहे, की जीवनाची पुनर्रचना केल्याने मानवाच्या मनातील दुष्ट प्रेरणांचे निर्मूलन होऊ शकणार नाही. 'मानवी मनातील सुष्ट-दुष्ट प्रेरणांची गुंतागुंत ही शास्त्रज्ञांना आजवर उमगलेली नाही,' असे विधान करून दोस्तोव्हस्कींनी म्हटले आहे, की माणसाच्या मनात उफाळणाऱ्या स्वाभाविक ऊर्मी, त्यातून घडणारे पाप आणि मनाचा होणारा अध:पात यांचे 'ॲना कॅरिनिना'मध्ये आपण केलेले चित्रण विलक्षण वास्तव असून, त्याचे स्वरूप उत्तुंग भीषण (प्रोफाउंडली टेरिबल) आहे. माणसाच्या अंतरात्म्याचे वर्णन आपण ज्या भेदकतेने आणि कलात्मकतेने केले आहे, तसे अन्य कोणाही लेखकाने केलेले नाही, असे दोस्तोव्हस्की यांनी या लेखात लिहिले आहे.

'ॲना कॅरिनिना'मध्ये आपण गॉस्पेल्समधील 'व्हेंजन्स इज माईन, आय शॅल रीपे' हे जे वचन एपिग्राफ म्हणून लिहिले आहे, ते उद्धृत करून दोस्तोव्हस्की यांनी त्यांच्या लेखात लिहिले आहे, ''या जगात जे अज्ञात आहे ते फक्त परमेश्वरच जाणतो आणि माणसाच्या दैवात अखेरीस काय आहे ते त्यालाच समजते. त्यामुळे त्यालाच 'व्हेंजन्स इज माइन, आय शॅल रीपे'' म्हणण्याचा अधिकार आहे.' दोस्तोव्हस्की यांनी पुढे लिहिले आहे, 'आपण माणसाच्या अध:पाताचे चित्रण अशा रीतीने केले आहे की, ते वाचताना न्यायनिष्ठुर रीतीने जीवनाकडे पाहणाऱ्या माणसाचे मनही स्तिमित होईल आणि तो म्हणेल, की ॲनला तिच्या अध:पाताबद्दल दोषी ठरविण्याचा अधिकार माणसाला नाही. 'व्हेंजन्स इज नॉट माईन अँड आय शॅल नॉट रीपे.'

विवाहित स्त्रीच्या मनात अन्य पुरुषाबद्दल उद्भवलेल्या प्रेमभावनेमुळे तिच्या जीवनात उठणारे चक्रीवादळ आणि त्यामुळे तिच्या जीवनाची होणारी शोकांतिका, असे कथानक असलेल्या काही कादंबऱ्या मी वाचल्या आहेत. परंतु आपली 'ॲना कॅरिनिना' ही कादंबरी या अन्य कादंबऱ्यापेक्षा अगदी वेगळी असलेली, श्रेष्ठ असलेली कलाकृती आहे, असे मला स्थूलपणे जाणवले होते. तरीही दोस्तोव्हस्की यांचा लेख वाचल्यावर मला आपल्या कादंबरीचे अनोखे दर्शन घडले. 'ब्रदर्स कारमाझॉव्ह'सारख्या कादंबऱ्या लिहिणाऱ्या महान लेखकाच्या विवेचनामुळे माझे मन दिपून गेले आणि मी जाणकार रसिक वाचक आहे, हा माझा अहंकार पूर्णपणे गळून पडला.

आपला नम्र,

म. श्री. शेंडे



७.

साहित्यातील मानदंड : 'वॉर अँड पीस'

आदरणीय लिओ टॉलस्टॉय,
सादर प्रणाम.

आपल्या 'वॉर अँड पीस' या अद्वितीय कादंबरीमुळे जागतिक साहित्यात आपले स्थान अढळ झाले आहे. काळाचा प्रवाह पुढे जातो, त्याप्रमाणे प्रत्येक पिढीचे साहित्यातील आदर्श बदलतात. परंतु काही साहित्यकृती मात्र अशा आहेत, की साहित्यातील प्रवाहांचे स्वरूप कितीही बदलले, अभिरुचीमध्ये कितीही फरक पडला, तरी त्या साहित्यकृती या साहित्यातील मानदंड म्हणून कायम मानल्या जातात. आपली 'वॉर अँड पीस' ही कादंबरी, हा असाच जागतिक वाङ्मयातील मानदंड आहे. जगातील सर्व प्रमुख भाषांमध्ये 'वॉर अँड पीस'ची भाषांतरे झाली आहेत आणि जगातील सर्व थोर समीक्षकांनी त्या कादंबरीचे विश्लेषण आणि रसग्रहण केले आहे. त्यांच्यापेक्षा मी अधिक काय सांगू शकणार? तरीही मला थोडे काही लिहावेसे वाटते. कारण आपल्यासारख्या महान लेखकाशी एक वाचक म्हणून माझे जे जिव्हाळ्याचे नाते आयुष्यभर टिकले आहे, त्याचे एक प्रमुख कारण या कादंबरीत आपण चित्रित केलेला जीवनाचा विशाल पट, हे आहे. मी कॉलेजमध्ये विद्यार्थी असताना 'वॉर अँड पीस'ची संक्षिप्त आणि तरीही सहाशे पृष्ठांहून मोठी असलेली आवृत्ती वाचली. पुढे अध्यापन करताना मी संपूर्ण कादंबरी शांतपणे वाचली आणि श्रेष्ठ समीक्षकांनी आणि ललित लेखकांनीही या कादंबरीचे विस्तृत विवेचन करताना तिला 'गद्य महाकाव्य' म्हणून जे गौरविले होते, त्याबद्दल मराठीतील श्री.के.क्षीरसागर या थोर समीक्षकांशी खूप वेळ चर्चा करून त्यांचा दृष्टिकोनही समजून घेतला. माझे एक मित्र प्रा.आ.ना.पेडणेकर यांनी या कादंबरीचा मराठीत अनुवाद केला आहे. या अनुवादाचे काम करीत असताना आम्ही वारंवार

भेटत होतो आणि 'वॉर अँड पीस'मधील वैशिष्ट्यांची आणि अनेक सौंदर्यस्थळांची चर्चा करीत असू. त्या वेळी आपल्या मनात ही कलाकृती कशी घडली असेल, याचे मी दीर्घकाळ चिंतनही केले. आपण १८६४च्या नोव्हेंबरमध्ये आपल्या एका मित्राला जे पत्र लिहिले आहे, त्यात आपण लिहिले आहे, ''ज्या शेतात मला पेरणी करायची आहे, ते नांगरताना मी किती श्रम करतो आहे, याची तुला कल्पनाही येऊ शकणार नाही.''

१८०५ ते १८१२ या काळात नेपोलियनने रशियावर स्वारी केली होती. या कालखंडाचा अभ्यास करण्यासाठी मॉस्कोच्या ग्रंथालयांमधील अनेक पुस्तके आणि हस्तलिखिते आपण वाचलीत. ज्या भागात हे युद्ध झाले होते, तेथे आपण गेलात आणि राहिलात. तत्कालीन रणभूमीवरही आपण फिरलात. स्कोनोग्राबीन, ऑस्टरलिट्झ आणि बोरोदिनो या ठिकाणी झालेल्या प्रसिद्ध लढायांचे वर्णन आपण केले आहे, त्याबद्दल जनरल मुरॅरॉव्ह या रशियन सेनापतीने लिहिले आहे, 'मी रणांगणात असताना मला जे दिसले त्यापेक्षा 'वॉर अँड पीस' वाचताना मला युद्धभूमीचे अधिक स्पष्ट दर्शन झाले. इतके वास्तव वर्णन मी अन्य कुठल्याही पुस्तकात-सेनेतील अधिकाऱ्यांनी लिहिलेल्या पुस्तकांमध्येही– वाचलेले नाही.' नेपोलियनशी युद्ध सुरू असताना एका वर्षी पडलेल्या भीषण दुष्काळात स्मोलेन्स्कहून रशियन सैन्याने जी माघार घेतली, तिचे 'वॉर अँड पीस'मधील वर्णन वाचताना आपण जणू त्या सैन्याबरोबर राहिला होतात, असे मला वाटले. आपले हे वर्णन वाचताना सैनिकांच्या त्या दारूण हालअपेष्टा माझ्यासमोरच घडत आहेत, असे मला वाटले. आपल्या लेखनाचा प्रवाह इतका प्रबळ असतो की, वाचक त्या प्रवाहाबरोबर वाहतच जातो आणि त्याला अन्य कसले भानही उरत नाही. अनेकदा माघार घेत आणि अनेकदा नेपोलियनच्या सैन्याची दमछाक व्हावी, असे डावपेच करीत रशियन सैन्याने अखेर नेपोलियनच्या सैन्याचा जो धुव्वा उडवला आणि रशियाच्या जबरदस्त भीषण हिवाळ्यात फ्रेंच सेना जी गारठली आणि गळाठली त्याचे वर्णन करताना आपण कोठे अतिशयोक्ती तर केलेली नाही; तरीदेखील तो सारा भाग वाचताना त्यातील प्राणहानी, जीवघेणे हाल यांच्या वर्णनामुळे मला 'जळोत असली युद्धे' असा उद्वेग आला आणि कोण जिंकला आणि कोण हरला, यापेक्षा मानवी जीवन उद्ध्वस्त होणे किती भयंकर आहे, हेच आपल्या लेखनातून माझ्या मनावर ठसले. क्रोपोट्किन या थोर

तत्त्वचिंतक लेखकाने ''वॉर अँड पीस'मध्ये युद्धाचा तीव्र आणि प्रभावी निषेध आहे. (पॉवरफुल इंडिक्टमेंट ऑफ वॉर)' असे जे उद्‌गार काढले होते, ते मला मनोमन पटले!

जीवनाचं भव्य दर्शन

युद्ध हा होमरच्या 'इलिअड' या महाकाव्याचा आणि व्यासांच्या महाभारताचाही विषय आहे. आपल्या 'वॉर अँड पीस'मध्येही युद्ध हीच महत्त्वाची घटना आहे. मात्र युद्धाच्या सर्व अंगांचे, त्यात केंद्रस्थानी असलेल्या सेनानींचे, सामान्य सैनिकांचे आणि भोवतालच्या समाजाचे चित्रण करतानाच रोस्टोव्ह आणि बोल्कोन्स्की अशा दोन कुटुंबांच्या जीवनावर युद्धाचा काय परिणाम झाला, हे अनेक प्रसंगांतून दाखवीत, मानवी जीवनाच्या अखंड वाहणाऱ्या व्यामिश्र स्वरूपाचे आपण भव्य दर्शन घडविले आहे. एका वादळी कालखंडातील ऐतिहासिक महत्त्वाच्या घटना आणि कौटुंबिक जीवनातील मानवी स्वभावाच्या विविध छटा दाखवणारे बोलके प्रसंग यांची अपूर्व गुंफण आपण 'वॉर अँड पीस'मध्ये केली आहे. त्यामुळेच ही एक ऐतिहासिक कादंबरी न होता, ते एक गद्य महाकाव्य झाले आहे. या कादंबरीत कोमलता, निरागसता, याचप्रमाणे दुष्टपणा, कपटीपणा यांचे चित्रण आपण केले आहे. नताशाला आपल्या जाळ्यात ओढू पाहणारा कावेबाज अनातोले आहे आणि त्याचबरोबर अनेकदा लहान मुलासारखा बालिशपणे वागणारा सरळ मनाचा पिअरेही आहे. नेपोलियन आणि जनरल कुट्‌झॉफसारखे इतिहासाला वळण देणारे धुरंधर सेनाप्रमुख आहेत आणि प्लेटॉँसारखा माणसांवर प्रेम करणे म्हणजे ईश्वराची भक्ती करणे आहे, असे मानणारा विशाल अंत:करणाचा सैन्यात गेलेला शेतकरीही आहे. आपल्या कादंबरीत अनेक व्यक्ती आहेत, पण माझ्यासारख्या वाचकाचा कधी गोंधळ उडत नाही. कारण आपण रेखाटलेली कोणतीही व्यक्तिरेखा अस्पष्ट वा धूसर नाही. रणांगणाकडे मन सारखे ओढ घेत असल्यामुळे पत्नीबद्दल काहीसा दुरावा मनात निर्माण झालेला आंद्रे आहे आणि घरकुलात गुरफटलेली, आंद्रेवर प्रेम करण्यात स्वत:ला हरवून बसलेली लिसाही आहे. दोन राष्ट्रांतील तीव्र संघर्ष आणि संसारातील सुख-दु:खे ही वस्तुत: दोन टोके; परंतु आपण विलक्षण कुशलतेने त्यांचा गोफ विणला आहे. 'वॉर अँड पीस'मधील प्रत्येक प्रसंग मनाचा वेध घेणारा आहे आणि प्रत्येक व्यक्तीचे वागणे, बोलणे इतके

जिवंत असते, की वाचताना ते प्रसंग आणि ती माणसे माझ्या डोळ्यांसमोर उभी राहत असतात. आपण या व्यक्तींच्या मनातील भावनांच्या छटा, विचारांचे कल्लोळ दाखवतानाच त्यांच्या विशिष्ट शारीरिक लकबीही दाखविल्या आहेत. स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाची सतत जाणीव असलेल्या म्हाताऱ्या बोल्कोन्स्कीला डावा खांदा उडविण्याची सवय आहे. घटनांच्या ओघातून 'वॉर अँड पीस'चे कथानक नदीसारखे पुढे जात असते. ते नाट्यपूर्ण करण्याचा किंवा त्याचा आकृतीबंध करण्याचा प्रयत्नही न करता आपणही 'दिक्' आणि 'काळ' यांना कवेत घेतले आहे. कादंबरी या वाङ्मय प्रकाराच्या तंत्राचा आपण विचार करीत नाही, कारण प्रज्ञेच्या मंत्राची सिद्धी आपल्याला प्राप्त झालेली आहे. म्हणूनची पर्सी लबॉक यांनी लिहिले आहे, की 'वॉर अँड पीस' मध्ये कला दिसेनाशी होऊन साक्षात जीवनच आपल्यासमोर उभे राहते.

पिअरे आणि नताशा यांच्या जीवनातील तारुण्यसुलभ मोहाचे क्षण, त्यांच्या भावनांची उत्कटता आणि ते काहीही करोत, कसेही वागोत; त्यांच्या मनाचा अंगभूत निर्मळपणा हे ज्या सहजसुंदरपणे आपण रेखाटले आहे, त्यामुळे मी त्या दोन्ही व्यक्तिरेखांशी तन्मय होऊन गेलो. आंद्रेची व्यक्तिरेखाही विलक्षण प्रभावी आहे. युद्धभूमीवर मनाच्या धुंद अवस्थेत शत्रुसैन्यावर धावून जाणारा आंद्रे, लढाईत जबर जखमी झाल्यावर विव्हळणारा आंद्रे आणि काही काळ शुद्ध हरपली तरी शुद्धीवर आल्यावर निसर्गातील नीरव शांततेने स्तिमित झालेला आंद्रे मला विलक्षण वित्तवेधक वाटला. जखमी होऊन आंद्रे मूर्च्छित पडतो आणि नंतर काही वेळाने शुद्धीवर येऊन डोळे उघडतो, तेव्हा त्याला दिसते फक्त आकाश... अनंत आकाश आणि त्यात संथपणे तरंगणारे करडे ढग. आंद्रेला वाटते, 'धावपळ करून ओरडणाऱ्या, भांडणाऱ्या आम्हा माणसांपेक्षा किती वेगळे आहेत हे ढग! इतके दिवस कसे दिसले नाहीत मला हे ढग? हे अथांग आकाश हेच तेवढे सत्य आहे. ही शांतता आणि स्तब्धता... केवढी ही परमेश्वराची कृपा!' हे वाचताना मला आंद्रेच्या आत्म्याचे जणू दर्शन झाले आणि आपल्या कादंबरीच्या शीर्षकाचा अर्थ एकदम उमगला. 'पीस' या शब्दाला राजकीय अर्थ नाही. आपण युद्धानंतरच्या तहाचे वा राजकीय आघाडीवरील शांततेचे वर्णन केलेले नसून, माणसाच्या आंतरिक शांततेचे अविस्मरणीय चित्रण केलेले आहे. आपल्याच लेखनाबद्दल आपल्याला सांगणे उचित नाही हे मला कळते,

पण आज 'वॉर अँड पीस' संपवताना माझ्या मनात जे उचंबळून आले, ते व्यक्त केल्याशिवाय मला राहवत नाही.

मानवी मनातले समर प्रसंग


'वॉर अँड पीस'च्या कथानकाच्या दृष्टीने एक गौण असलेला माणूस प्लेटाँ याच्या भोवती माझे मन कितीतरी वेळ रुंजी घालत होते. जखमी अवस्थेत युद्धकैदी म्हणून त्याची फरफट चालू असते. परंतु यातना भोगतानाही त्याचे मन इतरांविषीच्या प्रेमाने तुडुंब भरलेले असते. गोड शब्द, प्रसन्न हास्य, स्वतःच्या हालअपेष्टा विसरून इतरांच्या कष्टमय जीवनातील दुःख कमी करण्याची त्याची धडपड, हे सारे माझ्या मनाला जाऊन भिडले. इतरांच्या बरोबर प्लेटाँला चालवेना, तेव्हा त्याला गोळी घालून मारण्यात येते. त्या वेळी दोघा फ्रेंच सैनिकांच्या मुद्रेवरील अपराधित्वाचा भाव आणि प्लेटाँच्या कुत्र्याचे रडणे यांचा पिअरेच्या मनावर जसा परिणाम होतो, तसाच परिणाम माझ्या मनावरही झाला. प्लेताँच्या मृत्यूने माझ्या काळजाचा ठाव घेतला.

'वॉर अँड पीस'मध्ये आपण प्रत्यक्ष समरभूमी आणि मानवी मनाच्या समरभूमीवरील अनेक समरप्रसंग एकाच वेळी दाखविले आहेत. आसन्नप्रसव लिसाच्या विकल भावनांचे वर्णन, पती-पत्नींच्या मनात एकमेकांबद्दलच्या संशयाचे उठलेले काहूर, पिअरे आणि नताशा यांच्या जीवनातील अनेक खाचखळगे आणि शेवटी त्यांना लाभलेले शीतल संसारसुख, हे मी कधीच विसरू शकणार नाही.

काळ जसाजसा पुढे सरकतो तसतसे जीवनाचे रूप बदलते, हे 'वॉर अँड पीस'मध्ये सतत जाणवते. कादंबरीच्या सुरुवातीस युद्धावर जाण्यास उत्सुक असलेला आंद्रे, पुढे त्याला लढाईत आलेला मृत्यू आणि कादंबरीच्या शेवटी भेटणारा आंद्रेचा मुलगा; सुरुवातीची पोरसवदा नताशा, तरुणपणीची मोहविवश नताशा आणि कादंबरीच्या अखेरीस माता झाल्यावर प्रौढपणे वावरणारी नताशा, हे सारे वाचताना एका समीक्षकाने काढलेला उद्गार 'ही कादंबरी नाही, हे जीवन आहे,' हे किती सार्थ आहे, याचा मला प्रत्यय आला.

आपला नम्र,

ग. प्र. प्रधान



८.

'डिसेंबरिस्ट' : न लिहिलेली कादंबरी

आदरणीय लिओ टॉलस्टॉय,
सादर प्रणाम.

आपण 'ॲना कॅरिनिना' लिहून पूर्ण केल्यानंतर 'डिसेंबरिस्ट' ही कादंबरी लिहायला घेतलीत, परंतु आपण हे लेखन अर्धवट सोडले. ही कादंबरी आपण लिहून पुरी करावयास हवी होती, असे मला तीव्रतेने वाटते. याचे कारण ज्या अनुभवावर आधारलेली ती कादंबरी होती, तसाच अनुभव मलाही आला. अर्थात आपल्या आणि माझ्या भूमिकेत फरक होता. परिस्थिती, व्यक्ती, चळवळ समजून घ्यावयाची, अशी माझी नम्र भूमिका होती. आपणाला परिस्थितीचे, व्यक्तींचे आणि चळवळींचे आकलन झाले होते आणि आपण कादंबरी लिहिताना वास्तव जीवनाचे चित्र रेखाटताना अप्रत्यक्षपणे त्यावरील आपले भाष्य सांगणार होतात.

१८७० ते १८८० या दशकात रशियात जी परिस्थिती होती, तिच्यामुळे आपण अत्यंत अस्वस्थ होता. एका बाजूला असंख्य लोक दारिद्र्यात होरपळून निघत होते आणि त्याचवेळी मूठभर श्रीमंत ख्यालीखुशालीने जगत होते. झारची राजसत्ता आणि त्याला मदत करणारी नोकरशाही श्रीमंतांच्याच बाजूची होती, आणि त्यामुळे कष्टकरी जनतेवर भयंकर अन्याय होत होते. याची तीव्र प्रतिक्रिया ज्या चळवळीतून उमटली, तिच्या नेत्यांना 'डिसेंबरिस्ट' म्हणत होते. त्यांच्या 'Towards the People' लोकांकडे,' या घोषणेकडे आपणही आकृष्ट झालात. ही चळवळ सुरू झाल्यावर श्रीमंत कुटुंबातील काही स्त्री-पुरुषांना ते स्वत: करीत असलेल्या अन्यायाची जाणीव झाली आणि अपराधित्वाची भावना त्यांच्या मनात तीव्र झाल्यावर ते या चळवळीत सामील झाले. ते कष्टकऱ्यांसारखे श्रम करीत. साधेपणाने जगत आणि गरिबांच्या सुखदु:खाशी एकरूप होत. श्रमिकांना अन्यायाविरुद्ध पेटवून

उठविण्याच्या चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांचे उद्दिष्ट प्रस्थापितांचे वर्चस्व नष्ट करणे, राज्यसत्तेलाही सुरुंग लावणे आणि जनतेला न्याय मिळवून देणे, हे होते. रशियाच्या झारने ही चळवळ चिरडून टाकण्यासाठी क्रांतिकारकांना दहशत बसविण्यासाठी अनन्वित अत्याचार केले. एका वेळी १९३ जणांना फाशी देण्यात आले. गरिबांना न्याय मिळावा, असे आपल्यालाही वाटत होते. क्रांतिकारकांना फाशी देणाऱ्या झारविरुद्ध आपण संतप्त झालात. या चळवळीतील काही जणांना आपण भेटलात. तेव्हा फ्रेंच राज्यक्रांती अपयशी झाल्यानंतर जे काही जण रशियात आले होते, त्यांच्या विचारांनी रशियातील काही तरुण मंडळी प्रभावित झाली होती आणि त्यांच्याच नेतृत्वाखाली 'डिसेंबरिस्ट' चळवळ चालू झाली होती, असे आपल्याला आढळून आले. गरिबी नाहीशी व्हावी, अन्याय दूर व्हावा, असे आपणालाही वाटत होते. परंतु डिसेंबरिस्टांच्या सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने हे साध्य होणार नाही, असे आपल्याला मनोमन वाटल्यामुळेच आपण 'डिसेंबरिस्ट' या कादंबरीचे लेखन अर्धवट ठेवले.

मी आमच्याकडील परिस्थितीबद्दल थोडे लिहू इच्छितो. चीनमध्ये १९४९ मध्ये माओ त्से तुंगच्या नेतृत्वाखाली कम्युनिस्ट क्रांती यशस्वी झाल्यानंतर आपण त्याच मार्गाने जावे, असे कम्युनिस्ट पार्टीतील एका गटास वाटू लागले आणि त्यांनी तेलंगणात तेथील गरीब शेतकऱ्यांची आणि शेतमजुरांची जमीनदारांच्या अन्यायाविरुद्ध सशस्त्र चळवळ सुरू केली. त्या वेळी भारत नुकताच स्वतंत्र झाला होता. पं.नेहरूंच्या सरकारने फाळणीनंतर देशात प्रथम शांतता आणून नंतर विकास कार्यक्रम हाती घ्यावा, असे ठरविले असल्यामुळे त्यांनी तेलंगणातील हे बंड सैन्याच्या साह्याने मोडून काढले. मी त्या वेळी हे दुरून पाहत होतो. पुढे १९६५ नंतर मी समाजवादी पक्षात काम करू लागलो. कम्युनिस्ट पक्ष बंगालमध्ये अधिकारारूढ झाल्यावरही शेतकरी व शेतमजूर यांच्यावरील अन्याय फारसे दूर झाले नाहीत. यामुळे अस्वस्थ झालेल्या तरुण कार्यकर्त्यांनी पुन्हा सशस्त्र चळवळ करायचे ठरविले. त्यांना चीनचा सर्वाधिकारी माओप्रमाणेच अमेरिकन साम्राज्यवाद्यांशी निधाराने लढणाऱ्या व्हिएतनामी नेत्यांबद्दल आकर्षण वाटत होते आणि सशस्त्र क्रांतीचाच मार्ग स्वीकारला पाहिजे, अशा निर्णयाप्रत हे आले होते. त्यानंतर १९७०च्या सुरुवातीला बंगालच्या उत्तरेकडील भागात चोवीस

परगणा जिल्ह्यातील नक्षलबारी या गावाजवळच्या भागातील अनेक तरुण एकत्र आले. चारू मुजुमदार हे त्यांना वैचारिक मार्गदर्शन करणारे नेते होते आणि या तरुणांना आणि गरीब शेतकऱ्यांना चारू मुजुमदार यांनी सशस्त्र क्रांतीची दीक्षा दिली होती. आंध्रमधील ओरिसाला लागून असलेल्या तेलंगणातील जिल्ह्यातही शेतमजुरांना, गरीब शेतकऱ्यांना जमीनदारांच्या जुलमांपासून मुक्त करण्यासाठी काही तरुण एकत्र आले होते. नागी रेड्डी या एके काळी मार्क्सवादी कम्युनिस्ट असलेल्या नेत्याने त्यांना सशस्त्र बंडाची प्रेरणा दिली होती. मी नक्षलबारीजवळ चारू मुजुमदार यांना भेटलो. कनु संन्याल या शेतकरी तरुणाशीही बराच वेळ बोललो. तेलंगणातील श्रीकाकुलम जिल्ह्यात सीतारामय्या या भूमिगत चळवळीचे संघटन करणाऱ्या शेतकरी नेत्याला भेटलो. तेथे पीपल्स वॉर ग्रुपचे काम करणारे विशाखापट्टणमचे दोन तरुण डॉक्टरही मला भेटले. त्यांना समजून घेण्याचा मी प्रयत्न केला. या दोन्ही ठिकाणी सशस्त्र क्रांतीच्या ध्येयाने पेटलेल्या तरुणांच्या घोषणा होत्या, 'आमार बारी, तुमार बारी– नक्षल बारी' आणि 'आमार नाम, तुमार नाम– व्हिएतनाम, लाल सलाम.'

'हिंसेचा प्रतिकार हिंसेने करू नये', अशी आपली तात्त्विक भूमिका होती. ही भूमिका मांडण्याचा अधिकार आपल्याला होता. मी एक सामान्य कार्यकर्ता. क्रांतिकारक तरुणांना समजून घ्यावे, इतकीच मर्यादित भूमिका घेऊन मी त्यांच्याबरोबर चर्चा केली. मी कनू संन्यालला म्हणालो, "तुमचे लोक तहसीलातल्या वसुली अधिकाऱ्यांवर आणि जमीनदारांच्या मुनिमांच्यावर हल्ले करतात. ही लहान माणसं एका अन्याय्य समाजव्यवस्थेचा भाग आहेत. अन्याय करणाऱ्या जमीनदारांच्या हातची ती साधनं आहेत. ही साधनं मोडल्यामुळे अन्याय्य व्यवस्था कशी मोडणार? तुमच्या हल्ल्यांमुळे थोडी दहशत काही काळ निर्माण होते; पण तुमच्याजवळ जी शस्त्रं आहेत त्याच्या शतपट शस्त्रं सरकारजवळ आहेत. १९४८ मध्ये तेलंगणातील सशस्त्र उठावाचा निःप्पात करण्यात आला. तसं तुमच्या चळवळीचं होणार नाही का?"


माझ्या या प्रश्नाला चारू मुजुमदार हे क्रांतिकारकांचे नेते समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत; परंतु अनेक ठिकाणी क्रांतिकारक मारले गेले, तरी ही चळवळ नष्ट झालेली नाही. कारण भारतातील अनेक भागांमध्ये आजही आदिवासी समाजावर फार मोठा

अन्याय करणाऱ्या धनदांडग्यांनाच सरकारचे संरक्षण मिळते आणि आदिवासींची आर्थिक पिळवणूक अत्यंत निर्दयपणे केली जाते. या निर्दय पिळवणुकीमुळे पेटून उठलेले गट हिंसेच्या मार्गाने शोषकांविरुद्ध आणि सरकारविरुद्ध लढत आहेत.

आपलाही रशियातील अन्यायाला विरोध होता, त्याचे निर्मूलन व्हावे यासाठी लढणाऱ्या 'डिसेंबरिस्टां'च्या हेतूसंबंधी आपण लिहिलेले नाही; परंतु त्यांच्या हिंसेच्या मार्गाला मात्र आपला विरोध होता. मला असे वाटते, की शांततेच्या मार्गाने जनआंदोलन उभे राहिले नाही, तर दहशतवादी मार्गाने जाणे, हा एकच पर्याय आहे, असे अन्यायाला बळी पडणाऱ्या समाजांना आणि न्याय्य हक्कांसाठी लढणाऱ्या तरुणांना वाटते. रशियातील 'डिसेंबरिस्ट' चळवळीतील अनेक तरुणांना आपली भूमिका निष्क्रियतेची वाटली. मला त्यांचा आपल्यावरील आक्षेप मान्य नाही. आपण चळवळीचे नेतृत्व करणारे राजकीय नेते नव्हता. समाजातील लोकांची सदसद्‌विवेकबुद्धी जागृत करण्याचे महान कार्य आपण करीत होता. म.गांधींनी अहिंसक मार्गाने जनआंदोलन केले; परंतु आज ते घडत नाही. भारत स्वतंत्र झाल्यावरही आदिवासींचे आर्थिक शोषण, त्यांच्यावरील अन्याय चालूच आहेत, हे कटुसत्य आहे. हिंसेला माझा विरोध असला तरी अन्यायामुळे पेटून उठणाऱ्या तरुणांना मी समाधानकारक उत्तर देऊ शकत नाही. म्हणूनच मला आपण 'डिसेंबरिस्ट' कादंबरी पूर्ण करून गरिबांच्यावरील अन्यायाचे निर्मूलन अहिंसक मार्गाने कसे करता येईल, याबद्दलचे आपले मनोगत व्यक्त करावयास हवे होते. जगभर अनेकांना ते मार्गदर्शक ठरले असते. आज जगात जे आर्थिक साम्राज्यवादाचे संकट उभे राहिले आहे, त्याच्याविरुद्ध संघर्ष करणाऱ्या व्यक्तींना आणि संघटनांनाही आपल्या विचारांतून प्रकाशकिरण गवसला असता.

आपला नम्र,

म. प्र. [signature]



१.

सुख आणि जीवनाचा अर्थ

आदरणीय लिओ टॉलस्टॉय,
सादर प्रणाम.

मी आपल्याला लिहिलेल्या पहिल्याच पत्रामध्ये आपल्या साहित्यावर लुब्ध झालेला मी एक वाचक आहे हे सांगितलेच आहे. त्या साहित्याचे वाचन केल्यानंतर, मी आपली आल्मेर मॉड यांनी जी जीवनकथा लिहिली आहे ती वाचली आणि आपल्या साहित्यात ज्याप्रमाणे कलात्मकता आहे, त्याचप्रमाणे आपल्या जीवनाची वाटचालही असामान्य, उदात्त आणि भव्य आहे, हे मला जाणवले. आपले 'रिकलेक्शन्स' हे आत्मकथनात्मक पुस्तक मी वाचले आणि नंतर आपण लिहिलेले 'कन्फेशन्स' हे छोटेसे नव्याण्णव पानांचे आत्मकथन वाचल्यावर मी स्तिमित झालो. अलीकडेच मी 'कन्फेशन्स' पुन्हा दोन वेळा वाचले आणि त्यात आपल्या मनाची जी स्पंदने मला ऐकू आली, त्यांच्यामुळे मीही अंतर्मुख झालो.

आपण 'वॉर ॲण्ड पीस' आणि 'ॲना कॅरिनिना' या कादंबऱ्या लिहिल्यावर साहित्य क्षेत्रात आपल्याला मोठी मान्यता मिळाली. आपण सर्वश्रेष्ठ लेखक आहात, असे टुर्जेनेव्ह आणि दोस्तोव्हस्की या आपल्या समकालीन असलेल्या दोन अगदी वेगळ्या पद्धतीच्या महान लेखकांनी म्हटले. चिकित्सक समीक्षकांनीही आपला गौरव केला. आपले कौटुंबिक जीवन सुखी-समाधानी होते. आपल्या पत्नीचे आपल्यावर उत्कट प्रेम होतेच आणि आपल्या साहित्याबद्दलही त्यांना विलक्षण आस्था होती. आपली पत्नी आणि मुले यांच्यामुळे घरात आनंदी, खेळकर वातावरण होते. आपल्याकडे असलेल्या जमीन-जुमल्यामुळे प्रपंच चालण्यात कसलीच अडचण नव्हती; इतकेच नव्हे, तर आपण वैभवशाली जीवनच जगत होता. सारी सुखे आपल्या दाराशी जणू हात जोडून उभी होती आणि एक दिवस संध्याकाळ उलटल्यावर जिना चढताना आपण थांबलात आणि

वर उभ्या असलेल्या आपल्या पत्नीला म्हणालात, ''मी वाट चुकलो असे मला वाटते.'' हा उद्‌गार ऐकताच आपल्या पत्नीला आपल्या प्रकृतीबद्दल काळजी वाटली. प्रकृती तर ठीक होती, परंतु नंतर काही दिवस आपण नेहमीप्रमाणे उत्साहाने जगण्याऐवजी विमनस्क अवस्थेत शून्यात पाहात असायचे. आपल्याला आपल्या जीवनाचा रस्ता चुकला, असे वाटू लागले होते. आपण लिहिले आहे, की सगळी सुखे मिळत होती, आणि तरीही आपण स्वत:ला विचारीत होतात– ''सो व्हॉट?'' सुखे मिळाली; पण त्यांचे प्रयोजन काय? पुढे काय? सारे काही अर्थशून्य आहे, असे आपल्याला वाटू लागले. अशा मन:स्थितीत आपण ''कन्फेशन्स'' लिहिले आहे. आपण एका धनवान कुटुंबात जन्मलात. बलदंड शरीर, प्रखर बुद्धिमत्ता आणि असामान्य संवेदनशील मन आपल्याला निसर्गाने दिले. विद्यापीठात शिकत असताना, आणि नंतर सैन्यात नोकरी करीत असताना ख्यालीखुशालीत जगत असताना आपल्या हातून जे प्रमाद घडले त्याची ''कन्फेशन्स'' या पुस्तकात आपण प्रांजळपणे कबुली दिली आहे. आपल्यासारख्या सुस्थितीतील अन्य तरुणांप्रमाणेच देव-धर्म यांचा गंभीरपणे विचार करण्याची आपल्याला जरूरच भासली नाही. कॉकेशसमध्ये गेला असताना आदिम प्रकृतीच्या लोकांचे जीवन आपण पाहिले. क्रिमिअन युद्धात सैन्यात काम करताना आपण एक नरसंहार पाहिला. आपण युरोपमध्ये गेलात. अनेक अनुभव घेतले, ते घेतानाच वाचन केले. आपल्यातील कलावंताला लेखनातून अभिव्यक्ती करताना साफल्य लाभले. यास्नाया पोल्यानाला शेतात स्वत: काम करताना, आपल्या जमिनीवर कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांचे साधे, गरिबीचे, पण समाधानी जीवन आपण पाहिलेत. शिक्षणक्षेत्रात आपण काही प्रयोग केलेत. असे अनुभवसंपन्न जीवन जगताना, कीर्ती, कौटुंबिक स्वास्थ्य मिळाले असताना आपण सुखात गुरफटून न जाता अस्वस्थ झालात, अंतर्मुख झालात आणि आपल्या जीवनाला वेगळीच कलाटणी मिळाली. हे खरे, की आपल्या यापूर्वीच्या आयुष्यातही या तऱ्हेच्या परिवर्तनापूर्वीच्या अस्फुट खुणा उमटल्या होत्या. आपले ''सेव्हॅस्टोपोल इन मे'' आणि ''सेव्हस्टोपोल इन ऑगस्ट' हे वाचतानाच मला आपल्या मनातील अशांततेचे प्रारंभीचे काही सूर ऐकू आले होते.

जीवन अर्थशून्य वाटू लागल्यावर ते संपवावे, त्याचा शेवट करावा असे विचारही आपल्या मनात आले. परंतु ते निग्रहाने बाजूला सारून

आपण जगातील विचारवंतांच्या साहाय्याने जीवनाचा अर्थ सापडतो का, ते पाहू लागलात. आपण भौतिक शास्त्रे आणि सामाजिक शास्त्रे यांवरील अधिकारी विद्वानांचे ग्रंथ वाचलेत. त्यांनी त्यांच्या क्षेत्रांतील अनेक प्रश्नांची उत्तरे दिली होती. ती महत्त्वाची होती; परंतु त्यांच्यामधून जीवनाचे उद्दिष्ट काय, या प्रश्नाचे आपल्याला उत्तर मिळाले नाही. आपण सॉक्रेटिस, सॉलोमन, शोपेनहॉर, बुद्ध आदींचे लेखन वाचले. या सर्व थोर तत्त्वचिंतकांनी जीवनातील सत्य शोधताना त्यांना प्रतीत झालेली जीवनाची अर्थशून्यताच सांगितली आहे, असे आपल्याला आढळून आले आहे. आपण सॉलोमनचे 'जीवन हे Vanity of Vanities आहे – ही सारी वंचना आहे', हा उद्गार उद्धृत केला आहे. सॉक्रेटिस म्हणाला होता, ''आपल्याला शरीरामुळेच जे अनिष्ट घडते, ते समजल्यावर आपण आपल्याला मृत्यू येत असताना आनंदित झाल्याशिवाय कसे राहू?'' हेही आपण सांगितले आहे. असे असताना लोक का व कसे जगतात याबद्दल आपण लिहिले आहे, की लोक चार पद्धतींनी जगतात. काही जण अज्ञानी असतात; काही जण सुखोपभोगात जगत असतात. काही जण शारीरिक आणि बौद्धिक सामर्थ्य मिळवीत राहतात आणि काहीजण दुबळेपणाने जगत असतात.

धर्म ही जीवनातील महत्त्वाची गोष्ट आहे, हे लक्षात घेऊन आपण धर्माच्या आदेशाचे अनेक वर्षे पालन केले. ख्रिस्ताची खरी शिकवण काय, हे मूळ गॉस्पेल्स वाचून समजून घेतले. हे करताना आपल्याला चर्चचा दांभिकपणा समजून आला. ख्रिस्ती धर्मसंस्थेबाबत, चर्चबाबत आपला पूर्ण भ्रमनिरास कसा झाला, हे आपण अत्यंत स्पष्टपणे आणि सडेतोडपणे मांडले आहे. या अवस्थेतून जाताना आपल्या मनाला वेदना कशा झाल्या हेही आपण सांगितले आहे. एकीकडे सर्व मानवांवर प्रेम करा, ही ख्रिस्ताची शिकवण आहे, असे सांगायचे आणि दुसरीकडे रशिया व तुर्कस्तान यांचे युद्ध चालू असताना रशियन सैन्याचा विजय होऊन तुर्कांचा विनाश होवो, यासाठी प्रार्थनाही करावयाची, या रशियन ऑर्थडॉक्स चर्चच्या धर्मगुरूंच्या दांभिक वर्तनामुळे आपण संतप्त झालात. गॉस्पेल्स मुळातून वाचून त्यांचा अर्थ आपण सांगितला, ही आपली महान कामगिरी आहे, असे मला वाटते. आपण बायबलचा जो अर्थ लावला आहे त्याबद्दल दुमत होऊ शकेल; परंतु माणसांनी माणसांच्या वर प्रेम केले पाहिजे, तो खरा धर्म आहे, ही आपली भूमिका मला

मनोमन पटते. आपल्या ''एसेज ॲण्ड लेटर्स'' या पुस्तकातील ''हाऊ टू रीड दि गॉस्पेल्स'' हा लेख मी वाचला. आपण लिहिले आहे, की कोणताही ग्रंथ समजून घेताना त्यातील सुस्पष्ट आशय असलेला भाग आणि संदिग्ध आशय असलेला भाग, हे दोन वेगळे करून सुस्पष्ट आशयाच्या आधारेच त्या ग्रंथाचा अर्थ समजून घेतला पाहिजे. त्या लेखात आपण जे म्हटले आहे त्याचा सारांश पुढीलप्रमाणे आहे– ''आपल्यापैकी प्रत्येकाला बुद्धी आणि सदसद्‌विवेकबुद्धी आहे आणि त्यांच्या आधारेच आपण सत् काय आणि असत् काय, चांगले काय वाईट, काय ते ठरवितो. आपल्याला आपल्या जीवनात केवळ आपल्या वासनांची आणि शारीरिक प्रेरणांची (ॲनिमल इन्स्टिंक्ट्स्)ची तृप्ती करावयाची नसते. या विश्वाचा आधार असलेल्या उदात्त शक्तीशी आपले नाते आहे, हे न विसरता आपण आपल्या जीवनात उदात्त शक्तीच्या आज्ञांचे पालन केले पाहिजे. आपण सत् काय आणि चांगले काय, ते जाणून त्याचे आचरण केले पाहिजे. ख्रिस्त ज्या वेळी आपल्याला परमेश्वराचे पुत्र म्हणतो, त्याचा अर्थ परमेश्वराच्या आज्ञांचे पालन करून आपणही आपले जीवन पवित्र व उदात्त केले पाहिजे, असा असतो.'' त्यानंतर आपण लिहिले आहे– ''ज्या वेळी मी माझ्या जीवनाचा अर्थ काय आणि उद्दिष्ट काय,'' असा प्रश्न स्वत:ला केला, त्या वेळी त्याचे उत्तर मला पुढीलप्रमाणे मिळाले– ''माझी बुद्धी आणि माझा सद्‌विवेक यांच्यामुळे मला जे सत्य उमगते, चांगले (गुड) काय आहे ते समजते, त्या वेळी त्यांचे पालन करणे हे माझे कर्तव्य ठरते.'' हेच माझ्या जीवनाचे उद्दिष्ट आहे. आपण हे स्पष्टपणे सांगितले आहे, की जीवनाला आधारभूत असलेल्या श्रद्धेचे अधिष्ठान बुद्धीला पटेल असेच असले पाहिजे, अन्यथा ती अंधश्रद्धा ठरेल. ख्रिस्ताच्या जीवनातील चमत्कारांचा अर्थ ही रूपके आहेत, असे आपण स्पष्टपणे लिहिले असून ''आंधळ्याला दृष्टी आली'' या चमत्काराचा अर्थ, जो माणूस सत् काय आणि असत् काय हे चाचपडत, शोधत होता, त्याला सत् काय ते उमगले, असा आपण लावला आहे. हे वाचताना मला फार समाधान वाटले. कारण माझा चमत्कारांवर विश्वास नाही. आमच्याकडेही ज्ञानेश्वरांनी रेड्याकडून वेद वदविले, हा चमत्कार म्हणजे ज्ञानेश्वरांनी अल्पबुद्धीच्या माणसाला वेदांचा अर्थ सोप्या भाषेत सांगितला आणि त्या साध्या माणसाने वेदांचा तो अर्थ जेव्हा पंडितांना सांगितला, त्या वेळी

त्यांना ज्ञानदेवांच्या शिकविण्याचे सामर्थ्य लक्षात आले, असा आहे हे लोकांना सांगणे जरूरीचे आहे.

तर्कशुद्ध अर्थ

आपण गॉस्पेल्स मुळातून वाचून ख्रिस्ताच्या एकूण शिकवणुकीचा असा तर्कशुद्ध रीतीने विचार केल्यावर आपल्या हे लक्षात आले, की माणसांनी सुखा-समाधानाने राहावे आणि जगात शांतता नांदावी, यासाठी ख्रिस्ताने केलेल्या पाच आज्ञा सरळ आणि स्पष्ट आहेत. पहिली आज्ञा म्हणजे– ''सर्व माणसांबरोबर शांततेने रहा आणि कोणावरही रागावू नका. दुसरा तुमच्यावर रागावला, तर त्याच्या रागाचे कारण दूर करा.''

दुसरी आज्ञा पुढीलप्रमाणे आहे– ''लैंगिक सुखाची इच्छा ही नैसर्गिक आहे. त्या नैसर्गिक प्रवृत्तीचे रूपांतर स्वैराचार करून सुख उपभोगण्यात करू नका. प्रत्येक पुरुषाला एक पत्नी असेल आणि प्रत्येक स्त्रीला एक पती असेल आणि पती-पत्नीच्या या पवित्र नात्यापासून कोणीही ढळता कामा नये.''

तिसरी आज्ञा पुढीलप्रमाणे आहे– "Swear not at all", म्हणजे कधीही शपथ घेऊ नका. जे सत्य असेल ते ''हो'' किंवा ''नाही'' या दोन शब्दांत सांगता येते. त्याच्या पलीकडे त्याला शपथेचा आधार देण्याचे कारण नाही.'' याचे स्पष्टीकरण देताना आपण लिहिले आहे, की ''ख्रिस्ताने, कोणाचा न्यायनिवाडा करून त्याला दोषी म्हणू नका,'' असे स्पष्टपणे सांगितले आहे. तुम्ही शपथ घेतली की ती खरी की खोटी याचा न्यायनिवाडा सुरू होईल आणि हे अनिष्ट गोष्टीचे मूळ असेल.

आपण ख्रिस्ताच्या चौथ्या आज्ञेबद्दल असे म्हटले आहे, की आपल्याला त्या आज्ञेचा अर्थ प्रथम समजला आणि तिच्यामुळे इतर आज्ञा समजणे सुलभ झाले.

ही चौथी आज्ञा पुढीलप्रमाणे आहे– ''जो अन्याय करतो, त्याचा प्रतिकार बळाने करू नका. हिंसेचा प्रतिकार हिंसेने करू नका.'' यावर अधिक स्पष्टीकरण देताना आपण म्हटले आहे, ''तुम्हांला मारले तर तो मार सहन करा. त्यांनी तुमच्यावर काम करण्याची सक्ती केली तर काम करा. जे तुमचे आहे ते कोणी लुबाडून घेऊ पाहात असेल तर ते त्याला घेऊ द्या.''

पाचवी आज्ञा पुढीलप्रमाणे आहे– ''आपला देश आणि परदेश असा भेदभाव ठेवू नका. अशा भेदभावातून जे अनिष्ट घडेल, ते सर्वस्वी टाळा.

म्हणजेच परदेशांशी शत्रुत्व करू नका. त्यांच्याबरोबर युद्ध करू नका; अगर युद्धाची तयारी करू नका. आपल्या देशबांधवांशी तुम्ही जसे वागाल, तसेच दुसऱ्या देशातील लोकांशी– ते कोणत्याही वंशाचे असले तरी– वागा.''

'कन्फेशन्स'मध्ये आपण मुख्यत: आत्मशोधन केले आहे. त्यानंतरचा आपला धर्ममार्गावरील प्रवास हा स्तिमित करणारा आहे. ख्रिस्ताच्या चार गॉस्पेल्सचे आपले भाषांतर आणि पाच मुख्य आज्ञा कोणत्या हे सांगून त्यांचे आपण केलेले विवेचन ही आपली मानव जातीला दिलेली सर्वांत मोठी देणगी आहे. मी ख्रिस्ताचे ''सरमन् ऑन दि माऊंट'' वाचले आहे. त्याचा खरा अर्थ मला आपले लेखन वाचल्यावर समजला.

गॉस्पेल्समधील पाच मुख्य आज्ञा कोणत्या हे सांगताना आपण हे स्पष्टपणे लिहिले आहे की ''तुम्ही माझ्या सांगण्याप्रमाणे वागा'' (फॉलो मी) असे ख्रिस्त कोठेही म्हणालेला नाही. ख्रिस्ताने मानव जातीला ''सत्याचे पालन करा'' (फॉलो द ट्रूथ), हा संदेश दिलेला आहे.''

हे आपले लेखन वाचताना, मानवाचा खरा धर्म कोणता हे आपण बुद्धिनिष्ठ भूमिकेतून शोधले आणि जे आपल्याला मनोमन पटले, ते स्पष्टपणे सांगितले आहे. हे उमजल्यावर माझ्या मनातील आपल्याबद्दलचा आदर अधिक डोळस झाला.

'कन्फेशन्स'मधील आणखी एका महत्त्वाच्या भागाचा उल्लेख केल्याशिवाय मला राहवत नाही. आपलेच शब्द मी उद्धृत करतो, ते पुढीलप्रमाणे– ''आणि मी साध्या अशिक्षित गरीब लोकांच्याकडे आकृष्ट झालो. त्यांच्यामध्येही अंधश्रद्धा आहे, असे मला प्रथम वाटले. परंतु मी जसजसा त्यांच्याशी अधिकाधिक एकरूप झालो, तसतसे त्यांच्या श्रद्धेचे स्वरूप मला समजून येऊ लागले.''

आपण लिहिले आहे, की शेतांत कष्ट करताना, राबताना, निसर्गाचे स्वरूप रोज पाहताना या गरीब लोकांना हे दिसते, की शेतात बी पेरताना ते नष्ट झाले असे दिसते, परंतु ते उगवून येते. सुरवंटाचे फुलपाखरू होते म्हणजेच, जगात काहीही नष्ट होत नाही. त्याचे रूप बदलते. हे सतत लक्षात आल्यामुळे त्यांना मृत्यूची भीती वाटेनाशी होते. आपले शरीर नष्ट झाल्यावर ते वेगळ्या रूपात प्रकट होईल, असे त्यांना वाटते. अशा रीतीने प्रत्येक गोष्ट नाहीशी करीत, वेगळ्या रूपात ती निर्माण करणाऱ्या

परमेश्वरावर त्यांची श्रद्धा बसते. वरवर ती अंधश्रद्धा वाटली, तरी गॉस्पेल्सचा चुकीचा अर्थ लावीत, चमत्कारांचा चुकीचा अर्थ सांगत निर्माण केलेल्या श्रद्धेपेक्षा ती श्रद्धा वेगळी आहे. तिचे स्वरूप दांभिक नसते. जीवनातील अनुभवातून निर्माण झालेल्या या श्रद्धेमुळेच दु:ख, दारिद्य्र, हालअपेष्टा सोसण्याचे सामर्थ्य येते, असे आपण सांगितले आहे.

आपल्या विवेचनात श्रद्धा ही बुद्धिप्रामाण्यावर आधारित आहे, हे सांगतानाच या प्रश्नाचा केवळ तात्त्विक विचार न करता या डोळस श्रद्धेप्रमाणे जीवनात माणसांनी सन्मार्गाने जात प्रामाणिकपणे वागले पाहिजे, इतरांच्यावर प्रेम केले पाहिजे, हे आपण आग्रहाने सांगितले आहे. माणसाचे आचरण आणि त्याची श्रद्धा यांमध्ये विसंवाद असून चालणार नाही, असे आपण स्पष्टपणे प्रतिपादन केले आहे. अनेक बुद्धिमान माणसे त्यांना पटलेल्या योग्य विचारांचे आचरण करण्यात कमी पडतात. याउलट अनेक साधी, अशिक्षित माणसे त्यांना समजलेल्या परमेश्वराच्या स्वरूपावर श्रद्धा ठेवून त्याच्या आज्ञा पाळण्याची प्रामाणिक धडपड करतात, असे आपल्याला दिसले आहे. ते आपण स्पष्टपणे सांगितले आहे आणि सामान्यांच्या श्रद्धेचे मोठेपणही मान्य केले आहे. या आपल्या लेखनाच्या संदर्भात आपण या लेखनानंतर काही वर्षांनी लिहिलेली ''फादर सर्जी' ही दीर्घकथा मला आठवते. आपल्या अन्य कथांप्रमाणेच ती कथाही सुंदर आहे. तिचा मला जो आशय आठवतो तो पुढीलप्रमाणे आहे– ''फादर सर्जी तरुण असताना त्याच्यावर चर्चने सोपविलेले काम अत्यंत प्रामाणिकपणे करतो. तो त्या कार्याशी पूर्णपणे एकरूप होतो आणि धर्माच्या आज्ञांचे पालन करताना तपस्वी जीवन जगतो– स्वाभाविकपणेच त्याच्याबद्दल लोकांच्या मनातील आदर वाढत जातो. त्याने दिलेले काही आशीर्वाद फलद्रूप झाल्यामुळे लोकांना त्याला दैवी सामर्थ्य प्राप्त झाले आहे असे वाटते आणि त्यांची त्याच्यावर श्रद्धा बसते. फादर सर्जीने स्पर्श केला की रुग्ण बरे होतात, त्याच्या आशीर्वादाने जीवनातील संकटे दूर होतात, असे लोक मानतात आणि हळूहळू सर्जीलाही तसेच वाटू लागते. मला स्मरते त्याप्रमाणे सर्जी मोहाला बळी पडतो. नंतर त्याला पश्चात्ताप होतो आणि तो ते गाव सोडून निघून जातो. सर्जी नंतर जनसामान्यांत राहतो; श्रम करून साधेपणाने जगतो; भोवतालच्या माणसांवर निरपेक्ष प्रेम करीत त्यांच्या सुख-दु:खांशी एकरूप होतो आणि यातच त्याला साफल्य मिळते.''

माझ्या आठवणीप्रमाणे या कथेचा जो आशय मी लिहिला, त्यात चूक असेल तर मला क्षमा करावी.

फादर सर्जीच्या या कथेतून धर्माचा खरा अर्थ काय, हे आपण अत्यंत कलापूर्ण रीतीने सांगितले आहे, असे मला वाटते.

''व्हॉट आय बिलीव्ह'' या आपण १८८४ मध्ये लिहिलेल्या पुस्तकातील काही भागामध्ये ''फोर गॉस्पेल्स'' या आपल्या लेखामध्ये जे सूत्ररूपाने लिहिले आहे, त्याचे विस्तृत विवेचन केले आहे. ''कमांड ऑफ नॉन रेझिस्टन्स'' हे प्रकरण वाचताना हिंसेचा प्रतिकार करू नये, या आपल्या विचारातील अनेक सूक्ष्म छटांचे मला आकलन झाले.

सुखाचा शोध

''दी पाथ ऑफ लाइफ'' या प्रकरणामध्ये माणूस जर केवळ स्वत:साठी जगला तर त्याचे जीवन विफल होईल, परंतु आपल्या वैयक्तिक जीवनाच्या कक्षा विस्तृत करून कुटुंब, समाज, अखिल मानवजात यांच्या सुखासाठी जर तो जगू लागला, तर त्याचे जीवन सफल होईल, हा विचार आपण प्रभावीपणे मांडला आहे. 'फेथ ॲण्ड वर्क्स' या प्रकरणात श्रद्धा ही सत्यावर आधारलेली आणि ज्ञानाधिष्ठित असली पाहिजे, अशी ख्रिस्ताची खरी शिकवण आहे, या विचाराचे आपण मर्मग्राही विवेचन केले आहे. 'व्हॉट आय बिलिव्ह' या पुस्तकातील 'माय योक ईज इझी' हे प्रकरण वाचताना आपण माझ्याशी संवाद करीत आहात, असेच मला वाटले. माणसाचे खरे सुख कशात असते, हे आपण अत्यंत सुलभ रीतीने सांगितले आहे. जीवनातील बरेचसे दु:ख माणसांनी स्वत:वर ओढवून घेतलेले असते, असे सांगून आपण सुखाचा आशय कशात आहे, हे अगदी सुलभपणे मांडले आहे.

सुखाचा आशय पुढीलप्रमाणे आहे –


सुखासाठी पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे माणसाचे निसर्गाशी जे जिव्हाळ्याचे नाते असते, त्यात कोणीही बिघाड आणता कामा नये. म्हणजे माणसाने सूर्यप्रकाशात, मोकळ्या हवेत राहावे, धरतीमातेच्या अंगावर तो वाढावा आणि वृक्षवल्ली व वनचर, पशुपक्षी हे त्याचे सोयरे असावेत. सुखासाठी आवश्यक असलेली दुसरी गोष्ट म्हणजे काम. आपल्याला आवडीचे काम करायला मिळाले पाहिजे आणि ते करताना

आपण अंगमेहनत केली पाहिजे; कारण अंगमेहनत केल्यानेच भूक लागते आणि शांत झोपही येते. सुखासाठी तिसरी आवश्यक गोष्ट म्हणजे कौटुंबिक जीवन. कुटुंबात असलेल्या प्रेमाच्या पवित्र नात्यामुळेच माणूस आनंदी आणि समाधानी राहतो. सुखासाठी चौथी आवश्यक गोष्ट म्हणजे जगातील वेगवेगळ्या लोकांशी स्नेहाचे, मित्रत्वाचे संबंध निर्माण करून त्यांच्याशी आदान-प्रदान करता येणे. सुखासाठी पाचवी जी आवश्यक गोष्ट आपण सांगितली आहे ती म्हणजे माणसाला शरीर सदृढ असतानाच येणारा नैसर्गिक मृत्यू. जीवनात सुख लाभावे यासाठी या पाच गोष्टी आवश्यक आहेत, हे सांगताना तथाकथित आधुनिक सुधारलेल्या जगामध्ये आपण त्यांच्यापासून कसे दूर गेलो आहोत आणि त्यामुळे आपण दु:खी कसे झालो आहोत, हेही आपण सांगितले आहे.

'व्हॉट आय बिलिव्ह'मध्ये आपण ख्रिस्ताच्या शिकवणुकीचे विवेचन करताना ''या जगात परमेश्वराचे राज्य व्हावे म्हणजे जगात शांतता नांदावी आणि त्यासाठी माणसांनी एकमेकांवर प्रेम करावे. आपल्यावर अन्याय झाला तरी हिंसेने प्रत्युत्तर देऊ नये.'' असे आपण आग्रहाने प्रतिपादन केले आहे. त्याचप्रमाणे वैयक्तिक जीवनातील सुख हे मानवजातीच्या सुखात सहभागी होण्याने, निसर्गाशी जवळीक साधल्याने आणि उत्साहाने शारीरिक श्रम करण्यानेच मिळते, हेही सांगितले आहे. व्यक्ती आणि समाज यांचे सुख एकमेकांमध्ये गुंफलेले आहे, हे सांगून आपण आपल्या श्रद्धेच्या विशाल स्वरूपाचे दर्शन 'व्हॉट आय बिलिव्ह' या पुस्तकात घडविले आहे. त्यामुळेच या पुस्तकातील आपल्या चिंतनावर माझे मन लोभावले.

आपला नम्र,

मो. क. गांधी



१०.

कोणता मार्ग बरोबर?

आदरणीय लिओ टॉलस्टॉय,
सादर प्रणाम.

आपल्यावर एक महान कलावंत, लेखक म्हणून प्रेम करणारे असंख्य वाचक होते आणि आहेत. आपल्या ललित साहित्यातील मानवी मनाच्या दर्शनाने मीही मंत्रमुग्ध झालो होतो; परंतु आपल्या जीवनाच्या उत्तरार्धातील परिवर्तनाचे मला आज अधिक आकर्षण वाटते.

सुखी कौटुंबिक जीवन आणि साहित्य क्षेत्रातील अद्वितीय यश यांमध्ये गुरफटून न राहता आपण अंतर्मुख होऊन स्वत:च्या आयुष्याचा आणि एकूणच जीवनाचा विचार करू लागलात आणि त्यानंतर आपण 'कन्फेशन्स' आणि 'व्हॉट आय बिलीव्ह' या पुस्तकांमध्ये जे लिहिले, त्यासंबंधी मी पूर्वी लिहिलेच आहे. या पुस्तकांइतकेच मला आपल्या 'व्हॉट देन मस्ट वुई डू?' या आपल्या पुस्तकाचे महत्त्व वाटते. स्वयंसेवक म्हणून मॉस्कोमध्ये आपण जनगणनेचे काम करीत असताना शहरातील दारिद्र्याची अनेक दृश्ये पाहिलीत. गरिबीत खितपत पडलेल्या अनेकांचे जीवन आपण पाहिलेत. ख्याली-खुशालीत लोळत असलेल्या श्रीमंतांचे जीवन आपण पाहिलेच होते. समाजातील या विषमतेचे निर्मूलन झाले पाहिजे, दारिद्र्य नष्ट झाले पाहिजे, असे आपल्याला तीव्रतेने वाटले. या प्रश्नांचा मार्क्स आणि एंगल्स यांनी यापूर्वी विचार केला होता आणि दारिद्र्याची अर्थशास्त्रीय मीमांसा करून ते नष्ट करण्याचा मार्ग त्यांनी सुचविला होता. आपली भूमिका वेगळी होती. आपण केवळ मानवतावादी भूमिकेतून या प्रश्नाकडे पाहत होता. मार्क्सचे विचार आणि आपली भूमिका यांची तुलना करावी, असे मला वाटत नाही. आपण कसलाही पूर्वग्रह मनात न ठेवता सत्य शोधत होतात. आपल्याला जे अनिष्ट वाटले, त्याचे अत्यंत वास्तव आणि भेदक वर्णन आपण केले आहे

आणि ते नष्ट करण्याचा मार्ग आपण दाखविला आहे. समाजाची रचना बदलल्यामुळे अन्याय, दारिद्र्य नष्ट होईल, यावर आपला विश्वासच नव्हता. आपल्याला माणसांची सदसद्विवेकबुद्धी जागृत करावयाची होती. आपल्या शब्दाशब्दांतून आपली सन्मार्ग शोधण्याची जी तळमळ व्यक्त झाली आहे, ती जगातील हजारोंच्या मनाला भिडली. अनेक जणांना ते वाचून त्यांचे जीवन बदलावे असे वाटले. अनेकांनी आपण सुचविलेला मार्ग स्वीकारला. महात्मा गांधींचीही माणसांच्या मनात बदल घडवून आणण्याची, त्यांचे हृदयपरिवर्तन करण्याची धडपड होती. आपल्या ''व्हॉट देन मस्ट वुई डू'' या पुस्तकामुळे ते प्रभावीत झाले. त्यांचे विचार अधिक स्पष्ट झाले. ''व्हॉट देन मस्ट वुई डू?'' हा प्रबंध नाही. हा वाचकांशी केलेला संवाद आहे. आपण सांगितले, की आजच्या समाजात जे दारिद्र्य आहे त्याचे कारण मूठभर लोकांनी त्यांच्या गरजा अकारण वाढविल्या आहेत, हे आहे. लोकांनी साधे राहिले पाहिजे. त्यांनी त्यांच्या गरजा नियंत्रित केल्या पाहिजेत. अशा सीध्या राहण्यातच माणसाला खरेखुरे समाधान लाभते, ही आपली या ''व्हॉट देन मस्ट वुई डू?''मधील शिकवण आहे. प्रत्येकाने त्याच्या निर्वाहासाठी शारीरिक श्रम केले पाहिजेत, हे आपण सतत सांगितले आहे. स्वत:च्या निर्वाहासाठी लागणारा पैसा हा स्वकष्टार्जित असला पाहिजे आणि कोणालाही दुसऱ्यांच्या श्रमांवर जगण्याचा अधिकार नाही, हे आपण उत्कटतेने सांगितले आहे आणि आपण मांडलेला हा विचार असंख्य लोकांना पटलेला आहे. ''व्हॉट देन मस्ट वुई डू?'' या पुस्तकात आपण बुद्धिजीवी वर्गातील माणसांच्या आत्मकेंद्रित वृत्तीवर जे कठोर प्रहार केले आहेत, ते योग्यच आहेत. कलावंतांनीही त्यांची कला लोकांपर्यंत पोचवली पाहिजे. उच्चभ्रू समाजातील मूठभर लोकांनी केलेल्या कौतुकाने फुशारून जाऊ नये, हेही आपण ज्या परखडपणे मांडले आहे, ते मला फार आवडले. आपण ''व्हॉट देन मस्ट वुई डू?''मध्ये मानवांचे एकमेकांवरील प्रेम आणि त्यातून समाजात निर्माण होणारा सद्भाव यांचे जे विवेचन केले आहे, त्यामुळे अनेक जण अंतर्मुख झाले, अस्वस्थ झाले आणि स्वत:च्या आत्मकेंद्रित जीवनातील वैगुण्यांची त्यांना तीव्रतेने जाणीव झाली. ज्या माणसांना व्यवहारातील यशामुळे अपार संपत्ती मिळते, ती माणसे स्वत:च्या तथाकथित कर्तृत्वावर खूष असतात; परंतु अशा माणसांचे तथाकथित कर्तृत्व म्हणजे लबाडी आहे, हे आपण सडेतोडपणे मांडले

असून, धनदांडगे लोक स्वत:च्या दुष्कृत्यांवर पांघरूण घालण्यासाठी जे मुखवटे घालतात त्यामुळे कोणीही फसता कामा नये, असे स्पष्टपणे सांगितले आहे. दांभिकतेचा बुरखा आपण टरटरा फाडून टाकला आहे, याचे मला समाधान वाटते.

अन्यायाला संमती

जी माणसे समाजातील अन्याय शांतपणे पाहतात, ती अप्रत्यक्षपणे त्या अन्यायाला संमती देतात, त्या दुष्कृत्यामध्ये अप्रत्यक्षपणे सामील असतात, हे जे आपण लिहिले आहे, ते मला फार महत्त्वाचे वाटते. त्याच्या स्पष्टीकरणार्थ आपण लिहिले आहे, की एखाद्या माणसाला त्याच्या दुष्कृत्याबद्दल शिक्षा करताना त्याची हत्या गिलोटीन वापरून करणे योग्य नाही आणि जी माणसे अपराधी माणसांचे मुंडके गिलोटीनने धडावेगळे होताना पाहत असतात, त्यात एक विकृत आनंद घेत असतात, ती माणसेही दोषी व अपराधीच असतात. समाजातील अन्यायात अशा रीतीने अप्रत्यक्षपणे सहभागी असणाऱ्या माणसांना त्यांच्या अपराधाची जाणीव देण्याचे, त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीला टोचणी देऊन ती जागी करण्याचे महान कार्य आपण लेखनातून केले आहे.

हजारो माणसांनी अपार कष्ट करीत आणि हालअपेष्टा सोसत जगणे आणि मूठभरांनी त्यांच्या श्रमांवर चैन करीत जगणे हे अनैतिक आहे, हे आपण स्पष्टपणे सांगितले. त्याचबरोबर ज्यांना वर्षानुवर्षे हालअपेष्टा भोगाव्या लागतात, त्यांना याबद्दल संताप येतो, त्यांच्या मनातील असंतोष धुमसत असतो आणि म्हणून केव्हातरी या असंतोषाचा भडका उडणार आहे, असा स्पष्ट इशाराही आपण राज्यकर्त्यांना दिला होता. पुढे १९१७ मध्ये असाच असंतोषाचा स्फोट झाला आणि कम्युनिस्ट क्रांती झाली.

जनतेच्या असंतोषाचा भडका उडणे अपरिहार्य आहे, हे आपण ओळखले. मात्र अन्याय व विषमता यांच्या निर्मूलनासाठी हिंसेचा मार्ग स्वीकारणे आपणास अजिबात मान्य नव्हते. ''व्हॉट आय बिलीव्ह'' या आपल्या प्रबंधामध्ये आणि ''दि किंगडम ऑफ गॉड इज विदिन यू'' या आपल्या अत्यंत मौलिक लेखामध्ये आपण हिंसेचा प्रतिकार हिंसेच्या मार्गाने करता कामा नये, असे आग्रहाने प्रतिपादन केले आहे. आपण 'रेझिस्ट नॉट इव्हिल' या गॉस्पेल्समधील सूत्राचा सतत आग्रह धरला आहे. साध्य जर उदात्त असेल, तर साधन त्याला अनुरूप असले पाहिजे,

हे तत्त्व गांधीजींना मान्य होते. त्यांचाही आपणाप्रमाणेच हिंसेला पूर्णपणे विरोध होता; परंतु अहिंसेच्या मार्गानेही अन्यायाचा प्रतिकार करता येतो आणि तो तसा केला पाहिजे, हे थोरो या विचारवंताने प्रथम सांगितले आणि महात्मा गांधींनी त्याचे आचरण करून दाखविले. दक्षिण आफ्रिकेत गोऱ्यांनी गौरेतरांवर केलेल्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी महात्मा गांधींनी अहिंसक मार्गच स्वीकारला आणि त्यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह करून शेकडो सत्याग्रहींनी लाठीमार सहन केला आणि तुरुंगवास सोसला. भारतात आल्यावर गांधीजींनी १९२० मध्ये शांततेच्या मार्गाने सरकारशी असहकार करण्याचा मार्ग लोकांना दाखविला; मात्र एक हिंसक प्रकार घडताच, गांधीजींनी सहकाऱ्यांचा विरोध असूनही, चळवळ मागे घेतली. १९३० मध्ये गांधीजींनी देशव्यापी सत्याग्रह आंदोलन चालविले. सत्याग्रहींवर ब्रिटिशांनी निष्ठुर लाठीमार केला, त्यांची डोकी फोडली; परंतु निर्भयपणे सत्याग्रहींनी हे सोसले. सर्व सत्याग्रहींनी कोर्टात स्वतःचा बचाव न करता, ''आम्ही अन्याय्य कायदा मोडला'' असे निर्भयपणे सांगितले आणि न्यायालयाने दिलेली तुरुंगवासाची शिक्षा त्यांनी आनंदाने व निर्भयपणे सोसली. मला नम्रपणे असे लिहावेसे वाटते, की हिंसेला हिंसेने प्रत्युत्तर देऊ नका, या आपल्या भूमिकेपेक्षा हिंसेचा, अन्यायाचा प्रतिकार अहिंसक सत्याग्रहाच्या मार्गाने करा, ही शिकवण व त्याचे आचरण हे पुढचे पाऊल होते. आपण १९३० मध्ये हयात असता आणि धारासना येथील सत्याग्रही डोकी फुटत असतानाही निर्भयपणे अहिंसक सत्याग्रहाच्या मार्गाने कायदेभंग करीत होते, हे पाहिले असते, तर आपणही त्या मार्गाला पाठिंबा दिला असता. आपण गांधीजींना लिहिलेल्या पत्रात ''पॅसिव्ह रेझिस्टन्स'' या मार्गाचे महत्त्व जगासाठीही आहे, असे पुढे काही वर्षांनी लिहिले, हा आपला मोठेपणा. या संदर्भात मी आणखी थोडेसेच लिहू इच्छितो. रशियातील ''डिसेंबरिस्ट'' यांनी अन्यायाविरुद्ध हिंसक मार्गाने चळवळ केली, त्या वेळी आणि नंतर क्रांतिकारकांनी दुसरा झार अॅलेक्झांडर यांचा खून केला त्यावेळी रशियन राज्यकर्त्यांनी अनेक डिसेंबरिस्टांना आणि क्रांतिकारकांना फाशी दिले. या दोन्ही वेळी आपण डिसेंबरिस्ट आणि क्रांतिकारक यांना फाशी देण्यात येऊ नये असे स्पष्टपणे राज्यकर्त्यांना लिहिले होते. हिंसेचा प्रतिकार क्रांतिकारक तरुणांनी हिंसेच्या मार्गाने करू नये, असे आपण सांगत होता. त्याचबरोबर रशियन राज्यकर्त्यांनी क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा न देता


ज्या अन्यायाच्या विरोधात क्रांतिकारक लढत होते, ते अन्याय दूर केले पाहिजेत, असेही आपण सांगितले होते. झारचा खून झाल्यानंतर गादीवर आलेल्या त्याच्या मुलाला– झारला आपण जो अपराध्यांना क्षमा करण्याचा सल्ला दिला तो त्याने मानला नाही; परंतु क्रांतिकारकांना पाठिंबा दिल्याचा आपल्यावर आरोप करण्याचे व त्याबद्दल आपल्याला शिक्षा करण्याचे धैर्य त्याला झाले नाही. याचे कारण आपले असामान्य व्यक्तिमत्त्व हेच होते. आपल्या शब्दांना नैतिक सामर्थ्य होते आणि राजकारणापासून दूर असणाऱ्या असंख्य लोकांच्या मनात आपल्याबद्दल प्रेम व आदर आहे, हेही रशियामधील राज्यकर्ते जाणत होते. आपल्याला शिक्षा केल्यास असंतोषाचा भडका उडण्याची शक्यता होती, म्हणून त्यांनी आपल्या मौलिक सल्ल्याकडे दुर्लक्ष करतानाच आपल्याला शिक्षा करण्याचा अविचार केला नाही. क्रांतिकारकांना आपल्या वागण्यात विसंगती आहे, असे वाटत होते. अन्याय होत आहे, हे आपण स्पष्टपणे सांगत होता. राज्यकर्त्यांनी जुलूम करू नये, असेही मत मांडीत होतात; परंतु अन्यायाचा प्रतिकार मात्र हिंसेने करू नये, अशी भूमिका आपण घेत होता. या आपल्या भूमिकेत अंतर्विरोध आहे आणि कोणतीही कृती न केल्यामुळे आपण दुबळे आहात, अशी टीका क्रांतिकारक आपल्यावर करीत होते. रशियात एका बाजूला असलेली झारची जुलुमी राजवट, दुसऱ्या बाजूस जुलमाविरुद्ध लढणारे क्रांतिकारक या दोघांनाही आपण विरोध केला आणि शांततेच्या मार्गाने माणसांनी परस्परांवर प्रेम करीत सर्व प्रश्न सोडविले पाहिजेत, हा पर्याय लोकांपुढे ठेवला. तो कोणीच स्वीकारला नाही; आणि आपले म्हणणे हे अरण्यरुदनच ठरले. त्या वेळी रशियात काही उदारमतवादी (लिबरल) पंथाचे लोक होते. त्यांना झारच्या राजवटीच्या जागी लोकशाही प्रस्थापित झाली तर लोकांना न्याय मिळेल, असे वाटत होते. लिबरल मताच्या लोकांनाही आपला विरोध होता, कारण राज्यपद्धती बदलल्याने अन्याय दूर होईल, असे आपल्याला वाटत नव्हते. लोकशाही पद्धतीवर टीका करताना एकदा आपण असे लिहिले, की तुरुंगातील कैद्यांना जेलर निवडण्याचा अधिकार दिला, तर त्यांची सुटका होणार नाही, फक्त तुरुंगाधिकारी बदलेल. राज्यपद्धती, समाजव्यवस्था वा अर्थव्यवस्था बदलून अन्यायाचे निर्मूलन होणार नाही, अशी आपली भूमिका होती, कारण कोणत्याही पद्धतीत राज्यकर्ते आणि नोकरशाही असणारच आणि त्यांच्यामार्फत न्याय प्रस्थापित होणे अशक्य

आहे, असे आपले ठाम मत होते. माणसांच्या मनात परिवर्तन घडवून आणले पाहिजे, माणसांनी एकमेकांवर प्रेम करीत, साधेपणाने जगले पाहिजे असे आपणाला वाटत होते. गांधीजींची भूमिका त्या बाबतीत आपल्या भूमिकेपेक्षा थोडी वेगळी आहे. गांधीजींनीही शासन संस्थेच्या मर्यादा सांगितल्या असून, राज्यसत्तेचे आणि अर्थसत्तेचे केंद्रीकरण झाले, की लोकांना न्याय मिळत नाही हे स्पष्टपणे म्हटले आहे. ''हिंद स्वराज'' या त्यांच्या पुस्तकात त्यांनी ग्रामस्वराज्य ही संकल्पना मांडून अन्न, वस्त्र, निवारा या बाबतींत गावांनी स्वावलंबी होऊन आपला कारभार हाकला पाहिजे, हेच आग्रहाने सांगितले आहे; मात्र त्यांनी शासनसंस्था ही वाईट असली तरी तिची जरूरी आहे, असे म्हटले आहे. मला असे वाटते की, शासनसंस्थेअभावी अराजक माजल्यास जंगलाप्रमाणे ''बळी तो कान पिळी'' ही अवस्था निर्माण होईल ही भीती आहे. आजच्या शासनसंस्थेत अनेकांना न्याय मिळत नाही हे खरे असले, तरी त्याचबरोबर आपण कोणाला मारले, झोडले तर कायद्याप्रमाणे आपल्याला शिक्षा होईल, हे माहीत असल्यामुळे अनेकजण गुन्हे करीत नाहीत, हेही मान्य केले पाहिजे. यासंबंधी मी आपणाशी प्रतिवाद करणार नाही. माझ्यासारख्या माणसांना कोणत्याही राज्यपद्धतीत, अर्थव्यवस्थेत वा समाजरचनेत दोष असतो हे समजत असले, तरी समाजात काही तरी व्यवस्था नसली तर अराजकातूनही अन्यायच होईल असे वाटते; मात्र माणसांची सदसद्‌विवेकबुद्धी जागृत करण्याचे सामर्थ्य असलेल्या आपल्यासारख्या विभूतींची भूमिका शंभर टक्के व्यवहार्य नसली, तरी महत्त्वाची असल्यामुळे ती दृष्टीआड करून चालणार नाही, असेही मला वाटते. मी ज्या जगात राहतो, त्या जगातील विद्वेषाचे भीषण स्वरूप अनुभवताना निराश झाल्यावर आपल्या उदात्त विचारांतच मला आशेचा किरण दिसतो. आपण, गांधीजी अशा महात्म्यांचा जय होतो का पराभव होतो, हा वाद निष्फळ, निरर्थक असतो. आमच्या व्यावहारिक जगातील एका टोकाच्या राजकीय नेत्यांचा तथाकथित जय आणि दुसऱ्या टोकाच्या गांधीजींचा पराभव आणि आपले अरण्यरुदनासारखे वाटणारे उदात्त विचारांचे प्रकटीकरण, यांची तुलनाच होऊ शकणार नाही. आपली व गांधीजींची शिकवण आचरण्याची धडपड करण्यातही माझ्यासारख्याला साफल्य वाटते, इतकेच मी नम्रपणे सांगू इच्छितो. माझ्यासारखी असंख्य सामान्य माणसे सामान्य रीतीने जगत असतानाही संतांची शिकवण आचरणात

आणण्याचा प्रयत्न करतात, कारण त्या नैतिक शिकवणुकीचा आमच्या मनावर खोलवर संस्कार झालेला असतो. आमच्या अपूर्णतेमुळे ती शिकवण पटलेली असूनही, तिच्याप्रमाणे आमचे व्यक्तिगत जीवन पूर्णपणे बदलणे आम्हांला शक्य होत नाही; परंतु उदात्त शिकवणुकीचे थोडेतरी आचरण करण्याचा आमचा प्रयत्न चालू असतो. आमच्या समाजात एरवी निर्वाहासाठी शेती किंवा अन्य व्यवसाय करीत प्रपंचात गुरफटलेली हजारो माणसे ज्ञानोबा-तुकाराम यांच्या भागवत धर्मातील शिकवणुकीमुळे समाजातील एरवीची जातीय विषमता विसरून स्वत:चा व्यवसाय बाजूला ठेवून, आषाढी व कार्तिकी एकादशीला चालत आळंदी ते पंढरपूर वारी करतात. संतांच्या शिकवणुकीच्या संस्कारामुळे वारकऱ्यांच्या मनातील भगवद्‌भक्ती वारीत उचंबळून येते. मी या अध्यात्म मार्गाने गेलो नाही, परंतु माझ्या राजकीय जीवनात मी गांधीजींच्या शिकवणुकीचे अल्प तरी आचरण केले. आपल्या ''व्हॉट देन मस्ट वुई डू?''मधील शिकवणुकीनुसार जगात अनेक ठिकाणी काही माणसांनी तरी वागण्याची धडपड केली. अशा संस्था किती काळ चालल्या याचे मला महत्त्व वाटत नाही. माझ्यासारख्या सामान्य माणसावर आपल्या, गांधीजींच्या जीवनाचा जो संस्कार झालेला आहे, त्यामुळे त्या उदात्त शिकवणुकीचे आचरण करताना मी एरवीचा असत नाही. अशा क्षणांमुळेच माझ्या जीवनाला थोडा तरी अर्थ येतो आणि म्हणून मी आपल्यापुढे आणि गांधीजींच्या पुढे नतमस्तक होतो.

आपला नम्र,

ग. प्र. प्रधान



११.

आवडती माणसं

आदरणीय लिओ टॉलस्टॉय,
सादर प्रणाम.

आपल्या व्यक्तिमत्त्वाला किती वेगवेगळे पैलू होते, याचा मी विचार करतो, तेव्हा माझे मन स्तिमित होते. आपले मन शहरामध्ये खऱ्या अर्थाने कधी रमलेच नाही. यास्नाया पोल्यानातील शेतकऱ्यांबद्दल, शेतांत कामे करणाऱ्या साध्यासुध्या खेडुत माणसांबद्दल आपल्याला विलक्षण आपुलकी वाटे. आपण कॉकेशसमध्ये गेला असताना जीवनाशी कसे एकरूप झाला होतात, हे आपल्या ''कोझॅक्स'' या कादंबरीतून आणि काही कथांतून प्रत्ययाला येते. यास्नाया पोल्यानापासून कितीतरी दूर असलेल्या सामाराला जाताना आपण प्रथम नाईलाजाने रेल्वेने प्रवास केला आणि नंतर व्होल्गा नदीतून वाफोरातून (स्टीम शिपमधून) प्रवास करीत आपण सामारा येथे पोचलात. तेथून पूर्वेकडे ८० मैल घोड्यावरून प्रवास करून कारालिक नदीकाठच्या कारिलेक या खेड्यात आपण जाऊन राहिलात. तेथील बष्कीर या रहिवाशांमध्ये आपण सहज मिसळून गेलात. आपण कॉकेशसमध्ये असताना तार्तर लोकांच्या बोलीत संभाषण करीत होतात. तीच बोली बष्कीर बोलत असल्यामुळे त्यांनाही आपणाबद्दल आपुलकी वाटे. ते आपल्याला आदराने ''काऊंट'' म्हणून संबोधत असत, पण आपल्या मनमोकळ्या वागण्याने त्यांच्यात आणि आपल्यात कधी दुरावा निर्माण झाला नाही. बष्कीर हे तंबूमध्ये राहत असत आणि एकदा आपण त्यांचा पाहुणचार घेताना त्या तंबूत राहिला होतात. कारिलेक या गावापासून पन्नास मैलांवर असलेल्या बुझुलक या लहानशा गावात दरवर्षी जी जत्रा भरत असे, त्या जत्रेलाही आपण गेला होतात. या जत्रेमध्ये बष्कीर, कोझॅक्स, किरगीज आणि काही रशियनही एकत्र मौजमजा करीत होते. आपणही त्यांच्याशी गप्पा मारीत, थट्टा

करीत, हसत त्यांच्यात मिसळलात आणि त्यांनाही आपण परके वाटला नाहीत. तेथील ख्रिस्ती शेतकरी आणि मुस्लिम खेडूत एकमेकांचे शेजारी म्हणून राहत होते. आपण युरोपातही प्रवास केला होता आणि आपण सामारा येथेही राहिला होता. या संदर्भात आपण लिहिलेला पुढील परिच्छेद वाचताना मला आपल्या मनाची वेगळीच ओळख झाली. आपण लिहिले आहे, ''नियतीने मला सामाराला का नेले मला ठाऊक नाही... मी ब्रिटिश पार्लमेंटमधील महत्त्वाची मानली जाणारी काही भाषणे ऐकली, पण मला ती कंटाळवाणी वाटली. मला त्यांचे महत्त्व वाटले नाही; पण सामारातील बष्कीर शेतकऱ्यांचे आपसातील बोलणे ऐकताना मात्र मी त्यांच्या भावभावनांमध्ये गुरफटून गेलो. येथील भटके, आदिम प्रकृतीचे लोक, त्यांची शेती करण्याची रांगडी रीत, त्यांच्या जगण्यातील संघर्ष आणि निसर्गाशी त्यांची झालेली एकरूपता हे सारे मला चित्तवेधक वाटले.'' आपल्याला आधुनिक पाश्चात्त्य राष्ट्रांमधील राजकीय संघर्षापेक्षा, तसेच रशियातील मूठभर उमरावांच्या आणि शहरातील विद्यापीठांत शिकलेल्या लोकांच्या तथाकथित प्रगतीपेक्षा, बष्कीर, किरगीज, तार्तर या बलदंड माणसांचे इथल्या लहरी आणि उद्दाम निसर्गाचाच एक भाग होऊन गेलेले खडतर जीवन, आणि त्याचबरोबर दांभिकतेचा स्पर्श नसलेले त्यांचे मोकळेढाकळे जगणे हेच अधिक चैतन्यपूर्ण आणि म्हणून आकर्षक वाटले. सामाराला आपण जमीन खरेदी केलीत आणि अनेकदा तेथे आलात; कारण आपली जन्मभूमी असलेल्या यास्नाया पोल्यानातील शेतकऱ्यांप्रमाणेच येथील उग्र प्रकृतीचे पण सरळ मनाचे लोक आपल्याला प्रिय वाटत असत.

त्या भागात दुष्काळ पडला होता, तेव्हा आपण तेथील लोकांना धान्य दिले, पुढील वर्षी पेरण्यासाठी बी-बियाणे दिले आणि त्यांना निसर्गाच्या आपत्तीशी झुंज घेण्यात शक्य ते साह्य केले. एक तार्तर माणूस आणि त्याचा लहान मुलगा दुष्काळात पोट भरण्यासाठी वणवण भटकत सामाराला आला, तेव्हा आपण त्याला आपल्या शेतावरच काम देऊन तिथे जवळच त्याची राहण्याची सोय केली. आपले चरित्र लिहिणाऱ्या अनेक लेखकांनी सामारातील आपल्या वास्तव्याबद्दल पुष्कळ अधिक लिहावयास हवे होते.

इथल्या आपल्या वास्तव्यासंबंधी आपण एक आठवण लिहिली आहे, ती मला आठवते. आपण एकदा शेतावरून घराकडे परत येत

असताना अनेक रानफुलांच्या ताटव्यांत एक किरमिजी रंगाचे फूल पाहिलेत. आपल्याला ते हवेसे वाटले म्हणून आपण झुडपातून चालत गेलात आणि लांब दांड्याचे ते फूल तोडू लागलात. ते तुटता तुटेना. आपण सगळे बळ एकवटून त्याचा दांडा ओढलात. या झटापटीत त्या फुलाच्या काही पाकळ्याही कुस्करल्या आणि शेवटी खूप प्रयासाने दांड्यासह आपण ते फूल तोडलेत. चुरगळलेले ते फूल आपण तेथेच फेकून दिले; पण आपण मनाशी म्हणालात, ''एक साधे फूल; पण किती चिवट! ते जमिनीवर डोलत होते, तसेच मी ठेवायला हवे होते.'' मागाहून आपल्याला कळले, की त्या फुलाचे नाव आहे ''तार्तर!''


''हाजी मुराद'' या आपण लिहिलेल्या दीर्घ कथेत या तार्तर लोकांच्या जीवनाचे वास्तव वर्णन आहे. हाजी मुरादचे शौर्य आणि त्याचे क्रौर्य त्या परिसरात सर्वांना ठाऊक होते. या प्रदेशाजवळच रशियन फौजांची छावणी होती. रशिया आणि कॉकेशसमधील इस्लाम धर्माचे हे तार्तर यांच्यात तीव्र वैर होते, कारण रशियन लोकांना हा प्रदेश जिंकायचा होता आणि तार्तर लोकांना त्यांच्या भूमीवरून या उपऱ्या, आक्रमकांना हुसकून लावायचे होते. ही दुश्मनी, त्यातून सतत होणाऱ्या कुरबुरी आणि चकमकी, वैरातून वाढणारे वैर, एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी केलेले डावपेच, रशियाच्या लष्करी ताकदीशी कॉकेशसमधील तार्तर लोकांच्या गनिमी काव्याची झुंज या सर्व गोष्टींचे आपण 'हाजी मुराद' आणि ''ए प्रिझनर इन दि कॉकेशस'' या दोन कथांमध्ये केलेले वर्णन मला चलत्‌चित्रपटासारखे वाटले. हाजी मुराद ही व्यक्तिरेखा आपण ठसठशीतपणे रेखाटली आहे. ''ए प्रिझनर इन दि कॉकेशस'' या कथेमध्ये तार्तर लोकांनी गिरफ्तार केलेला धूर्त रशियन सैनिक, छोट्या तार्तर मुलीला तो करून देत असलेल्या बाहुल्यांमुळे त्या लहान मुलीला त्या रशियन सैनिकाचा लागलेला लळा, तिने त्याला पळून जाण्यासाठी केलेली मदत, ही भावकथा त्या कथेतील रणधुमाळीपेक्षा अधिक चित्तवेधक आहे.

गेल्या महिन्यातच एक अमेरिकन मासिक अचानक माझ्या हातांत पडले. त्या मासिकात, कॉकेशसमध्ये चेचन्या प्रांतात एक वर्षभर राहिलेल्या वार्ताहराने लिहिलेला लेख मी वाचला. त्या वार्ताहराने त्या लेखात रशियाची मोठी सैन्यदले चेचन्यामध्ये ठिय्या देऊन कशी बसली आहेत, त्यांच्याजवळ आधुनिक शस्त्रास्त्रे असली, तरी चेचन्यातील तार्तर

लोक गनिमी काव्याने या रशियन सेनेशी कसे लढत आहेत, स्थानिक लोकांना दहशत बसावी म्हणून रशियन सेना अनेकदा निरपराध लोकांनाही कसे पिटून काढीत आहेत आणि त्यामुळे स्थानिक तार्तर लोकांतील असंतोषाचा अधूनमधून कसा विस्फोट होत आहे, या सर्व गोष्टींचे तपशीलवार वर्णन अमेरिकन वार्ताहराने केले आहे. त्या लेखात आपली ''हाजी मुराद'' ही कथाच आधुनिक काळातील सत्यकथा म्हणून अवतरली आहे, असे मला वाटले. नेहमी साहित्यात जीवनाचा पुन:प्रत्यय येतो, परंतु त्या लेखात आज चेचन्यात जे घडत आहे ते वाचताना मला जीवनात आपल्या साहित्याचे प्रतिबिंब उमटले आहे, असे वाटले.

आपला नम्र,

ग. प्र. प्रधान



१२.

संघर्ष धर्मसत्तेशी

आदरणीय लिओ टॉलस्टॉय,
सादर प्रणाम.

राजकीय पक्ष किंवा समाजकार्य करणाऱ्या संस्था वा संघटना यांच्यासमोर निश्चित उद्दिष्ट असते. त्या उद्दिष्टासाठी ते आपल्या विचारांशी सहमत असलेल्या व्यक्तींना एकत्र आणतात, त्यांचे संघटन करतात, कार्यक्रम निश्चय केला जातो आणि पक्ष वा संस्थेच्या संघटनेमार्फत त्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे प्रयत्न नेटाने केले जातात. आपणाला राजकीय वा सामाजिक कार्यासाठी संघटना करणे मान्य नव्हते. लोकांची सदसद्विवेक बुद्धी जागृत केली की ते योग्य मार्गाने जातील, असे आपल्याला वाटे. असे असले तरी लोकांचे दु:ख पाहिल्यावर आपले अंत:करण द्रवत असल्यामुळे काही वेळा आपणही निश्चित कार्यक्रम हाती घेऊन लोकांच्या मदतीने त्याची कार्यवाही केली होती. १८९१ मध्ये रशियात जो भीषण दुष्काळ पडला, त्या वेळी उपासमारीने होणारे लोकांचे हाल पाहून आपण पुढे सरसावून जे काम केले त्याचे वर्णन ज्या वेळी मी आपल्या चरित्रग्रंथातून वाचले, त्या वेळी माझा आपल्याबद्दलचा आदर शतगुणित झाला. त्या वेळी जनमानसात आपले स्थान असामान्य होते आणि त्यामुळे आपल्या हाकेला प्रतिसाद देऊन अनेक लोकांनी दुष्काळग्रस्तांना भरभरून मदत केली.

आपण दुष्काळी जिल्ह्यांत दौरा काढला आणि लोकांच्या हाल अपेष्टा पाहून आपण बेगिचेव्हिका येथे जाऊन राहिलात. तेथेच आपण दुष्काळ निवारण समितीचे कार्य तडफेने सुरू केलेत. प्रथम आपण अनेक खेड्यांत अन्नछत्रे सुरू केली. आपण हे काम करता हे कळल्यावर आणि आपल्यातर्फे आपल्या पत्नीने वर्तमानपत्रातून आवाहन केल्यावर पहिल्या आठवड्यातच तेरा हजार रुबल्स गोळा झाले. ''दुष्काळाचा भीषण प्रश्न'' हा जो लेख

आपण लिहिलात, तो रशियातील वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाला आणि युरोपातील अनेक वर्तमानपत्रांनीही त्याचे भाषांतर करून तो छापला; आणि मग जगभरातून मदतीचा ओघ सुरू झाला. रशियाच्या सरकारने मात्र दुष्काळ दडवून ठेवण्याची केविलवाणी धडपड केली. रशियाची बदनामी केली म्हणून आपल्यावर खटला भरण्याचा कट काही नोकरशहा आणि ''मॉस्को न्यूज''चे डायरेक्टर यांनी केला. परंतु झार थोडा तरी शहाणा असल्यामुळे त्याने त्या हुकूमावर सही करण्याचे नाकारले. झारला आपल्या लोकप्रियतेची कल्पना होती. आपण विधायक काम करीत होता. १८८२ मध्ये एकूण चार जिल्ह्यांत १८७ अन्नछत्रांतून दहा हजार लोकांना रोज जेवण दिले जात होते. दुष्काळपीडित गरीब माणसांना आपण देवदूत वाटत होतात आणि त्याच वेळी धर्मगुरू मात्र लोकांना सांगत होते, ''तो सैतान अन्नाचे आमिष दाखवील, पण त्याच्या मोहात पडू नका. चर्च आणि सरकार यांचीच मदत घ्या.'' त्या तुटपुंज्या मदतीने काही होत नव्हते. लोकांवरील आपत्तीत प्रकट झालेला आपल्या मनाचा मोठेपणा आणि तरीही राजसत्ता आणि धर्मसत्तेने आपल्याशी केलेले शत्रुत्व हे वाचताना तत्कालीन रशियन सत्ताधारी आणि धर्मगुरू किती क्षुद्र आणि खुजे होते, याची मला कल्पना आली.

आपला स्वभाव कोणाशी संघर्ष करण्याचा नव्हता, परंतु न्यायाची बाजू घेतल्याशिवाय आपल्याला राहवत नसे आणि राजसत्ता व धर्मसत्ता यांच्या प्रतिगामी वृत्तीमुळे त्यांच्याशी संघर्ष निर्माण होत असे. 'डुखोबार' या धर्मपंथाच्या लोकांवरील अन्याय दूर व्हावा म्हणून आपण जे केले, त्यातून असाच संघर्ष निर्माण झाला. डुखोबार आणि मोलकोन्स हे ख्रिस्ती धर्माचेच उपपंथ होते आणि ख्रिस्ताचे तत्त्वज्ञान आचरणात आणण्याचा दैनंदिन जीवनातही प्रयत्न करीत होते. डुखोबार लोकांनी ख्रिस्त वचनाप्रमाणे वागायचे म्हणून लष्करात जायला नकार दिला. त्यांची ही बंडाळी आहे असे मानून रशियन सरकारने त्यांच्यावर गोळीबार करण्यास सैन्यास सांगितले. झारने त्यांना आधीच कॉकेशसमध्ये हद्दपार केले होते. गोळीबारात अनेकजण मारले गेले. डुखोबार लोकांच्या जमिनीही सरकारने जप्त केल्या. या भीषण अत्याचारांमुळे आपण व्यथित झालात आणि ''रशियातील ख्रिश्चन धर्मीयांचा छळ'' असा लेख लिहिला. त्यामुळे डुखोबार प्रकरण जगाच्या चव्हाट्यावर आले. डुखोबार लोकांना रशियात राहणे शक्य नव्हते, म्हणून त्यांना देशांतर करणेच भाग होते. बारा हजार लोकांना परदेशात पाठविणे, तिथे त्यांची नीट व्यवस्था करणे, हे फार

कठीण काम होते. परंतु आपण आवाहन केल्यावर युरोपातील क्वेकर पंथाच्या लोकांनी आणि इतर अनेकांनी मदत केली आणि अखेर डुखोबार लोकांची कॅनडामध्ये सोय लावण्यात आली. आपण ''ख्रिश्चन मार्टिर्डम् इन रशिया'' हा जो लेख लिहिला, त्यामुळे रशियन सरकार संतापले. पण आपल्याला शिक्षा करण्याची सरकारला हिंमत झाली नाही. त्यांनी आपल्या अनुयायांचा मात्र छळ केला. आल्मेर मॉड यांनी लिहिलेल्या ''टॉलस्टॉय ॲण्ड हिज प्रॉब्लेम्स'' या पुस्तकात हे सर्व वाचताना अन्यायाविरुद्ध संघर्ष करताना आपण किती निर्भयतेने वागत होतात आणि त्यामुळे केवळ रशियातीलच नव्हे तर जगातील लोकमानसावर इष्ट तो परिणाम कसा होत होता, याची मला पुरेपूर कल्पना आली आणि म.गांधी आपल्याला जगातील सत्‌शक्तीचे प्रेरणास्थान का मानीत, ते मला उमगले.

आपल्या जीवनातील सर्वांत मोठा तीव्र संघर्ष रशियन ऑर्थडॉक्स चर्चशी झाला. आपली धर्माबाबतची समग्र भूमिका, आपली 'कन्फेशन्स', ''ए क्रिटिसिझम ऑफ डॉग्मॅटिक थिऑलाजी', 'फोर गॉस्पेल्स' आणि 'व्हॉट आय बिलिव्ह', ही चार पुस्तके वाचल्यानंतरच लक्षात येते. या आपल्या भूमिकेसंबंधी मी पूर्वी लिहिलेल्या दोन पत्रांमध्ये सविस्तर माहिती दिली असल्यामुळे त्याची मी पुनरुक्ती करीत नाही. चर्चच्या दांभिकतेवर आपण कठोर टीका केली ती धर्मगुरूंना सहन होणे शक्यच नव्हते. रशियातील ऑर्थडॉक्स चर्चच्या निकषांप्रमाणे आपण पाखंडी होतात आणि आपल्याला कठोर शिक्षा देणे आवश्यक होते. आपल्याला राजसत्ता हात लावायला भीत होती. त्यामुळे पोबोडे नोत्सेव्ह या आपणाला शत्रू मानणाऱ्या उच्चपदस्थ अधिकाऱ्याची फार पंचाईत झाली होती. शेवटी धर्मसत्तेला आपल्याविरुद्ध उठविण्याचे त्याने ठरविले आणि आपल्याला धर्मबहिष्कृत करण्याचा कट रचण्यात आला. धर्माच्या उच्चाधिकार समितीने आपल्यावर सहा आरोप ठेवले आणि २२ फेब्रुवारी १९०१ रोजी आपल्याला धर्मातून बहिष्कृत केल्याचे पत्रक काढण्याचे ठरले. धर्मगुरूंच्या या कारस्थानानुसार २४ फेब्रुवारी १९०१ला वर्तमानपत्रातून ही बातमी प्रसिद्ध झाली आणि लोकांना हे कळताच त्यांनी आपला जयजयकार करण्यास सुरुवात केली. जनसामान्यांना आपले वागणे खरे धार्मिक आहे, असेच वाटत असल्यामुळे आपल्याभोवती तुफान गर्दी जमली आणि लोकांनी आपल्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला. आपली सर्व मते मान्य नसणाऱ्यांनाही आपल्याबद्दल आदर वाटत होता आणि

धर्ममार्तंडांच्या क्षुद्रपणाबद्दल संताप आला होता. आपली पत्नी सोन्या ही ऑर्थडॉक्स चर्च मानणारी होती, परंतु आपल्याला धर्मबहिष्कृत करण्याचा चर्चला अधिकार नाही, असेच तिला ठामपणे वाटत होते.


होली सिनॉडने आपल्याला लिहिलेल्या पत्राला आपण जे उत्तर लिहिले आहे, ते मी वाचले आहे. त्या पत्रात आपण आपली भूमिका संयमाने पण निःसंदिग्धपणे मांडली आहे. ''माझी श्रद्धा कोणाला वावगी वाटली तरी मी ती सोडणार नाही, बदलणार नाही. इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा मी सत्याला श्रेष्ठ मानतो. मी ख्रिश्चिॲनिटी प्रमाणेच वागत आलो आहे. माझ्या तत्त्वांवर माझी उत्कट निष्ठा आहे. सत्याला सर्वश्रेष्ठ मानणाऱ्या तत्त्वनिष्ठ भूमिकेचे पालन करीत मी जगत आहे आणि त्याच भूमिकेचे पालन करीत मी आनंदाने मृत्यूला सामोरा जाणार आहे.'' आपले हे पत्र रशियात आणि परदेशात प्रसिद्ध झाल्यावर धर्मगुरूंच्या फटफजितीला पारावर उरला नाही.

या घटनेमुळे आपले महत्त्व तर वाढलेच, पण त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे रशियातील राजकीय, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रांतील पुरोगामी चळवळींना स्फुरण चढले. जागे झालेले तरुण पेटून उठले. सरकारचे माथे भडकले. पुन्हा दडपशाही सुरू झाली. जुलूम प्रचंड प्रमाणात होऊ लागला. तेव्हा आपण झार व सरकारी अधिकाऱ्यांना कळकळीची विनंती करणारे पत्र लिहिले. त्या पत्रात आपण पुढील शब्दांत झारला इशारा दिला होता : ''तुमची दडपशाही फार वेळ टिकू शकणार नाही. समाजातील अशांततेची कारणे शोधून काढा आणि नष्ट करा. ग्रामीण भागातील जनतेस नागरी हक्क द्या. शिक्षण आणि धार्मिक स्वातंत्र्य सर्वांना मिळालेच पाहिजे. लोकांना विश्वासात घ्या.''

या पत्रामधून आपले जनतेवरील प्रेम, आपला विशाल दृष्टिकोन आणि आपला द्रष्टेपणा व्यक्त झालेला आहे. या वेळी आपण लिहिलेला 'एकच उपाय' हा लेखही असाच कळकळीने सत्य सांगणारा आहे. या सर्व ताणतणावाने आजारी पडल्यावर आपण क्रिमिआत गेलात. तेथे थोडे बरे वाटल्यावर ''धर्म म्हणजे काय?'' हा लेख आपण लिहिला. तो वाचताना मला आपली उदात्त, उत्तुंग भूमिका पुन्हा समजली.

आपला नम्र,

ग. प्र. प्रधान



१३.

वेगळ्या कथा

आदरणीय लिओ टॉलस्टॉय,
सादर प्रणाम.

आपल्या कादंबऱ्या आणि आपल्या कथा या एकमेकांच्यापेक्षा अगदी वेगळ्या आहेत. 'वॉर अॅण्ड पीस', 'अॅना कॅरिनिना', 'रिसरेक्शन' या कादंबऱ्या शहरातील सुशिक्षित वाचकांना आवडतील अशा आहेत; परंतु आपल्या कथांचे स्वरूप मात्र लोकसाहित्याचे आहे. काही कथा प्रौढांसाठीही आहेत आणि मुलांसाठीही आपण अनेक कथा लिहिल्या आहेत. आपल्या सर्व कथा सोप्या, सुलभ शैलीतील आहेत. त्यांत मनुष्य स्वभावाचे जे वर्णन आहे, त्या कथांची जी कथानके आहेत, ती ऐकणाऱ्या आणि वाचणाऱ्या साध्या-सुध्या माणसांना आणि मुलांना खिळवून ठेवणारी आहेत. आपल्या कथांची जगातील जवळजवळ सर्व भाषांमध्ये भाषांतरे झाली आहेत. इसापनीती, आमच्याकडील पंचतंत्र यांच्याशी आपल्या अनेक कथांचे साम्य आहे. जगातील बहुतेक सर्व लोक परमेश्वराची भक्ती करतात. त्यांच्यापैकी बहुसंख्य लोक त्यांना जे हवे असते, त्यासाठी परमेश्वराची प्रार्थना करतात. आपल्या कथांमधून मात्र जे दु:खी आहेत, त्यांना साहाय्य करणे, जे भुकेले आहेत त्यांना खायला घालणे आणि हे करताना इतरांच्यावर प्रेम करणे, म्हणजेच परमेश्वराची भक्ती करणे होय, हीच शिकवण आपण दिलेली आहे. ती देताना आपण कोणाला प्रत्यक्ष उपदेश केलेला नाही. आपल्या कथांतील स्त्री-पुरुष सर्वसामान्य माणसांच्या सारखेच आहेत. आपल्या कथा वास्तवापासून कधी दूर जात नाहीत, त्यामुळेच त्या वाचकांच्या मनाची पकड घेतात.

आपली 'व्हेअर लव्ह ईज, गॉड ईज' ही गोष्ट मी अनेकांना सांगितली आहे आणि ती त्यांच्या अंत:करणाला स्पर्श करते, हे मी अनुभवले आहे. या कथेतील मार्टिनची मुले दुर्दैवाने मृत्युमुखी पडतात.

त्याला आयुष्याचा कंटाळा येतो; परंतु त्याच्या मूळच्या खेडेगावातील एक वृद्ध यात्रिक त्याला भेटतो आणि त्याला सांगतो, ''तू जेव्हा परमेश्वरासाठी जगू लागशील तेव्हा तुझ्या मनातले दु:ख नाहीसे होईल आणि तुला पुन्हा जगावेसे वाटेल.'' त्या यात्रिकाच्या सल्ल्याप्रमाणे मार्टिन नियमाने बायबल वाचतो आणि एक दिवस झोपेत असताना त्याला ''मी उद्या येईन'' असे शब्द ऐकू येतात आणि त्या शब्दाचा प्रत्यय, त्याला तो स्टेपॅनिच या भुकेल्या माणसाला आणि एका उपाशीपोटी असलेल्या स्त्रीला खाऊ घालतो आणि एक दिवस वृद्ध स्त्रीस मदत करतो, तेव्हा येतो. ही गोष्ट वाचताना हे सारे आपल्या डोळ्यांसमोरच जणू उभे राहते.

अशीच शिकवण असणारी 'टू ओल्ड मेन' ही गोष्ट आपण अगदी वेगळ्या रीतीने लिहिली आहे. जेरुसलेमला यात्रेसाठी बरोबर निघालेले एफिम आणि एलिशा हे दोघे वृद्ध मित्र आहेत. वाटेत एका ठिकाणी थांबलेल्या एलिशाला उपासमारीमुळे आसन्नमरण अवस्थेत असलेले एक कुटुंब दिसते. तो आपल्याजवळचे सगळे पैसे खर्च करून त्या कुटुंबातील माणसांचे प्राण वाचवतो आणि पुढे जाण्याऐवजी घरी परत येतो. एफिम मात्र जेरुसलेमला जातो आणि यात्रेच्या अखेरीस ज्या वेळी चॅपेलमध्ये जातो, छत्तीस दिव्यांच्या समोरील पवित्र अग्नीचे दर्शन घेतो, त्यावेळी त्याला तेथे एलिशासारखाच एक माणूस दिसतो. तो नंतर त्याला शोधतो, पण त्याला कोणी तसे भेटत नाही. यात्रा पुरी करून एफिम गावाला परत येतो. दोघे मित्र भेटतात आणि एलिशा एफिमला आपण वाटेत काय केले आणि कसे परत फिरलो, ते सांगतो. एफिमला चर्चमध्ये दिसलेला एलिशा आठवतो आणि तो म्हणतो, ''माझे पाय जेरुसलेमला पोचले, पण उपासमारीने तडफडणाऱ्या माणसांचे प्राण वाचविणाऱ्या एलिशाचा आत्मा जेरुसलेमला पोचला.'' हे सारे आपण या गोष्टीमध्ये अशा कलात्मकतेने सांगितले आहे, त्यामुळे वाचकांची जणू एलिशाशी प्रत्यक्ष भेट होते.

आपली 'व्हॉट मेन लिव्ह बाय?' या गोष्टीत परमेश्वराची आज्ञा न पाळल्यामुळे शाप मिळालेला आणि तीन प्रश्नांची उत्तरे शोधणारा एक देवदूत भूतलावर भटकत असतो. तो थंडीने कुडकुडत असताना सायमन हा चर्मकार त्याला आपला कोट पांघरायला देतो आणि त्याला जेवायला घरी नेतो. तो शापित देवदूत सायमनजवळच राहून जोडे शिवण्याचे काम कुशलतेने करू लागतो. त्या देवदूताला त्याच्या तीन प्रश्नांची उत्तरे कशी मिळतात, हे त्या कथेत सांगताना सायमनच्या परोपकाराप्रमाणेच दोन

अनाथ मुलींना वाढवणाऱ्या एका प्रेमळ स्त्रीची हकीगत सांगून आपण त्या देवदूताला त्याच्या प्रश्नांची उत्तरे कशी आणि कोणती मिळतात, हे मोठ्या कुशलतेने कथन केले आहे. माणसाच्या अंत:करणात प्रेम असते, हे सायमनच्या वागण्यातून त्या देवदूताला समजते. त्या स्त्रीचे निरपेक्ष वात्सल्य पाहून त्याला ती जणू परमेश्वरच आहे, असे वाटते आणि ''माणसे दुसऱ्यावर प्रेम करण्यामुळेच आनंदाने जगू शकतात.'' हे त्याच्या तिसऱ्या प्रश्नाचे उत्तरही मिळते. ही उत्तरे मिळाल्यावर शापातून मुक्त होऊन तो देवदूत पृथ्वीवरून परत स्वर्गलोकी जातो. ही एका देवदूताची कथा असली तरी वाचताना ''माणसे प्रेम करण्यामुळेच सुखाने जगू शकतात'' हा प्रकाशकिरण वाचकालाही दिसतो.

''थ्री हरमिट्स्'' या कथेतील खरे पवित्र जीवन जगणारे तीन तपस्वी आणि त्यांना प्रार्थना शिकवणाऱ्या धर्मगुरूला त्यांचे मोठेपण समजल्यावर ''तुम्ही खरी परमेश्वराची लेकरे, तुम्हांला प्रार्थना शिकवण्याचा मला अधिकार नाही. तुम्हीच आम्हा पापी माणसांसाठी प्रार्थना करा,'' हे त्या धर्मगुरूचे उद्गार, हे सारेच अविस्मरणीय आहे. त्या कथेतील त्या तीन तपस्व्यांचे पाण्यावर चालणे हा चमत्कार विसरून त्यांच्या वागण्यातच त्याचे खरे तप:सामर्थ्य आहे, हे सत्य आम्हा वाचकांच्या मनावर बिंबवले जाते.

आपल्या कथांमध्ये खोटी भावुकता नाही. आंधळी भक्तीही नाही. काही कथांमध्ये तर सत्याचे कठोर दर्शनही आहे. 'गॉड सीज दि ट्रुथ बट् वेट्स' या कथेतील ऑक्सेनॉव्हची कथा अंत:करणाला पाझर फोडणारी आहे. ऑक्सेनॉव्ह प्रवासात असताना त्याच्यावर खुनाचा आरोप येतो, त्याच्या सामानात रक्तरंजित सुरा सापडल्यामुळे त्याला जन्मठेपेची शिक्षा होते आणि तो सव्वीस वर्षे ही शिक्षा भोगतो. ज्याने खून केला होता आणि लबाडीने सुरा ऑक्सेनॉव्हच्या सामानात दडवला होता, तो सेमेनोव्हिच नावाचा इसम शिक्षा होऊन नंतर तेथे येतो आणि ऑक्सेनॉव्हजवळ आपल्या गुन्ह्याची कबुली देतो. या कथेतील ऑक्सेनॉव्हच्या मनाची तडफड आणि त्याचा उफाळलेला राग आणि तरीही अखेर त्याच्या दु:खाला कारणीभूत झालेल्या सेमेनोव्हिचला त्याने क्षमा करणे आणि ज्या वेळी ऑक्सेनॉव्हच्या सुटकेचा हुकूम येतो, त्यापूर्वीच त्याचे झालेले निधन हे सारे वाचताना माझे मन क्षुब्ध झाले; पण माझ्या मनात रेंगाळत राहिली ती दुर्दैवी ऑक्सेनॉव्हच्या बद्दलची विषण्णता

आणि त्याचबरोबर दुर्दैवाचे दशावतार शांतपणे स्वीकारणाऱ्या क्षमाशील ऑक्सेनॉव्हबद्दलचा नितांत आदर.

आपल्या कथांच्याबद्दल कितीही लिहिले तरी ते अपुरेच आहे; पण तरीदेखील ''हाऊ मच लॅण्ड डझ ए मॅन नीड'' आणि ''ए ग्रेन अॅज बिग अॅज हेन्स एग'' या दोन कथांच्याबद्दल लिहिल्याशिवाय मला राहवत नाही.

''हाऊ मच लॅण्ड डझ ए मॅन नीड'' या कथेतील पॅहोम या शेतकऱ्याची व्यक्तिरेखा आपण वास्तवाचे पूर्ण भान ठेवून स्पष्टपणे रेखाटली आहे. अनेक वर्षे काबाडकष्ट केल्यानंतर त्याच्या मनात निर्माण झालेली सुखोपभोगाची इच्छा, त्याचे जमिनीवरील प्रेम, आपण जमिनीतून सोने पिकवू हा त्याला असलेला आत्मविश्वास या साऱ्या स्वभाव छटांमधून साकार झालेला पॅहोम हा मला नेहमी भेटणाऱ्या शेतकऱ्यांपैकीच एक आहे, असे वाटले. अमाप जमिनीचा मालक असलेला बष्कीरांचा प्रमुख त्याला एका टेकडीवर घेऊन जातो आणि मैदानाकडे पाहत म्हणतो, ही सगळी आणि तुझी नजर पोचेल तेथपर्यंतची जमीन आमची आहे. तुला यातली हवी तितकी जमीन घे.'' नंतर तो आपली टोपी जमिनीवर ठेवतो आणि पॅहोमला सांगतो, ''तू ही खूण लक्षात ठेव. तू दुसऱ्या टोकाला कितीही जा, मात्र दिवस मावळेपर्यंत इथे परत येऊन पोच. दिवसभरात तू चालशील तितकी जमीन तुझी.'' पॅहोम दिवसभर धावतो, त्याची दमछाक झालेली असते. सूर्य मावळण्याची वेळ जवळजवळ झालेली असते, पण पॅहोमला उरलेल्या वेळात जास्तीत जास्त जमीन मिळवली पाहिजे, असा लोभ सुटतो. तो जिवाच्या आकांताने धावतो आणि शेवटची उडी मारतो तेव्हा उरी फुटून त्याचा प्राण जातो. केवळ सहा फूट जमिनीवर त्याचा निष्प्राण देह विसावतो. या गोष्टीला तात्पर्य आहे, पण ते आपण सांगितलेले नाही. आपल्या नाट्यपूर्ण कथेतून ते सहज प्रगट झाले आहे.


'कोंबडीच्या अंड्याएवढा धान्याचा दाणा' ही कथा मुलांसाठी आहे आणि थोरांसाठीही आहे. अंड्याएवढा मोठा दाणा पाहिल्यावर तो कसा उगवेल हे राजाला समजत नाही, म्हणून तो त्याच्या राज्यातील सर्वांत म्हाताऱ्या शेतकऱ्याला विचारतो. दोन कुबड्यांच्या आधाराने कसाबसा चालणारा, नीट दिसत नसलेला शेतकरी तो दाणा चाचपतो पण त्याला काही सांगता येत नाही. त्याच्या एका कुबडीच्या आधारे चालणाऱ्या बापाकडूनही राजाचे समाधान होत नाही. मग त्या वृद्ध शेतकऱ्याच्या

आजोबाला बोलावतात. कसलाही आधार न घेता चालणारा, डोळे-कान शाबूत असणारा तो वृद्ध शेतकरी धान्याचा दाणा पाहून खूष होतो आणि राजाला सांगतो, "मी तरुण असताना असेच धान्य आम्ही पिकवीत होतो. असेच बी पेरल्यावर भरपूर पीक येत असे आणि मग आम्ही त्याची झोडणी करत असू." राजाने त्याला विचारले, "तुम्ही असे बी-बियाणे कोठे विकत घेत होता? आणि तुमचे धान्य कोठे विकत होता?" यावर हसून तो वृद्ध शेतकरी म्हणाला, "आमच्या वेळी कोणी धान्य विकत नव्हते, मग कोण कसे विकत घेणार? आम्ही भरपूर कष्ट करून, घाम गाळून शेती करीत होतो आणि धरतीमाता आम्हांला सर्वांना हवे तितके धान्य देत होती. कष्ट करणे हा आमचा धर्म होता आणि कोणीही दुसऱ्याच्या श्रमांवर जगत नव्हता." या गोष्टीलाही तात्पर्य आहे. त्या वृद्ध शेतकऱ्याच्या तरुणपणी सगळीकडे कोंबडीच्या अंड्याएवढे धान्य देणारी शेते होती व त्याच्यावर आनंदाने कष्ट करणारे शेतकरी होते. हे जितक्या सहजतेने घडले, त्या सहजतेनेच आपल्या गोष्टीचे तात्पर्य उमगले आहे. कोंबडीच्या अंड्याएवढ्या धान्याच्या दाण्यामुळे दिपून गेलेल्या राजाप्रमाणेच आपल्या चित्तवेधक गोष्टीमुळे मीही दिपून गेलो.

आपल्या सुंदर कथांचा सारांश सांगताना मी ज्या वेळी त्या गोष्टी मुलांना साध्या रीतीने सांगत असे, त्या वेळी मुले कशी रंगून जात, हे मला आजही आठवते. माझा मित्र राजा मंगळवेढेकर हा आपल्या गोष्टी नाट्यपूर्ण रीतीने सांगे आणि त्या वेळी मुलांना आपल्या कथांचे सौंदर्य कळत असे. आपण "व्हॉट इज आर्ट" या आपल्या प्रबंधात लिहिले आहे, "कला हा एक मानवी व्यवहार आहे. आपल्याला सत्य दिसल्यामुळे ज्या भावनांचा अनुभव आला, त्या भावना स्वत:मध्ये पुन्हा जागृत करून मग रेषा, रंग, लय, सूर, शब्द इत्यादींच्या साहाय्याने इतरांनाही तो तितकाच उत्कट अनुभव आणून देणे, हे कलेचे कार्य आहे." आपल्या कथांमधून आपण हे परिपूर्णपणे साधले आहे.

आपला नम्र,

ग. प्र. प्रधान



१४.

टॉलस्टॉय आणि समकालीन लेखक

आदरणीय लिओ टॉलस्टॉय,
सादर प्रणाम.

जगातील सर्व साहित्यप्रेमी रसिक, एकोणिसाव्या शतकात रशियाने जगाला चार मोठे ललित लेखक दिले, असे मानतात. तुर्जेनेव्ह, आपण, दोस्तोव्हस्की आणि चेकॉव्ह यांना जागतिक साहित्यातील मानदंड मानले जाते. आपणा चौघांच्या साहित्याचे स्वरूप वेगवेगळे होते. चौघांची शैली वेगवेगळी होती. आपणा चौघांचा जीवनविषयक आणि साहित्यविषयक दृष्टिकोनही भिन्न होता. आपण विविध क्षेत्रांमध्ये कामे केली. खरा धर्म शोधला आणि सन्मार्गाने वाटचाल केली. तुर्जेनेव्ह, दोस्तोव्हस्की आणि चेकॉव्ह यांनी मात्र साहित्याची साधना हाच त्यांच्या जीवनाचा धर्म मानला. असे असले तरी चौघांमध्ये एक साम्य होते आणि ते म्हणजे आपण चौघेही जण जीवनावर आणि माणसांवर नितांत प्रेम करीत होतात. मला रशियन भाषा येत नाही त्यामुळे आपल्या कोणाच्याच भाषा शैलींसंबंधी मी लिहू शकणार नाही; परंतु आपण आपल्या मायबोलीची उपासना अनन्यसाधारण रीतीने केली आणि रशियन साहित्याच्या वैभवाचे जगाला दर्शन घडविले. कला ही शाश्वत असते, तिला दिक्कालाच्या मर्यादा नसतात, याचा प्रत्यय एकोणिसाव्या शतकातील आपणा चार महान लेखकांच्या साहित्यातून जगातील साहित्यप्रेमी रसिकांना आला.

आपल्या चौघांमध्ये तुर्जेनेव्ह हे वयाने सर्वांत वडील. आपल्यापेक्षाही दहा वर्षांनी मोठे, ते पुष्किन यांच्या अभिजात साहित्यावर (क्लासिकल लिटरेचर) वर प्रेम करणारे, मात्र कोणताही पूर्वग्रह न ठेवता, नवसाहित्याचे, नवीन लेखकांचे स्वागत करणारे होते. आपली 'कोझॅक्स' ही कादंबरी वाचल्यावर रशियाच्या साहित्यक्षितिजावर एक असामान्य तेजस्वी तारा उगवला आहे, हे त्यांनी जाणले आणि त्यांनी मुक्त कंठाने 'कोझॅक्स'ची स्तुती केली. पुढे अनेक वर्षांनी त्यांनी लिहिलेल्या एका पत्रामध्ये ''मी 'कोझॅक्स'चे फ्रेंचमध्ये भाषांतर

करणार आहे.'' असे लिहिले असून ही असामान्य कलाकृती जगातील रसिकांपर्यंत गेली पाहिजे, असे लिहिले आहे. आपण एकदा शेतात चरणाऱ्या घोड्याचे जे वर्णन केले ते ऐकल्यावर आपणाला घोड्याच्या सूक्ष्म संवेदनाही समजतात, हे लक्षात येऊन तुर्जेनेव्ह म्हणाले, की आपला पूर्वजन्म घोड्याचा असावा. आपले आणि तुर्जेनेव्ह यांचे अनेकदा मतभेद होत, काही वेळा भांडणही होई; परंतु तुर्जेनेव्ह यांचे आपल्या साहित्यावर उत्कट प्रेम असल्यामुळे मतभेदांचे ढग विरून जात. तुर्जेनेव्ह यांच्या आणि आपल्या ललित साहित्याचे स्वरूप वेगवेगळे असले, तरी तुर्जेनेव्ह हे मोठे लेखक आहेत, हे आपण जाणत होता. तुर्जेनेव्ह यांच्या काही लेखनावर आपण टीका केली असली, तरी त्यांच्या शैलीमधील सौंदर्याचे आपल्याला आकर्षण वाटे. आपल्या 'वुडफेलिंग' या गोष्टीमध्ये तुर्जेनेव्ह यांच्या शैलीचा आपल्यावर पडलेला प्रभाव दिसून येतो. तेही 'वॉर अॅन्ड पीस' ही आपली महान कादंबरी रशियन साहित्याला ललामभूत ठरली आहे, असे मानत. त्यामुळेच आपण ललित लेखन थांबवल्यावर तुर्जेनेव्ह यांना फार वाईट वाटले. आपल्या जीवनातील आध्यात्मिक उलथापालथ तुर्जेनेव्ह यांना निरर्थक वाटे. आपण केवळ साहित्यनिर्मिती करावी, अशी त्यांची अपेक्षा होती. आपल्याला यास्नाया पोल्यानातील शेतकऱ्यांच्या मुलांना शिकविण्यात अतिशय आनंद वाटे. तुर्जेनेव्ह मात्र म्हणत, 'लिहायचं सोडून टॉलस्टॉय या उचापती कशाला करतो?' आपण चार गॉस्पेल्सचे भाषांतर केले, कारण आपला धर्ममार्गावर सत्याचा शोध चालू होता. तुर्जेनेव्ह यांना मात्र अशा लेखनात आपण वेळ घालवल्यामुळे रशियन साहित्याची हानी होत आहे, असे वाटे. चार गॉस्पेल्सचे भाषांतर आपल्या धर्म मार्गावरील एक महत्त्वाचा टप्पा; परंतु तुर्जेनेव्ह हे लौकिक जीवनात रस घेणारे. वैभवात शांतपणे जगण्यात त्यांना आनंद वाटे. आपल्या अंतरंगातील वादळ ते समजू शकले नाहीत. मात्र तुमच्याबद्दलचे त्यांचे प्रेमही कधी कमी झाले नाही. आपण दोघेही एकमेकांच्या घरी राहिलात. तुर्जेनेव्ह हे सौम्य प्रकृतीचे. आपल्या कौटुंबिक जीवनातील आनंदी वातावरण पाहून त्यांना समाधान वाटे. आपल्या पत्नी, मुले यांनाही त्यांच्याबद्दल आपुलकी वाटे. आपण त्यांच्याकडे राहात असताना तुर्जेनेव्ह आपल्या सर्व लहरी सांभाळीत; परंतु पुष्किन यांच्या साहित्यावर प्रेम असूनही आपण त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ होणाऱ्या समारंभास जाण्याचे नाकारले. यामुळे तुर्जेनेव्ह यांना फार वाईट वाटले, रागही आला. आपण तुर्जेनेव्ह यांच्याबद्दल जे लिहिले आहे, त्यावरून आपल्याला त्यांच्या साहित्याबद्दल किती प्रेम वाटे हे समजून येते. आपण लिहिले आहे, 'तुर्जेनेव्ह हे आयुष्यभर स्वतंत्र वृत्तीने जगले.

जीवनातील सत्य व सौंदर्य त्यांनी शोधले. ते एक सच्चे, स्वाभिमानी कलावंत होते. त्यांनी लोकांना जे हवे, तसे लिहून स्वतःची प्रतिष्ठा कधी कमी केली नाही. काही ठिकाणी त्यांचे साहित्य कदाचित वाट चुकले असेल; परंतु तुर्जेनेव्ह यांनी ते साहित्यही प्रामाणिकपणेच लिहिले होते.'

तुर्जेनेव्ह यांच्या मृत्यूपूर्वी त्यांची आणि आपली भेट झाली नाही, याबद्दल आपण हळहळलात, आपल्याला दुःख झाले. दोस्तोव्हस्की यांच्या जीवनाबद्दल आणि साहित्याबद्दल आपले मत चांगले नव्हते. स्ट्रॅकॉव्ह यांनी दोस्तोव्हस्कीचे चरित्र लिहिले होते. ते वाचल्यावर स्ट्रॅकॉव्ह यांना लिहिलेल्या पत्रात आपले दोस्तोव्हस्की यांच्याबद्दलचे प्रतिकूल मत आपण पुढील शब्दांत व्यक्त केले आहे :

"तुमची दोस्तोव्हस्कींच्या बाबतीत गफलत झाली आहे, असे मला वाटते. तुम्ही त्यांना अकारण फार मोठे मानले आहे. दोस्तोव्हस्की यांच्या मनात अखेरपर्यंत सत आणि असत् (गुड् अँड इव्हल) यांचा जो झगडा चालू होता, त्याचे स्वरूप समजून न घेता तुम्ही आणि अन्य अनेकांनी त्यांना संत आणि प्रेषित मानले आहे. त्यांचे लेखन अंतःकरणाला स्पर्श करते, ते चित्तवेधकही आहे. पण ज्या लेखकाच्या मनात आयुष्यभर द्वंद्व चालू होते, त्याचे लेखन भावी पिढ्यांना प्रकाश देणारे आहे, असे म्हणताना तुम्ही दोस्तोव्हस्कींना जे उच्चपदस्थ बनविले आहे, ते योग्य नाही. दोस्तोव्हस्की हे अखेरपर्यंत अस्वस्थ होते. त्यांच्या वाटचालीत त्यांना अंतिम टप्पा गवसला नाही. मला तुर्जेनेव्ह यांचे साहित्य अधिक आवडते. ते अस्वस्थ नव्हते, पण ज्या ठिकाणी त्यांना जायचे होते, तेथे ते जाऊन पोचले. दोस्तोव्हस्की हे मात्र अखेरपर्यंत अस्वस्थपणेच जगत होते."

स्ट्रॅकॉव्ह यांनी आपल्याला लिहिलेल्या उत्तरात लिहिले आहे, "दोस्तोव्हस्की यांच्या दोषांची मला जाणीव आहे. त्यांच्या काही प्रमादांच्याबद्दल मी लिहिले असते, तर माझे लेखन अधिक सत्यदर्शी झाले असते; परंतु दोष विसरायचे असतात. दोस्तोव्हस्की यांच्यासारख्या लेखकांच्या लेखनातील सौंदर्याचेच मी रसग्रहण केले, कारण त्यांच्या दुर्गुणांच्यापेक्षा तेच महत्त्वाचे आहे. त्यांच्या साहित्यात ज्या सौंदर्याचा आविष्कार झाला आहे, तेच अखेर शाश्वत आहे." मला स्ट्रॅकॉव्ह यांचे म्हणणे पटले.

दोस्तोव्हस्की यांना क्रांतिकारकांशी संबंध ठेवल्याबद्दल फाशीची शिक्षा झाली होती. सुदैवाने अखेरच्या क्षणी ती रद्द झाली होती. मात्र त्यांना अनेक वर्षे सायबेरियात शिक्षा भोगावी लागली. ते सायबेरियात असताना त्यांना 'कॉन्टेम्पोररी' या मासिकातील आपण 'एल.एन.' या टोपणनावाने लिहिलेले

साहित्य वाचायला मिळाले आणि ते वाचून दोस्तोव्हस्की इतके प्रभावीत झाले, की त्यांनी आपल्या मित्राला 'एल.एन. हा प्रतिभावान लेखक कोण आहे, ते मला कळव' असे उत्साहाने लिहिले होते.

पुढे आपली 'अॅना कॅरिनिना' ही कांदबरी वाचल्यावर ती एक सर्वश्रेष्ठ कलाकृती आहे, असे दोस्तोव्हस्की यांना मनोमन वाटले. त्यांनी या संदर्भात लिहिलेल्या लेखाबद्दल मी आपणास पूर्वीच्या एका पत्रात लिहिलेलेच आहे. दोस्तोव्हस्की यांचा तो लेख वाचताना आपण मानवी मनातील गुंतागुंतीचे जे दर्शन घडविले आहे, त्यातील असामान्यत्वाचे दोस्तोव्हस्की यांनी केलेले विश्लेषण 'क्राइम अँड पनिशमेंट' आणि 'ब्रदर्स कारमाझाव्ह' तसेच 'डायरी ऑफ अ मॅडमन' लिहिणारा महान लेखकच करू शकेल, असे मला वाटले. दोस्तोव्हस्की यांना आपल्याला भेटायचे होते आणि ही भेट झाली असती तर दोस्तोव्हस्की यांच्या मनातील वादळे ही, त्यांच्या जीवनातील प्रदीर्घ हालअपेष्टांचा त्यांच्या मनावर जो प्रचंड आघात झाला होता, त्यामुळे निर्माण झालेली होती, हे आपण सहृदयतेने जाणले असते. दोस्तोव्हस्की यांच्या आयुष्याची जी होरपळ झाली आणि तिचे जे चटके त्यांना सहन करावे लागले, त्याचा परिणाम त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर झाला होता आणि त्याचाच संबंध त्यांच्या साहित्यात काही वेळा दिसणाऱ्या भावनातिरेकाशी होता, हे आपल्या खासच लक्षात आले असते. परंतु दोस्तोव्हस्कींची आणि आपली भेटच झाली नाही. त्यांनी तुर्जेनेव्ह यांच्याजवळ 'मला टॉलस्टॉय यांना भेटावेसे वाटते', हे सांगितल्यावर तुर्जेनेव्ह यांनी त्यांच्याजवळ आपल्या स्वभावाचे आणि त्या वेळच्या आपल्या मन:स्थितीचे असे वर्णन केले, की दोस्तोव्हस्की यांनी आपली भेट घेण्याचा विचारच सोडून दिला. त्यानंतर एक वर्षाच्या आतच दोस्तोव्हस्की यांचे निधन झाले. एकूणच दोस्तोव्हस्की यांच्या आणि आपल्या मनाच्या तारा जुळल्या नाहीत. दोस्तोव्हस्की यांच्या दुर्दैवी जीवनात त्यांना आपल्या स्नेहाची शीतल सावली काही काळ तरी मिळावयास हवी होती, असे मला राहून राहून वाटते.

अॅन्टन चेकॉव्ह या थोर लेखकाचा आणि आपला स्वभाव अगदी वेगळा असताना, तसेच त्यांचा आणि आपला जीवनविषयक दृष्टिकोन भिन्न असतानाही, चेकॉव्ह यांच्यावर आपण मनापासून प्रेम केले. चेकॉव्ह आपल्यापेक्षा वयाने कितीतरी लहान होते. ते डॉक्टर असल्यामुळे त्यांचे आणि आपले अनुभवविश्वही वेगळे होते. मात्र आपले उत्तुंग व्यक्तिमत्त्व आणि साहित्यात झालेला आपल्या विशाल अंत:करणाचा आविष्कार यामुळे चेकॉव्ह

आपल्याकडे आकृष्ट झाले. १८९५ मध्ये चेकॉव्ह आपल्याला भेटायला आले, तेव्हा आपण खांद्यावर टॉवेल टाकून नदीवर चालला होतात. चेकॉव्ह आपल्याला एक शेतकरीच समजले, आणि आपणच टॉलस्टॉय हे समजल्यावर ते चकितच झाले. चेकॉव्ह यांनी त्यांचे नाव सांगताच आपल्याला आनंद वाटला. कारण आपण त्यांच्या कथा वाचल्या होत्या आणि आपल्याला त्या आवडल्या होत्या. आपण नदीत मजेत पोहत होतात आणि चेकॉव्ह यांच्याशी मधूनमधून मजेत बोलतही होतात. आपले सुदृढ शरीर आणि अकृत्रिम वागणे पाहून चेकॉव्ह थक्क झाले. आपणा दोघांतील वयाचे अंतरही गळून पडले आणि आपणा दोन थोर लेखकांमध्ये तत्काळ भावबंध निर्माण झाला.

१९०१ मध्ये आपली प्रकृती बिघडली होती, म्हणून आपण क्रिमियात गेला होतात आणि ग्रास्पा या गावी एका प्रासादतुल्य इमारतीत राहत होतात. चेकॉव्ह यांना क्षयरोग झाला असल्यामुळे ते आपल्या निवासापासून काही मैलांवरच याल्टा येथे राहत होते. ते आपणास नेहमी भेटायला येत. चेकॉव्ह यांची 'डार्लिंग' ही कथा आपल्याला एक सुंदर कलाकृती वाटत असे. 'डार्लिंग' या कथेत ओलेंका या स्त्रीचे हे व्यक्तिचित्र चेकॉव्ह यांनी रेखाटले आहे. ते अविस्मरणीय आहे. कोणावर तरी सर्वस्व ओतून प्रेम करणे, हा ओलेंकाचा स्वभाव होता. ती स्वत:ला विसरून जाई आणि ज्या व्यक्तीवर ती प्रेम करी त्या व्यक्तीचे जग हेच तिचे जग होत असे. अठरा-एकोसिाव्या वर्षी तिचे लग्न एका थिएटरच्या मॅनेजरशी झाले, त्यावेळी मैत्रिणीशी बोलताना 'हिवाळ्यात लोक चित्रपट पाहायला कसे फारसे येत नाहीत, पण उन्हाळ्यात मात्र थिएटर भरलेले असते,' असे थिएटरच्या विषयावरच बोलत राही. दुर्दैवाने न्यूमोनिया होऊन तिचा नवरा मरण पावला. त्या वेळचा तिचा शोक पाहून दु:खाने उरी फुटलेली ओलेंका फार दिवस जगायची नाही, असे तिच्या मैत्रिणींना वाटले. पण प्रेम केल्याशिवाय जगू न शकणाऱ्या ओलेंकाने काही दिवसांनी एका लाकडाच्या व्यापाऱ्याशी लग्न केले. त्यानंतर मैत्रिणींशी बोलताना, एका घनफूट सागवानास किती रूबल्स पडतात, यावरच ती बडबडत राही. ओलेंका म्हातारी झाली, त्या वेळी ती एकटीच असल्याने सैन्यातील एका डॉक्टरने त्याचा दहा-बारा वर्षांचा मुलगा तिच्याजवळ ठेवला. त्यानंतर हा मुलगा हेच तिला तिचे जीवन सर्वस्व वाटू लागले. ओलेंका त्याला शाळेपर्यंत पोचवायला जाई, तेव्हा त्या मुलाला त्याच्या वर्गातील मुले चिडवीत. त्यामुळे तो ओलेंकाला, 'तू जा पाहू परत,' असे खेकसून सांगे. ओलेंका थांबे पण मुलगा शाळेच्या दाराशी पोचेपर्यंत टक लावून पाहत राही. परत घरी येताना, भाजी विकत घेताना भाजीचा भाव

विचारण्याऐवजी ती भाजीवालीला म्हणे, 'अगं, शाळेत हल्ली मुलांचा अभ्यास किती कठीण झालाय! दहा वर्षांच्या मुलांना त्रैराशिकं शिकावी लागतात.' त्या कथेच्या शेवटी तो मुलगा झोपलेला असताना ओलेंका त्याच्या अंथरुणाजवळ बसून त्याला पाहत बसली आहे. त्याच वेळी त्या मुलाला जे स्वप्न पडते, त्यात तो झोपेतच ओरडतो, 'म्हातारे, परत जा पाहू तू.'

कोणावर तरी मायेची पाखर घालीत जगणाऱ्या ओलेंकांची चेकॉव्ह यांनी रेखाटलेली व्यक्तिरेखा आपल्याला हृदयस्पर्शी वाटली आणि फार आवडली. आपण हे चेकॉव्ह यांना सांगितल्यावर त्यांना धन्य वाटले. आपला आणि चेकॉव्ह यांचा हा ऋणानुबंध फार हृद्य होता. या तरुण लेखकाच्या मनाशी आपल्या मनाची तार जुळली होती. चेकॉव्ह यांनाही आपल्या सहवासात फार आनंद वाटे. आपण एकदा चेकॉव्हना म्हणालात, "मला तू लिहिलेल्या कथा आवडतात, पण तुझी नाटके आवडत नाहीत. मात्र हे खरे, की तुझी नाटके शेक्सपिअरच्या नाटकांच्यापेक्षा चांगली आहेत." हे आपले बोलणे ऐकून चेकॉव्ह इतके हसले, की हसता हसता त्यांचा चष्मा खाली पडला. आपल्यापेक्षा वेगळे विचार असणारे चेकॉव्ह यांना आपल्या प्रेमळ स्वभावामुळे, उत्तुंग व्यक्तिमत्त्वामुळे आपल्याबद्दल फार जिव्हाळा वाटे. चेकॉव्ह हे वास्तववादी लेखक होते आणि आपला दृष्टिकोन त्यांच्यापेक्षा वेगळा असला तरी आपण रेखाटलेल्या व्यक्तिरेखा चेकॉव्ह यांना जित्या जागत्या वाटत. आपल्या साहित्यात सत्याचा कोठेही विपर्यास नसे, याची चेकॉव्ह यांना जाण होती. आपल्या दोघांमधील जिव्हाळ्यामुळे चेकॉव्ह यांना आपल्या प्रकृतीची काळजी वाटे. दैवदुर्विलास हा, की क्षयाचा विकार बळावून चेकॉव्ह यांचे एक वर्षाच्या आत निधन झाले. आपण चेकॉव्ह यांच्या साहित्याबद्दल म्हटले आहे, "चेकाव्ह हा माझ्यापेक्षा फारच वरच्या दर्जाचा कलावंत होता."

आपल्याला क्रिमियात भेटायला येणाऱ्यांमध्ये मॅक्सिम गॉर्की हे झुंजार कम्युनिस्ट कार्यकर्ते व लेखक होते. ते पूर्वी यास्नाया पोल्यानाला आपल्या घरी घेऊन गेले होते. गॉर्की यांचे आयुष्य दारिद्र्याचे चटके सोसण्यात, हालअपेष्टा भोगण्यात गेलेले, पण ते हिंमत न हारता जुलमाविरुद्ध झगडत होते. त्यांनी दिवसाचे पंधरा पंधरा तास बेकरीतल्या भट्टीत काम केले होते, आणि त्या अनुभवाच्या आधारेच 'ट्वेंटीसिक्स मेन ॲण्ड अ गर्ल' ही वास्तवाचे कठोर दर्शन घडविणारी कथा लिहिली होती. गॉर्की वागण्यात साधेसुधे, काहीसे राकट होते. आपण त्यांना बोलके करण्याचा प्रयत्न केला, पण आपल्या दोघांच्या वयात चाळीस वर्षांचे अंतर होते. आपल्या पत्नीच्या उच्चभ्रू वागण्यामुळे गॉर्की बुजून

जात असत, शिवाय आपल्या दु:खाची कहाणी सांगणे त्यांना आवडत नसे. ते एक लढाऊ कार्यकर्ते होते. गॉर्की यांनी आपल्या ज्या आठवणी लिहिल्या आहेत, त्या फार हृद्य आहेत. मी त्या वाचल्या आहेत. आपण एक दिवस गॉर्कींना विचारले, 'तुम्ही देव मानता की नाही?' गॉर्की म्हणाले, 'नाही.'

आपण विचारले, 'का मानीत नाही?'

गॉर्कींनी उत्तर दिले, 'माझी देवावर श्रद्धा नाही.'

आपण म्हणालात, 'हे तितकेसे खरे नाही. तुमचा स्वभाव तर श्रद्धाशील आहे.'

गॉर्कींचा देवावर विश्वास नव्हता, पण त्यांना खडतर आयुष्य जगताना देवमाणसे भेटली होती आणि आपणही त्यांना देव माणूस वाटत होता. गॉर्की हे साहित्याला क्रांतिकारक विचारांच्या प्रचाराचे साधन मानत होते. त्यांचे बरेचसे लेखन प्रचारकी आहे. 'मदर' ही त्यांची कादंबरी मात्र वेगळी आहे. क्रांती म्हणजे काय, याची काहीही माहिती नसलेली निरक्षर स्त्री, गॉर्कींची अनपढ आई आपल्या मुलाची धडपड पाहते, तिला हे सत्कार्य आहे असे वाटते आणि तिचे हृदयपरिवर्तन होऊन ती क्रांतिकार्याशी मनाने एकरूप होऊन जाते. मी कॉलेजमध्ये असताना गॉर्कींची 'मदर' ही कादंबरी वाचली. त्या वेळी मी फार प्रभावित झालो होतो.

आपल्याला गॉर्कींच्याबद्दल आपुलकी वाटे; मात्र आपण साहित्याला कधी प्रचाराचे साधन मानले नाही. आपल्या 'व्हॉट इज आर्ट' या ग्रंथात कलेबद्दलची आपली भूमिका आपण मांडली आहे. आपण एका ठिकाणी पुढीलप्रमाणे लिहिले आहे.

'माणसांनी एकमेकांवर प्रेम करीत जगण्यातच मानवजातीचे कल्याण आहे, हे सत्य विचारांच्या पातळीवरून भावनांच्या पातळीवर संक्रांत करणे, हेच कलेचे उद्दिष्ट आहे.'


आपण 'व्हॉट इज आर्ट' या पुस्तकात लिहिले आहे; ''कलेमध्ये, साहित्यात ज्या अनुभवाचे चित्रण केले असेल, त्या अनुभवाचा प्रत्यय वाचकाला आला पाहिजे.'' त्यानंतर आपण लिहिले आहे. ''लेखकाच्या अशा सच्च्या अनुभवाचा प्रत्यय आल्यामुळे वाचकांच्या मनावर काय परिणाम होतो, हेही पाहिले पाहिजे. वाचकाच्या मनातील सद्भावनांना आवाहन मिळत असेल, तर ती कलाकृती श्रेष्ठ आहे, असे मी मानतो. याउलट पापी वासना अगर दुष्ट विचार वाचकांच्या मनात निर्माण होत असतील तर ती कलाकृती वाईट आहे.'' आपण असेही या प्रबंधात लिहिले आहे, की उच्चभ्रू

वाचकांसाठी लिहिलेल्या साहित्यात बव्हंशी वासना हा विषय असतो आणि त्यामुळे ते साहित्य हीन मानले पाहिजे. आपण आपल्या विवेचनात पुढे म्हटले आहे, ''बहुसंख्य साध्या माणसांच्या मनात वैश्विक भावनेचा (युनिव्हर्सल स्पिरिट) जो एक अंश असतो, त्याला आवाहन करणारे साहित्यच श्रेष्ठ असते आणि ते स्थळकाळाच्या मर्यादा ओलांडते.'' या भूमिकेच्या आधारेच आपण लोकसाहित्य हे अभिजात वाङ्मयापेक्षा श्रेष्ठ आहे, असे प्रतिपादन केले आहे. अनेक समीक्षकांना आणि लेखकांना आपली ही कलेबाबतची भूमिका विवाद्य वाटते. मी येथे आपल्या 'व्हॉट इज आर्ट' या ग्रंथाचा केवळ ओझरता उल्लेख करीत आहे. त्याची चर्चा मी करणार नाही. आपल्याला निव्वळ सौंदर्यवादी कला मान्य नाही. मानवतेचा, प्रेमाचा संस्कार करणारी कला हीच आपणास श्रेष्ठ कला वाटते. द्वेष, मत्सर निर्माण करणारी, वासना चेतवणारी कला ही घातकी असते, अशी आपली भूमिका आहे.

आपली भूमिका मला बव्हंशाने मान्य असली, तरी कलेचे विवेचन करताना आपण गटे आणि शेक्सपिअर यांच्या साहित्याबद्दल व्यक्त केलेला अभिप्राय मला मान्य नाही, हे मी आपणास नम्रपणे सांगू इच्छितो. आपल्या 'व्हॉट इज आर्ट' या ग्रंथाचा मराठी अनुवाद आधुनिक महाराष्ट्रातील एक संत साहित्यिक आणि स्वातंत्र्यसेनानी, माझे गुरू साने गुरुजी यांनी केला आहे.

आपला नम्र,

ग. प्र. प्रधान



१५.

कादंबरीचा नैतिक प्रभाव

आदरणीय लिओ टॉलस्टॉय,
सादर प्रणाम.

आपली 'रिसरेक्शन' ही कादंबरी मला आपल्या तीनही कादंबऱ्यांमध्ये सर्वांत अधिक आवडते. आपले चरित्रलेखक मॉड यांनी लिहिले आहे, ''कलेचे निकष लावल्यास 'रिसरेक्शन' ही कादंबरी 'ॲना कॅरिनिना' आणि 'वॉर ॲण्ड पीस' यांच्यापेक्षा कमी दर्जाची आहे; तिच्यामध्ये नैतिक भूमिकेच्या झालेल्या उघड आविष्कारामुळे ती थोर कलाकृती ठरत नाही, असा समीक्षकांचा अभिप्राय आहे; पण इंग्लंड आणि अमेरिकेत वाचकांना ती अतिशय आवडते.'

मला 'रिसरेक्शन' आवडते, याचे मुख्य कारण या कादंबरीतील नायक निखिल डॉव्हच्या व्यक्तिरेखेत आपल्या विलोभनीय व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब उमटले आहे. निखिल डॉव्हचे दैनंदिनी लिहिणे, सतत नैतिकतेने वागण्याचा निर्धार करणे, तरीही मोहाला बळी पडणे आणि हातून असा प्रमाद घडल्यावर पश्चात्तापाने मन भरून जाणे, हे तरुणपणी आपल्या आयुष्यात सतत घडत असे. कादंबरीच्या कथानकाच्या पूर्वार्धातील घटनेचे आपल्या 'डेव्हिल' या कादंबरीतील कथानकाशी साम्य आहे. आपल्याकडून विद्यार्थीदशेत एका तरुण नोकराणीबाबत जे घडले तीच घटना आपण चित्रित केली आहे. निखिल डॉव्ह त्याच्या मावशीकडे आला असताना तो तिच्या घरात घरकाम करणाऱ्या कात्युशाच्या प्रेमात पडतो आणि तीही त्याला प्रतिसाद देते. पुढे सैन्यात अधिकारी झाल्यावर तो पुन्हा मावशीकडे आला असताना कात्युशाचा उपभोग घेतो आणि पुढे तिला विसरूनही जातो. इकडे कात्युशा गरोदर राहते, बाळंत होते, तिचे मूल मरते पण तिची मालकीण तिला हाकलून देते, आणि पुढे वेश्या व्यवसायात ती सापडते. आपल्या उत्तरायुष्यात आपण आपले चरित्र

लिहिणाऱ्या बिर्युकॉव्हला आपल्या आयुष्यात तरुणपणी झालेल्या या घटनेची कबुली देऊन 'हे तू सारे लिही, सत्य दडवून ठेवू नकोस' असे आपण सांगितले होते.

कादंबरीचा पुढील भाग आपण एका मित्राकडून ऐकलेल्या एका हकीकतीवर आधारलेला आहे. एका वेश्येवर खुनाचा आरोप असलेल्या खटल्यात एक ज्यूरर त्या वेश्येस ओळखतो, कारण त्यानेच तरुणपणी तिच्यावर अत्याचार केलेला असतो, अशी ती हकीकत असते.

मी आपल्याला पूर्वीच्या परिच्छेदात लिहिल्याप्रमाणे आपल्यात आणि निखिल डॉव्हमध्ये विलक्षण साम्य आहे. आपल्या 'ॲना कॅरिनिना' या कादंबरीतील लेव्हिन या जमीनदाराच्या व्यक्तिरेखेशी आपले काही बाबतीत साम्य आहे. 'वॉर अँड पीस'मधील पिअरेची वागणूक व आपली वागणूक यातही काही साम्यस्थळे आहेत; परंतु 'रिसरेक्शन'मधील निखिल डॉव्ह याचे त्या दोन व्यक्तिरेखांपेक्षा अनेक बाबतीत आपणाशी अधिक साम्य आहे. निखिल डॉव्ह हा आपल्यासारखाच खूप मोठी जमीन असलेला जमीनदार होता. त्यालाही आपल्याप्रमाणेच जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना त्या जमिनीचे वाटप करावे असे वाटते. या बाबतीत आपल्याप्रमाणे हेन्री जॉर्ज या विचारवंताच्या विचारांचा त्याच्यावर प्रभाव आहे. निखिल डॉव्ह ज्यावेळी त्याची जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना त्याचा हा जमीन वाटण्याचा निर्णय सांगतो, त्या वेळी त्या शेतकऱ्यांचा निखिल डॉव्हशी जो संवाद होतो तसाच संवाद यास्नाया पोल्याना येथील आपली जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये व आपल्यात झाला होता. आपल्याप्रमाणेच निखिल डॉव्हही हृदयस्थ परमेश्वरावरच श्रद्धा ठेवत असे. नैतिकतेने वागावे असे वाटताना मोहाचा क्षण आला की निखिल डॉव्ह आपल्याप्रमाणेच मोहाला बळी पडत असे. आपल्या हातून घडलेल्या पापामुळे कात्युशाचे आयुष्य बरबाद झाले, हे लक्षात आल्यावर निखिल डॉव्ह तिच्याशी लग्न करायचे ठरवतो. चेकॉव्ह या थोर लेखकाला 'रिसरेक्शन'मध्ये नैतिक भूमिकेला दिलेले केंद्रस्थान मान्य नसेल तरी 'रिसरेक्शन' ही एक श्रेष्ठ कलाकृती आहे. असे त्यांनी म्हटले आहे. कात्युशाला ठेवलेल्या तुरुंगातील वातावरण, तेथील गुन्हेगार स्त्रियांचे आणि तुरुंगाधिकाऱ्यांचे वागणे हे सारे वास्तव आणि कलेच्या दृष्टीने परिपूर्ण आहे असे चेकॉव्ह यांनी लिहिले आहे आणि तो त्यांचा अभिप्राय योग्यच आहे. तुरुंगामध्ये राजकीय गुन्ह्याच्या आरोपाखाली डांबलेल्या राजकीय कार्यकर्त्यांचे वर्णनही माझ्या मनाला भिडले. निखिल डॉव्हने कात्युशाला 'मी

तुझ्याशी लग्न करीन' हे जेव्हा सांगितले तेव्हा तिच्या मनाची जी उलघाल होते, ते वाचताना कात्युशाबद्दल सहानुभूती वाटते. मात्र तिला वेश्याव्यवसायात जे भोगावे लागले, त्यामुळे तिचे मन निबर झाले होते आणि त्यामुळे निखिल डॉव्हच्या नैतिक भूमिकेवर तिचा प्रथम विश्वासच बसत नाही. त्याचे उपकार नकोत, असेही तिला वाटते.

आपण कोर्टातील वातावरणही यथातथ्य रंगविले आहे. खुनाचा आरोप असलेल्या कात्युशाने तिच्याकडे आलेल्या पुरुषाला जी पावडर दिलेली असते, ती झोपेची पावडर आहे अशा समजुतीने तिने दिलेली होती. तिचा हेतू खून करण्याचा नसतो, हे सत्य ज्युरीतील सर्वांना पटले असूनही निर्णय देताना तिचा तसा हेतू नव्हता, हे लिहायचे त्यांच्याकडून राहून जाते आणि त्यामुळे कात्युशाला चार वर्षांची शिक्षा न्यायाधीश देतो. ही चूक जेव्हा निखिल डॉव्हच्या लक्षात येते त्या वेळी ती दुरुस्त करून कात्युशाला सोडविण्यासाठी तो खूप आटापिटा करतो; परंतु न्यायसंस्थेतील अधिकारी ज्युरीच्या शाब्दिक चुकांवर बोट ठेवून टाळाटाळ करतात. नोकरशाही, न्यायसंस्था यांबद्दल आपल्याला जो कमालीचा तिटकारा आणि अविश्वास होता तसाच अविश्वास आणि तिटकारा निखिल डॉव्ह याला वाटतो, हे साम्यस्थळही माझ्या लक्षात आले.

दहा अपराधी सुटले तरी चालतील, पण एका निरपराध माणसाला शिक्षा होऊ नये, अशी न्यायसंस्थेची कागदावरची भूमिका असली तरी प्रत्यक्षात अनेक निरपराधी माणसांना कशी शिक्षा होते, हे आपण 'रिसरेक्शन'मध्ये दाखविले आहे. निखिल डॉव्हला याबद्दल संताप कसा येतो, खटले भरणारेच दोषी आहेत, कायदे हे समाजातील धनिकांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठीच आहेत, हे त्याला तीव्रतेने कसे वाटते हा आपण कादंबरीत लिहिलेला भाग इतका परिणामकारक आहे, की तो वाचताना मला निखिल डॉव्हची भूमिका पुरेपूर पटली आणि त्याच्यासारखीच न्यायसंस्थेबद्दल आणि नोकरशाहीबद्दल घृणा वाटली.

निखिल डॉव्हचे प्रयत्न अपयशी होऊन कात्युशाची शिक्षा कायम झाल्यावर निखिल डॉव्ह तिच्याबरोबर सैबेरियात जाण्याचा जो निर्णय घेतो, तो आपल्या नैतिक भूमिकेशी सुसंगत आहे. निखिल डॉव्हच्या तिसऱ्या वर्गातील रेल्वे प्रवासाचे वर्णनही बहारीचे आहे. कात्युशासारख्या कोणत्या तरी गुन्ह्याबद्दल शिक्षा झालेल्या स्त्री-पुरुषांप्रमाणेच, राजकीय गुन्ह्याच्या आरोपाखाली शिक्षा झालेल्या अनेक कार्यकर्त्यांना सैबेरियात धाडण्यात येत


होते. आपला क्रांतिकारकांच्या हिंसक मार्गाला विरोध असला, तरी त्या तरुण क्रांतिकारकांचे हेतू उदात्त असतात, हेही आपण जाणत होता. त्यामुळेच 'रिसरेक्शन' कादंबरीच्या उत्तरार्धात राजकीय कार्य करणाऱ्या तरुण स्त्रियांची आणि पुरुषांची व्यक्तिचित्रे आपण अत्यंत सहृदयपणे रेखाटली आहेत. अर्थात त्यांच्यातही काहीजण दुबळे आणि काही जण लबाड होते. मी नम्रपणे आपल्याला सांगतो, की राजकीय चळवळीत मी वीस वर्षे काम केले. प्रथम स्वातंत्र्य आणि नंतर समाजवाद हे ध्येय साध्य व्हावे, म्हणून मी काम केले आहे; तीन वर्षांहून अधिक काळ तुरुंगवासही भोगला आहे.

नक्षलवादी चळवळीत प्राणपणाने लढणारे तरुण मी जवळून पाहिले आहेत. 'रिसरेक्शन' या कादंबरीतील राजकीय कार्यकर्त्यांची जी व्यक्तिचित्रे आपण रेखाटली आहेत, ती वास्तव आहेत आणि आपण आम्हा राजकीय कार्यकर्त्यांना न्याय दिला आहे, असे मला मनोमन वाटले. कात्युशा ही फार हुशार नाही पण संवेदनशील आहे. निखिल डॉव्हने केलेल्या खटपटीमुळे गुन्हेगारांच्या समवेत न ठेवता तिला राजकीय कैद्यांमध्ये ठेवण्यात येते. त्या ध्येयवादी कार्यकर्त्यांच्या सहवासात तिच्या मनाचे उन्नयन होते आणि तिची विचारशक्तीही जागृत होते. निखिल डॉव्हबद्दल आदर वाटत असून आणि त्याच्याबरोबर आपण सुखी होऊ, हे समजत असूनही सिमॉनसन् या राजकीय कार्यकर्त्याचे प्रेम तिला अधिक आकृष्ट करते आणि त्याच्याबरोबर राहण्याचा ती निर्णय घेते. हा कथाभाग तर मला फारच आवडला.

'रिसरेक्शन' कादंबरी मी आपल्या अन्य कादंबऱ्यांप्रमाणे कॉलेजमध्ये अध्ययन करताना आणि नंतर अध्यापन करताना वाचली होती. मी त्या कादंबरीची गोष्ट तरुण राजकीय कार्यकर्त्यांच्या वेगवेगळ्या गटांना सांगितली होती आणि त्या गोष्टीला त्यांचा मिळालेला प्रतिसाद, निखिल डॉव्हच्या नैतिक भूमिकेने प्रभावित होऊन काही कार्यकर्त्यांनी माझ्याजवळ व्यक्त केलेले मनोगत ऐकताना मला आपल्या कादंबरीचे सामर्थ्य काय आहे आणि तिचा नैतिक प्रभाव ध्येयवादी तरुणांच्यावर कसा होतो, हे समजून आले. गेल्या आठवड्यात 'रिसरेक्शन' तिसऱ्या वेळी वाचताना माझ्या मनात या आठवणीही जागृत झाल्या आणि आपल्याशी असलेला माझा भावबंध अधिकच दृढ झाला.

आपला नम्र,

ग. प्र. प्रधान



१६.

कळावे,
लोभ असावा...

आदरणीय लिओ टॉलस्टॉय,
सादर प्रणाम.

आजपर्यंत पत्रांमधून आपले साहित्य, आपल्या जीवनातील आध्यात्मिक परिवर्तन, धर्ममार्गावरील आपली वाटचाल, आपले समकालीन असलेले तीन थोर साहित्यिक आणि आपली कलाविषयक भूमिका, यांसंबंधी माझ्या मनात जे विचार आले आणि ज्या भावना माझ्या मनात उसळून आल्या, त्या मी नि:संकोचपणे व्यक्त केल्या. हे करताना आपल्याच साहित्यकृतींबद्दल आणि आपल्या धर्मविषयक सत्यशोधनाबद्दल सविस्तर लिहिताना मी औचित्याचा भंग करीत आहे, असे वाटत असूनही मी माझ्या लेखणीला आवर घातला नाही, कारण आपण क्षमाशील आहात हे मला माहीत आहे. मराठीत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ आदी संतांनी त्यांच्या मनातील परमेश्वराबद्दलचा भक्तिभाव व्यक्त करताना देवाच्याच गुणांचे, रूपाचे वर्णन अनेकदा केले आहे. आपण महात्मे आहात. आपल्या मनातील माझा प्रेमभाव आणि आदरभाव व्यक्त करताना मराठी संतांप्रमाणेच माझ्या मनाची अवस्था झाली असल्यामुळेच मी आपणासमोर आपल्याच साहित्याबद्दल आणि विचारांबद्दल माझे मनोगत नि:संकोचपणे, अनेकदा पाल्हाळिकपणेही व्यक्त केले. क्षमस्व!

मी आजवर आपल्या कौटुंबिक जीवनाबद्दल कधी लिहिले नाही, आज हे लिहिण्याचा उद्धटपणा मी करीत आहे. आपल्या पत्नी आपल्यापेक्षा वयाने सोळा वर्षांनी लहान. आपण त्यांच्याबरोबर विवाह करण्याची इच्छा व्यक्त करताना, तोपर्यंत आपल्या हातून जे प्रमाद घडले त्यांच्यासंबंधी आपल्या डायरीत आपण जे लिहिले होते, ते त्यांना वाचायला दिल्यावर सोन्या यांच्या मनाला धक्का बसला; पण तरीही

त्यांनी आपल्या मागणीस होकार दिला. स्त्रियांच्या अंगभूत शहाणपणामुळेच त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वातील मोठेपणा आणि सच्चेपणा ओळखला असावा.

आपल्या पत्नीचे आपल्यावर नितांत प्रेम होते, आपल्या लेखनसामर्थ्याबद्दल त्यांना अभिमान वाटत होता आणि आपल्या साहित्यनिर्मितीमुळे त्यांना अपार आनंद होत होता. आपण 'ॲना कॅरिनिना' आणि 'वॉर अँड पीस' या कादंबऱ्या लिहिताना अनेकदा पूर्वीच्या मसुद्यात बदल करीत होतात. आपल्या पत्नी हे लेखन उतरवून काढताना कधी कंटाळल्या नाहीत. 'वॉर अँड पीस'ची मुद्रणप्रत तयार होण्यापूर्वी त्यांना ती सात वेळा लिहावी लागली, असे आपल्या चरित्रकारांनी लिहिले आहे. हे सर्व कष्टप्रद काम, त्या आपणास जीवनसर्वस्व मानत होत्या म्हणूनच त्यांनी केले. आपण असामान्य प्रतिभावान लेखक आहात, हे त्यांनी जाणले होते आणि त्यामुळे त्यांना अपार आनंद होई व आपल्याबद्दल अपार प्रेम व अभिमानही वाटत असे.

आपल्याला एकूण सोळा मुले झाली. त्यांतील तीन लहानपणीच मरण पावली. सोन्या यांनी प्रसूतीच्या वेदना, मुलांना वाढवण्याचे कष्ट हे सारे आनंदाने सोसले. त्या होत्या म्हणूनच आपल्या मोठ्या कुटुंबाचे गोकुळ यास्नाया पोल्यानाच्या आपल्या प्रशस्त घरात आनंदाने नांदत होते. आपले लेखन, आपली शिकविण्याची हौस, अनेक चळवळीत आपण समर्पण वृत्तीने केलेले काम, हे सर्व महत्त्वाचे होते, परंतु हे सर्व करण्यासाठी जे मन:स्वास्थ्य लागते ते आपल्याला मिळू शकले, कारण आपल्या पत्नी संसारासाठी, मुलांसाठी आणि आपल्यासारख्या प्रतिभावान पण मंत्रचळी नवऱ्याला आयुष्यभर सांभाळण्यासाठी चंदनासारख्या झिजल्या, हे मी कधी विसरू शकणार नाही. सर्व कुटुंबात जसे नवरा-बायकोचे मतभेद होतात, खटके उडतात, तसेच आपल्या वैवाहिक जीवनात घडले. आपले पाय कधी जमिनीवर नसत, म्हणूनच सोन्या यांना खंबीरपणे पाय रोवून उभे राहावे लागले. त्याबद्दल येणारा वाईटपणा त्यांना सहन करावा लागला. पत्नी म्हणून त्यांच्याकडून आपल्या शारीरिक सुखाच्या आणि बौद्धिक साहचर्याच्या ज्या अपेक्षा होत्या, त्या त्यांनी भरभरून दिल्या; पण त्यांच्याही बौद्धिक जीवनाला काही मर्यादा होत्या. 'मॅरिड टू टॉलस्टॉय' हे पुस्तक वाचताना माझ्या हे सारे लक्षात आले. आपलेही त्यांच्यावर नितांत प्रेम होते. एकदा खडाजंगी झाल्यानंतर थोड्या

वेळाने आपण सोन्या यांना म्हणालात, 'तुझ्या चालण्याचा आवाज भोवती ऐकू आल्याशिवाय मला लिहिणे, वाचणे सुचत नाही, हे तुला समजत नाही का?'

आपला ८०वा वाढदिवस, आपल्या इच्छेविरुद्ध थाटात साजरा झाला. रात्री आपल्या पत्नी नेहमीप्रमाणे आपल्या अंगावर पांघरूण घालायला आल्या, तेव्हा आपण म्हणालात, ''समारंभ सुरेखच झाला; पण आनंदाबरोबर दु:खही हवे.'' हे ऐकल्यानंतर सोन्या यांनी त्यांच्या दैनंदिनीत लिहिले आहे. ''भूक लागली की खायचे आणि तहान लागली की प्यायचे, यात केवढा आनंद आहे! पण शरीराच्या गरजा नाकारण्यात फार मोठा आत्मिक आनंद आहे!''

पन्नाशीनंतर आपल्या मनात झालेले परिवर्तन, आपल्या मनाला वाटणारी खऱ्या धर्माची ओढ, यांचे मात्र आकलन सोन्या यांना झाले नव्हते. आपल्या मनाची उदात्त अवस्था त्यांना समजलीच नाही. आपण उत्तम साहित्य अधिकाधिक लिहावे, असे त्यांना सतत वाटे आणि मधूनच आपण एखादी गोष्ट लिहिली की त्यांना आनंद होत असे. सर्व मोठ्या माणसांच्या मोठेपणामुळे भारून गेलेली काही माणसे सतत त्यांच्याभोवती राहतात. अशा काही माणसांनी आपली स्तुती करताना आपल्या पत्नी सोन्या यांना अनेकदा अकारण दोष दिला. आपल्या भोवतालच्या या विभूतिपूजक माणसांमध्ये काहीजण लबाड आणि स्वार्थीही होते. त्यांनी आपल्या भोवती आरती ओवाळताना सोन्या यांची हेटाळणी केली. आपल्या जीवनातील वेगवेगळ्या कालखंडांमध्ये आपले मन कोणत्या तरी ध्येयामध्ये, छंदामध्ये इतके गुरफटलेले असे, की आपल्या भोवतालच्या काही स्तुतिपाठकांची लबाडी, लुच्चेगिरी आपल्या लक्षातच आली नाही आणि त्यांची बाजू घेऊन आपण आपल्या पत्नीवर अन्याय केला, असे मला वाटते. आपली जमीन ही वडिलोपार्जित होती ती वाटून टाकावी असे जे आपणास वाटत होते, त्यामागील हेतू उदात्त असला तरी मोठ्या कुटुंबाचे नीट पोषण व्हावे, मुला-मुलींना चांगले शिक्षण मिळावे, यासाठीच सोन्या यांनी व्यवहारी भूमिका घेऊन त्या बाबतीत आपल्याला विरोध केला. याबद्दल त्यांना दोष देणे अन्याय्य होईल, असे मला वाटते.

आपण लिहिलेली सर्व पुस्तके कोणालाही पैसे न देता छापता आली पाहिजेत, ही आपली भूमिका मात्र योग्यच होती. हे करण्याचा आपल्याला पूर्ण अधिकार होता. या आपल्या निर्णयामुळे आपल्या पत्नी

सोन्या यांना जे अपरंपार धन रॉयल्टी म्हणून मिळणार होते, त्याला त्या मुकणार होत्या. यामुळे त्यांनी आपल्याला केलेला विरोध पूर्णपणे अयोग्य, सर्वथैव चुकीचा होता. त्याचबरोबर आपल्या भूमिकेला पाठिंबा देऊन त्याची प्रत्यक्ष कार्यवाही करणारा चेटकॉव्ह हा साधुपुरुष नव्हता, हेही मी नम्रपणे आपणास सांगू इच्छितो. आपण 'रिसेरेक्शन' या पुस्तकातून मिळालेली प्रचंड रक्कम 'डुखोबार' पंथाच्या लोकांचे कॅनडात पुनर्वसन करण्याच्या कामात खर्च केली. आपल्याला पैशाचा यत्किंचितही मोह नव्हता. आपले साहित्य ही आपण जगाला दिलेली महान देणगी आहे. व्यावहारिक रीतीने त्याची किंमत करणे, हे पावित्र्याचे विडंबनच होईल. आपली भूमिका पवित्र आणि उदात्त असली तरी तिचा गैरफायदा घेणारे काही प्रकाशक मात्र सर्व देशांत होते, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आपल्या साहित्याच्या बाबतीतील आपले दातृत्व, आपल्या मनाचे औदार्य यामुळेच जगातील जाणते लोक आपल्यापुढे नतमस्तक झाले. आपले जीवन हा आपल्या नैतिक सामर्थ्याचा उदात्त आविष्कार होता. त्यासंबंधी म्या पामरे अधिक काय लिहावे?

आपल्या अखेरच्या दिवसांत आपल्या घरात, कुटुंबात भयंकर ताणतणाव निर्माण झाले. आपल्या पत्नी सोन्या आणि आपले इल्या आणि ॲण्ड्री हे मुलगे यांच्या हटवादी वागण्यामुळे आपल्या मनाला फार यातना झाल्या. आपली कन्या साशा हिला मात्र आपल्या भावना समजत होत्या. अखेर आपण घर सोडण्याचा निर्णय घेतला. सर्वसंग परित्याग करावा, असे यापूर्वीही आपल्याला वाटले होते; पण ते घडले नव्हते. या वेळी मात्र ते घडले आणि डॉ.मॅकोव्हिट्स्की यांना घेऊन, साशा या आपल्या कन्येचा निरोप घेऊन ऐन मध्यरात्री आपण अंधारात चाचपडत घराबाहेर पडलात. आपला सुरुवातीचा घोडागाडीचा प्रवास, आपले एका मठात राहणे, नंतरचा रेल्वेने केलेला प्रवास, आपले आजारपण, सोन्याचे आपल्याला शोधत, आपल्या सवयीची उशी आपल्यासाठी घेऊन येणे, आपला आजार वाढला असताना, मृत्यूची छाया पडली असतानाच आपण सोन्याची केलेली आठवण, हे सारे मी कधी विसरू शकणार नाही. आपण साशाला म्हणालात 'अगं, या जगात असंख्य लोक आहेत. आणि तुम्ही मात्र एकट्या टॉलस्टॉयकडेच लक्ष देत आहात.' आपले अखेरचे शब्द होते. 'सत्य. त्याचेच मला सर्वांत जास्त महत्त्व वाटते.' आणि या शब्दांसोबतच आपला अंत झाला. आपला गृहत्याग आणि आपली अखेर

यांमध्ये सोफोक्लीजने लिहिलेल्या ग्रीक शोकांतिकेची भीषणता, भव्यता आणि अपरिहार्यता आहे.

आपण लिहून ठेवल्याप्रमाणे यास्नाया पोल्यानामधील एका शेतामध्ये कोणतेही धर्मसंस्कार न करता आपली शवपेटी भूमातेच्या अंकावर ठेवण्यात आली.

अखिल जगातील माणसांची सदसद्विवेकबुद्धी जागृत करण्यासाठी, माणुसकीची ज्योत तेवत ठेवण्यासाठी आपण जगलात. आपल्या जीवनातून प्रेरणा घेतलेल्या अनेक साध्यासुध्या माणसांनी ही ज्योत तेवत ठेवण्यासाठी धडपड केली. पुढेही अशी अविश्रांत धडपड समाजात चालूच राहील, असा मला विश्वास वाटतो. यासाठी काही जण आत्मसमर्पणही करतील. माणुसकीची ही ज्योत मात्र कधीही विझणार नाही.

० ० ० ० ० ०

३० जानेवारी २००६

ताजा कलम :-

आपला आणि महात्मा गांधींचा झालेला पत्रव्यवहार आज मी पुन्हा एकाग्र चित्ताने वाचला. आपण गांधीजींना लिहिलेल्या एका प्रदीर्घ पत्राचे शीर्षक 'लेटर टू ए हिंदू' असे आहे. गांधीजींनी त्या व्यक्तिगत पत्राचे भारतीय भाषांमध्ये भाषांतर करून ते प्रसिद्ध करण्याची परवानगी आपल्याकडे मागितली आणि आपण ती दिली. गांधीजींनी आपल्याला त्यांनी लिहिलेले 'इंडियन होमरूल' हे पुस्तक पाठविले. आपल्याला ते आवडल्याचे आपण एका मित्राला सांगितले. या पुस्तकाच्या संदर्भात आपण गांधीजींना लिहिलेल्या पत्रात पुढील वाक्य आहे.

'पॅसिव्ह रेझिस्टन्स (अन्यायाचा अहिंसेने केलेला प्रतिकार) मला भारतासाठीच नव्हे, तर जगासाठीही महत्त्वाचा वाटतो.' पॅसिव्ह रेझिस्टन्सला गांधीजी सत्याग्रह म्हणत आणि आपण आयुष्यभर सत्याचाच आग्रह धरला.


'नॉन रेझिस्टन्स'- हिंसेचा प्रतिकार हिंसेने करू नये, हे आपण पूर्वी सांगितले होते आणि आपल्यासारख्या महर्षीने पॅसिव्ह रेझिस्टन्स या पॉझिटिव्ह मार्गाबद्दल लिहिलेल्या एका वाक्यानेही गांधीजींना

अन्यायाविरुद्धच्या संघर्षात बळ लाभले असेल, असे मला वाटते. आपल्या या वाक्यामुळे गांधीजींच्या नंतर वंशभेद, वर्णभेद यांविरुद्ध सत्याग्रह करीत हौतात्म्य पत्करणाऱ्या मार्टिन ल्यूथर किंग यांनाही सामर्थ्य लाभले असणार. आपले अविस्मरणीय शब्द आणि विचार, आपले उदात्त जीवन आणि म.गांधींचे हौतात्म्य यांमधून गवसलेल्या प्रकाशात मला थोडीतरी वाटचाल करता आली, हे मी माझे भाग्य मानतो. माझी पत्रे म्हणजे आपल्या चरणावर मी वाहिलेली रानफुले आहेत. त्यांच्याद्वारे आपणाबद्दल मला वाटणारी कृतज्ञता व्यक्त केली. आजवर आपणाशी केलेल्या पत्रव्यवहारास आता हा पूर्णविराम.

आपला नम्र,

ग. प्र. प्रधान

•



परिशिष्ट १ :

गांधीजी आणि टॉलस्टॉय यांचे परलोकातील संवाद

३० जानेवारी १९४८ला महात्मा गांधींची हत्या झाल्यावर परलोकात प्रवेश करताना त्यांना टॉलस्टॉय उभे असलेले दिसले. टॉलस्टॉय यांना पाहताच गांधीजींना अतिशय आनंद झाला आणि त्यांच्याजवळ जाऊन गांधीजींनी त्यांना वाकून नमस्कार केला. क्षणभर स्तिमित झालेल्या टॉलस्टॉय यांनी गांधीजींचे हात प्रेमाने हातांत घेतले आणि ते म्हणाले, ''केवढे भाग्यवान तुम्ही. कर्तव्य करीत असताना तुमच्या शत्रूने गोळी घालून तुमची हत्या केली. तुमचं मरण खरोखरीच उज्ज्वल. तुम्ही हिंदू धर्माची सहिष्णुतेची, प्रेमाची शिकवण लोकांना देत असताना तुमच्या जीवनाचा आणि हिंदू धर्माचाही अर्थ न समजणाऱ्या धर्मांध व्यक्तीने तुमचे प्राण घेतले. त्या वेड्याला कळलेही नसणार, की तुमचे शरीर नष्ट केल्याने तुमचा विचार नष्ट होणार नाही; उलट तो अधिक उज्ज्वल होईल.''

गांधी म्हणाले, ''हिंसेचा प्रतिकार अहिंसक मार्गानेच केला पाहिजे, हा माझा विचार आपले लेखन वाचल्यावर अधिक खंबीर झाला.''

टॉलस्टॉय म्हणाले, ''मला आठवतं, तुम्ही मला दक्षिण आफ्रिकेतून लिहिलेल्या पत्रात असंच म्हटलं होतंत. पण मी विचार मांडला, तुम्ही त्याचं आचरण केलंत; इतकंच नाही तर अनेकांना तुमच्या सत्याग्रहाच्या चळवळीत त्या मार्गाने बरोबर घेऊन गेलात.'' गांधीजींनी यावर केवळ स्मित केले. थोडे थांबून टॉलस्टॉय म्हणाले, ''मला तुमचा हेवा वाटतो की मनोमन पटलेला विचार आचरणात आणताना तुम्हांला मृत्यू आला. माझ्या जीवनात हे घडलं नाही. मला माझा जमीन-जुमला कुळांना वाटून टाकायचा होता. कारण जो कसतो त्याचीच जमिनीवर मालकी असते, असे मी मानत असे. आमची कुळे पिढ्यान्‌पिढ्या आमच्या जमिनीत राबली आणि आम्ही अनेक पिढ्यांनी जमीनदार म्हणून त्यांच्या श्रमांवर चैन केली. हा अन्याय संपवावा असे मला वाटत होते, परंतु माझ्या पत्नीचा, आणि माझी एक

मुलगी सोडली, तर बाकीच्या मुलामुलींचा याला कडवा विरोध होता. त्यांचं म्हणणं असं होतं की, या वडिलोपार्जित मालमत्तेबाबत निर्णय घेण्याचा मला अधिकारच नाही. कारण मी ती मिळविलेली नव्हती. त्यामुळे मी त्या बाबतीत माघार घेतली. मी जे बोललो त्याप्रमाणे वागू शकलो नाही. वडिलोपार्जित मालमत्तेची गोष्ट सोडा पण माझे लेखन तर मीच केले होते. ते लेखन प्रकाशित करून कोणालाही नफा मिळू नये अशी मी माझ्या मृत्युपत्रात तरतूद केली होती. यामुळे माझी पत्नी भयंकर संतापली. तिला माझ्या सर्व साहित्याच्या प्रकाशनाचे हक्क हवे होते. अखेर कोणालाही न कळवता एक दिवशी पहाटे चार वाजता फक्त डॉ. मॅकोव्हिटस्कीला बरोबर घेऊन आणि माझी मुलगी साशा हिचा निरोप घेऊन मी घर सोडून निघालो. नंतर पुढे थोड्या दिवसांनी मी आजारी पडल्यावर माझी इच्छा नसतानाही डॉक्टर माझा मृत्यू लांबवीत होते. मी त्यांना म्हणत होतो, ''या जगात लिओ टॉलस्टॉयखेरीज असंख्य लोक आहेत आणि तुम्ही मात्र एकट्या लिओकडेच लक्ष देत आहात. माझ्या अखेरच्या या प्रवासात मला मानसिक क्लेश झाले.'' टॉलस्टॉय यांना त्या आठवणींनी फार वेदना होत होत्या. गांधीजी मूकपणे ऐकत होते. थोडे थांबून टॉलस्टॉय पुढे म्हणाले, ''पण माझं भाग्य, की ज्या चर्चने मला धर्मभ्रष्ट मानलं, त्या चर्चच्या धर्मगुरूशिवाय माझी शवपेटी जंगलात एका शांत ठिकाणी पुरण्यात आली. मला बोलता येत नव्हते. मला सांगायचे होते, शवपेटीतून माझे शव बाहेर काढा आणि धरतीमातेच्या कुशीत मला झोपू द्या.'' टॉलस्टॉय पुढे म्हणाले, ''तुझा मृत्यू इतका उदात्त पण तुझ्या शवाचे मात्र धिंडवडे झाले. लष्करी गाडीवरून ते नेण्यात आले आणि त्याला तोफांची सलामी दिली गेली. ते नेहरू, पटेल, राजेंद्रप्रसाद यांना तुझे जीवन, तुझे विचार आणि तुझी अंत्ययात्रा यांतील विसंगती समजली नाही, हे तुझे दुर्दैव.'' गांधीजी खिन्नपणे म्हणाले, ''आणि माझ्यावर गोळी झाडणाऱ्या व्यक्तीला ते आता फाशीही देतील. त्याला फाशी देऊ नका, असे माझा एक जरी अनुयायी बोलला तरी मला समाधान वाटेल.''

टॉलस्टॉय आणि गांधी यांचा नेहमी एकमेकांशी संवाद चाले . गांधीजी एकदा टॉलस्टॉय यांना म्हणाले, ''माझ्यावर माझ्या आई-वडिलांच्यामुळे धर्माचा, ईश्वरभक्तीचा संस्कार झाला. पण तुमच्या घरात सैन्यात जाण्याची परंपरा होती. तुम्हीही तरुणपणी रणभूमीवर गेला होतात. तुमचे 'कोझॅक्स' हे पुस्तक तसंच सेवॅस्टोपोलच्या रणभूमीवरचे अनुभव सांगणारे पुस्तक मी

वाचले होते. तुम्ही अहिंसेच्या विचाराकडे कसे वळलात?'' टॉलस्टॉय म्हणाले, ''वॉर अॅन्ड पीस' ही कादंबरी लिहिताना माझ्या मनात सतत वादळ चालले होते. त्यातला एक प्रसंग मी सांगतो. प्रिन्स आन्द्रे हा सैन्यातील तरुण अधिकारी ऑस्टरलिट्झ्च्या लढाईत मातृभूमीसाठी प्राण अर्पण करण्याच्या भावनेने बेभान होऊन ज्यावेळी तो शत्रूसैन्यावर तुटून पडतो, त्यावेळच्या त्याच्या मन:स्थितीचे मी वर्णन केले आहे. लढाईत आन्द्रे जखमी होतो आणि बेशुद्ध पडतो. त्या रणभूमीवरच, रात्री तो प्रथम अर्धवट शुद्धीवर येतो. तो डोळे उघडून पाहतो, तर आकाशात तारे चमकत असतात. एक ढग मधूनच हलके हलके जात असतो. सगळीकडे नीरव शांतता असते आणि आंद्रेच्या मनातही अननुभूत शांतता पसरते. त्याला दुपारची घनघोर लढाई आठवते आणि त्याच्या मनात विचार येतो, की 'दुपारी युद्धाच्या धामधुमीत ज्या त्वेषाने मी लढतो ती अवस्था खरी की आताची शांतता खरी?' ती कादंबरी लिहिताना युद्ध आणि शांतता यांचे द्वंद्व माझ्या मनात काही वेळा होत असे; पण वास्तव चित्रण करणारी कलाकृती निर्माण करण्यात मी स्वत:ला विसरून गेलो होतो. पुढे १८७८ साली झारच्या विरोधात सशस्त्र क्रांतिकारकांनी एक उठाव केला. त्यावेळचा झार भयंकर जुलमी होता. सैन्याच्या बळावर त्याने हा उठाव चिरडून टाकला. ओळीने १९३ लोकांना फाशी दिले. झारच्या या अमानुष क्रौर्याविरुद्ध जनतेचा उद्रेक होणे अपरिहार्य होते. एक दिवस व्हेरा या तरुण मुलीने एका नीच सत्तांध पोलिस अधिकाऱ्यावर हल्ला केला. हिंसेला हिंसेनेच प्रत्युत्तर दिले जात होते. जुलमी झार आणि क्रांतिकारक यांच्यातील परस्परद्वेषाचा वणवा देशभर भडकला होता. मला फार विषाद वाटला आणि मग मला ख्रिस्ताच्या शिकवणुकीमुळे प्रकाश दिसला. दंडशक्तीने अन्यायाचा प्रतिकार करणे योग्य नाही. तो प्रतिकार वेगळ्या पद्धतीने केला पाहिजे, हे मला सुचले; आणि मी तो विचार लोकांपुढे मांडला. अनेकांना मी स्वप्नाळू वाटलो. अनेक तरुण क्रांतिकारकांना माझा संतापही आला. पण मी माझा विचार मांडत राहिलो.'' गांधीजी म्हणाले, ''आपल्या विचाराने माझ्या विचारांना बळ मिळालं, पण आपण अशा अहिंसक लढ्याचं नेतृत्व केलं असतंत तर जगावर त्याचा प्रभाव पडला असता.'' टॉलस्टॉय उत्तरले, ''मी विचारांप्रमाणे आचरण करायला हवं होतं. परंतु राजकीय नेतृत्व करणं हा माझा स्वभाव नव्हता. तू त्या बाबतीत माझ्यापेक्षा श्रेष्ठ आहेस, हे मान्य करतो. तुझ्या विचारांतील आणि आचारातील सुसंगतीमुळेच तुझ्या

देशातील लोकांवर आणि जगावरही तुझा प्रभाव पडला. मी इथून तुझं वागणं पहात होतो. दक्षिण आफ्रिकेत गोरे लोक गौरेतरांवर जो अन्याय करीत होते, त्याविरुद्ध शांततामय प्रतिकार करायला तू लोकांना शिकवलंस. १९२० साली तू ज्यावेळी असहकार आंदोलन सुरू केलंस त्यावेळी हे आंदोलन ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या जुलमापुढे किती टिकेल, याचा मला अंदाज येईना. एक मात्र खरं की तोपर्यंत राजसत्तेला विरोध करताना लोक हिंसक मार्गच वापरीत होते; परंतु तुझ्या सत्याग्रह आंदोलनात सत्याग्रही शांततेच्या मार्गाने सरकारचा कायदा मोडीत होते आणि कोर्टात 'हो, आम्ही कायदा मोडला,' असे निर्भयपणे सांगून शिक्षा स्वीकारीत होते. तू तर न्यायाधीशाला, 'मला जास्तीत जास्त शिक्षा द्या,' अशी विनंती केलीस. अशा अहिंसक प्रतिकारामुळे ब्रिटिश सरकारच्या अंत:करणातील माणुसकी थोडी तरी जागी झाली. रशियातील झारच्या सरकारने क्रांतिकारकांना गोळ्या घातल्या . ब्रिटिशांनी सत्याग्रहींना तुरुंगात डांबले. गोळ्या घातल्या नाहीत, याचे श्रेय मी अन्यायाचा प्रतिकार अहिंसक मार्गाने करण्याच्या तुझ्या निर्णयालाच देतो. तू लोकांना निर्भय बनवलंस. नंतर चौरीचौऱ्याला पोलिसांनी अकारण केलेल्या गोळीबारामुळे प्रक्षुब्ध झालेल्या जमावाने त्या पोलिसांचीच हत्या केली त्यावेळी तू लढा मागे घेण्याचा निर्णय घेतलास. नेहमीसारखे तुझे सहकारी, तुझे अनेक अनुयायी तुझ्यावर नाराज झाले, पण तू ठामपणे तुझ्या निर्णयाला चिकटून राहिलास. असा अप्रिय निर्णय घ्यायला फार मोठं धैर्य लागतं. ते तू दाखवलंस. माझ्या मनातलं तुझ्याबद्दलचं प्रेम आणि आदर द्विगुणित झाला. १९३० साली तुझी साबरमती ते दांडी पदयात्रा हा एक आगळाच प्रयोग होता. हा तुझा लढा चिरडून टाकण्यासाठी ब्रिटिशांनी ज्यावेळी सत्याग्रहींची डोकी फोडली. त्यावेळी निर्भयपणे त्यांनी ती मारहाण सोसली. स्त्री सत्यागहींनीही असेच धैर्य दाखविले; तेव्हा सगळे जग चकित झाले.'' टॉलस्टॉय पुढे म्हणाले, ''दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर तू युद्धविरोधी भूमिका घेऊन वैयक्तिक सत्याग्रह सुरू केलास आणि पुढे ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना तू हिंदुस्थानातून चालते व्हायला सांगितलेस. यावेळी अहिंसक लढ्यासाठी तू तयारी करायला हवी होतीस, असे मला वाटले.'' गांधीजी म्हणाले, ''तयारी करायला मला वेळ नव्हता. माझ्या नेतृत्वाखाली लढा झाला असता तर तो अहिंसक ठेवण्याची मी पराकाष्ठा केली असती. मात्र लोकांनी भ्याडपणे ब्रिटिश साम्राज्यवाद्यांपुढे माघार घेऊ नये अशीच माझी भूमिका होती. लढा अहिंसक मार्गांनी व्हावा, पण

भ्याडपणापेक्षा स्वातंत्र्य चळवळीला हिंसक वळण लागले तरी माघार घ्यायची नाही, असे मी ठरविले होते.'' टॉलस्टॉय म्हणाले, ''ज्या काँग्रेस पक्षाच्या झेंड्याखाली ही चळवळ होणार होती, त्या पक्षाने तुझ्याप्रमाणे अहिंसा हे तत्त्वज्ञान म्हणून स्वीकारले नव्हतेच; देशव्यापी चळवळीचे प्रभावी साधन म्हणून त्या पक्षाने अहिंसा स्वीकारली होती.'' गांधीजी म्हणाले, ''राजकारणातील ही अपूर्णता आहे आणि मी ती स्वीकारली होती.''

काही दिवसांनी टॉलस्टॉय व गांधी बोलत बसले असताना, फाळणीच्या वेळच्या परिस्थितीवर बोलणे झाले. टॉलस्टॉय म्हणाले, ''नोआखलीला जेव्हा हिंदूंच्या कत्तली झाल्या, त्यावेळी तेथे जाऊन तू हिंदूंना पुन्हा जगण्याची हिंमत देण्याचा आटोकाट प्रयत्न केलास आणि मुसलमानांच्या मनातील द्वेष कमी करण्यासाठीही धडपड केलीस. तुझी ही एकाकी वाटचाल पाहून मी चकित झालो. १५ ऑगस्टला तू स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्यात सामील न होता कलकत्त्याला एका झोपडीत राहून दंगलग्रस्त भागात शांतता प्रस्थापित व्हावी, म्हणून प्राण पणाला लावीत होतास. अंधाऱ्या झोपडीत उपोषण करून तू एकटाच प्रार्थना करीत होतास. हे धैर्य तुला कोठून आले?'' गांधी म्हणाले, ''फाळणीच्या काळातील अमानुष हत्याकांडामुळे मला माझा पराभव झाला असे वाटत होते; परंतु सत्याग्रहीने पराभव न स्वीकारता अखेरपर्यंत द्वेषाविरुद्ध, हिंसेविरुद्ध लढायचे असते, ही माझी भूमिका असल्यामुळे जे शक्य झाले, ते मी केले. मात्र एक गोष्ट मला मान्यच केली पाहिजे. 'माझ्या प्रेतावरून जाऊनच तुम्हांला भारताची फाळणी करावी लागेल.'' असे मी म्हणालो होतो, परंतु परिस्थितीने केलेला पराभव स्वीकारणे मला भाग पडले. काँग्रेसमधील माझ्या सहकाऱ्यांनी फाळणीला अपरिहार्य म्हणून मान्यता दिल्यावर, स्वतंत्र होताना भारताचे दोन तुकडे झालेले मान्य करून नंतर पुन्हा ऐक्याचे प्रयत्न करायचे, असे मी ठरविले. त्या कसोटीची वेळ माझ्या जीवनात आलीच नाही.'' टॉलस्टॉय काहीशा खिन्नपणे म्हणाले, ''इतिहासाचे चक्र अत्यंत गतिमान असते. आपण माणसं कितीही तत्त्वनिष्ठ असलो, तरी काही वेळा परिस्थिती आपल्यावर मात करते. वुई आर आफ्टरऑल क्रीचर्स ऑफ सरकम्स्टन्सेस.'' दोघेही कितीतरी वेळ स्तब्धपणे बसून होते. उठता उठता टॉलस्टॉय म्हणाले, ''इतिहासाचे गतिचक्र फिरतच राहणार. हिंसेने प्रश्न सुटत नाहीत, हे समजत असतानाही माणसांच्या मनातील हिंसा वारंवार उफाळून येते. म्हणूनच अन्यायाचा

प्रतिकार अहिंसात्मक मार्गाने केला नाही, तर सूडाचे चक्र चालू राहील, हे लोकांना सतत सांगून जनसामान्यांवर सुसंस्कार करीत राहिले पाहिजे. हा अहिंसक प्रतिकाराचा संस्कार शब्दांनी पुरेसा होणार नाही. तुझ्यासारख्यांच्या हौतात्म्यामुळे, बलिदानामुळेच तो होईल.''

पुन्हा एकदा टॉलस्टॉय आणि गांधीजी चर्चा करीत बसले असताना टॉलस्टॉय म्हणाले, ''मला तुम्ही हिंदू लोक फार आवडता. कारण तुम्ही पापभीरू आणि परमेश्वरावर श्रद्धा ठेवणारे लोक आहात.'' गांधीजी म्हणाले, ''तुम्हांला आमच्या समाजाची केवळ एकच बाजू माहीत आहे. आमच्याकडील जातिव्यवस्थेमुळे समाजाच्या चिरफळ्या कशा झाल्या आहेत आणि आम्ही तथाकथित वरच्या जातीतील लोकांनी कोट्यवधी लोकांना अस्पृश्य म्हणून जनावरांपेक्षाही किती वाईट वागवले आहे, याची तुम्हांला कल्पना नाही. अस्पृश्यता हा मला माणुसकीवरचा कलंक वाटतो. मी माझ्या मार्गाने अस्पृश्यतेचे निर्मूलन करण्याचा प्रयत्न केला. पण मला यश आले नाही. मी पूर्वायुष्यात आमची वर्णव्यवस्था मान्य केली होती. परंतु प्रदीर्घ अनुभवानंतर मी ती भूमिका सोडली. आमच्या देशातील दलितांचे पुढारी डॉ.आंबेडकर यांनी दलितांचा स्वाभिमान जागृत केला. त्यांनी आणि त्यांच्या अनुयायांनी बौद्ध धर्म स्वीकारला, पण आजही सामाजिक विषमतेचे निर्मूलन झालेले नाही. कायदा करून हे होणार नाही. मला या बाबतीत फार खंत वाटते.'' टॉलस्टॉय म्हणाले, ''मी तुझे दुःख समजू शकतो. आम्ही युरोपियन राष्ट्रांनी आफ्रिकेतील आणि आशियातील गौरेतर लोकांवर किती जुलूम केले, त्यांची कशी पिळवणूक केली, हे तुला ठाऊकच आहे. वंश, धर्म आदींच्या भिंती बांधून मूठभरांनी त्यांचा स्वार्थ साधला. विशाल मानवधर्माची भाषा आपण अनेकजण बोललो, पण प्रत्यक्षात मात्र, जग हा विशाल सागर न होता, आपण ठिकठिकाणी डबकी बांधून त्यांत राहण्यातच स्वतःला धन्य मानीत आहोत. जगाची केवळ रचना बदलून चालणार नाही. माणूस बदलला पाहिजे. त्याचे अंतःकरण विशाल झाले पाहिजे. जगातील राजकारणी बदलणार नाहीत, पण लहान मुलांवर शिक्षणातून चांगले संस्कार केले, तर मात्र जग सुधारू शकेल.'' गांधी म्हणाले, ''शिक्षणातून श्रमांची प्रतिष्ठा कळली पाहिजे. जीवन आणि शिक्षण यांची फारकत होऊ देऊ नका,' असे मी कंठरवाने सांगितले, पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. माझ्या आयुष्यातला फार मोठा काळ स्वातंत्र्यासाठी चळवळी करण्यात गेला. त्यामुळे मला हवे असलेले प्रयोग

शिक्षणक्षेत्रात करता आले नाहीत.'' टॉलस्टॉय म्हणाले, ''तुमच्या सारखीच मलाही लहान मुले फार आवडतात. मी ग्रामीण भागात– यास्नाया पोल्याना येथे राहात असताना मुलांना जंगलात नेऊन झाडांची, पशुपक्ष्यांची ओळख करून देत असे आणि ती मुले सारे भराभर आनंदाने शिकत असत. आपल्या आजच्या शाळा म्हणजे कोंडवाडे आहेत.'' गांधीजी म्हणाले, ''आपण एक असामान्य शिक्षक आहात. आपण मुलांसाठी ज्या गोष्टी लिहिल्या आहेत, त्या जगातल्या मुलांना आवडतात. माझ्या स्वभावात एक मोठा दोष आहे. मी मुलांचे रंजन नाही करू शकत. राजकारणात जन्म गेल्यामुळे मी रूक्षपणे उपदेश करतो.'' टॉलस्टॉय यावर हसून म्हणाले, ''कोणाला बिघडवायचे असेल तर त्याला राजकारणात ढकलून द्यावे.'' गांधीजी म्हणाले, ''पण ते टाळूनही चालणार नाही. शासनसंस्थेत अनेक दोष आहेत, पण मानवी समाजासाठी ती आवश्यक आहे.'' टॉलस्टॉय म्हणाले, ''मला नाही हे फारसं पटत. निसर्गाची एक लय आहे. ती लय आणि माणसाच्या जीवनाची लय यांत सुसंवाद असला म्हणजे पुरे.'' गांधीजी म्हणाले, ''माझेही निसर्गावर प्रेम आहे. औद्योगिकीकरणामुळे निसर्गाचा जो विनाश होतो, त्याला मी विरोध केला आहे. माणूस यंत्राचा गुलाम होऊ नये, या माझ्या मताची माझ्या देशात खूप टवाळी झाली. तुम्हांला, मला साधेपणाने राहण्यातील सौंदर्य कळतं. असा साधेपणा, तसेच निसर्गावर प्रेम करायला आपण मुलांना शिक्षणातून शिकवलं पाहिजे. मुलांवर, निसर्गावर प्रेम करणारे शिक्षकच हे करू शकतील. पण यासाठी मी तयार केलेल्या वर्धा शिक्षण योजनेचा शिक्षकांनीच बोजवारा उडवला.'' टॉलस्टॉय म्हणाले, ''शिक्षणातल्या संस्काराप्रमाणेच साहित्याने प्रौढ वाचकांच्या मनावर उदात्ततेचा संस्कार केला पाहिजे असं मला वाटतं.'' गांधीजी म्हणाले, ''तुम्ही तुमच्या 'कला म्हणजे काय?' या पुस्तकात ते मांडलंच आहे.'' टॉलस्टॉय म्हणाले, ''बहुसंख्य रशियन लेखकांनी आणि समीक्षकांनी माझ्या भूमिकेवर टीकाच केली.'' गांधीजी म्हणाले, ''मला साहित्यातील फारसं कळत नाही, पण तुमच्या 'ॲना कॅरिनिनापेक्षा मला तुमची 'रिसरेक्शन' (पुनरुत्थान) हीच कादंबरी श्रेष्ठ आहे असे वाटते. टॉलस्टाय म्हणाले, ''मी ललित साहित्य लिहिण्यात आयुष्याची अनेक वर्षे घालवली, त्याऐवजी एकीकडे उपजीविकेसाठी शेती करायची आणि त्याचवेळी लहान मुलांना शिकवायचे हे केले असते तर मला अधिक साफल्य वाटले असते.''

एकदा गांधीजी टॉलस्टॉय यांना म्हणाले, "आपला आध्यात्मिक प्रवास कसा झाला, ते ऐकण्याची मला फार उत्सुकता आहे." टॉलस्टॉय म्हणाले, "अनेक खाचखळग्यांतून झालेला हा माझा प्रवास. सारेच काही विस्ताराने सांगायचे तर वेळही फार लागेल आणि ते इतके महत्त्वाचे नाही." यावर गांधीजी म्हणाले, "निदान आपल्या या आध्यात्मिक प्रवासातील महत्त्वाचे टप्पे तरी सांगा." यावर टॉलस्टॉय म्हणाले, "तुझा आग्रहच आहे तर काही सांगतो, थोडेसे... आणि त्यांनी बोलायला सुरुवात केली– "तुला माहीत आहे की एका सरंजामदार कुटुंबात माझा जन्म झाला आणि मला आयुष्यात कधी गरिबीची झळ लागली नाही. माझ्या चोविसाव्या वर्षापर्यंतच्या आयुष्याबद्दल मी फारसे काही सांगणार नाही. मी ते लिहिले आहे. मी भरपूर वाचन केले. अभिजात साहित्याचे आणि वैचारिक साहित्याचेही. सैन्यात नोकरी करताना क्रिमियन युद्धात मी भाग घेतला. माझी धर्मावर श्रद्धा होती, पण चर्चवर मात्र नव्हती. १८७७च्या सुमारास मला धर्माचे शुद्ध स्वरूप समजून घ्यावे, असे वाटू लागले आणि मी मग बायबलचा आणि गॉस्पेलसचा अभ्यास सुरू केला. जीवनविषयक मूलगामी प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी इतिहास, भौतिकशास्त्रे वाचली. परंतु जडवादी विद्वानांच्या लेखनाने माझे समाधान होईना. म्हणून मी सॉक्रेटिस, प्लेटो, स्पिनोझा, कांट, बुद्ध आदी तत्त्वचिंतक वाचले. माझी जिज्ञासा जागृत झाली होती. मी परमेश्वराचा विचार करीत होतो आणि मग एक दिवस माझ्या लक्षात आले, की ज्यावेळी बालकाच्या निरागस वृत्तीने परमेश्वराचे अस्तित्व आपण गृहीत धरतो, त्यावेळी आपले मन प्रसन्न असते; ज्यावेळी आपल्या मनात शंका-कुशंकांचा कोलाहल सुरू होतो. त्यावेळी मन संशयग्रस्त होऊन आपण दुःखी होतो. ईश्वरावरील श्रद्धेच्या या जाणीवेमुळे मला सात्त्विक आनंद लाभला. पन्नाशी उलटल्यावर मी प्रत्येक गोष्टीचे नैतिक अधिष्ठान शोधू लागलो. माझी श्रद्धा हरपली आणि मी फार अस्वस्थ झालो. १८७९ साली चर्चमध्ये जाणे मी सोडून दिले, कारण कर्मकांडावरील माझा विश्वास पूर्णपणे उडाला होता. त्यानंतर मी चार गॉस्पेलसचे भाषांतर केले आणि त्यांचा मला जाणवलेला आशय सांगितला. चर्चला माझे हे विचार मान्य झाले नाहीत. परंतु मला मात्र आपण शुद्ध ख्रिश्चिॲनिटी स्वीकारल्याचा आनंद मिळाला. १८८१ ते ८३ या दोन वर्षांत माझा जणू आध्यात्मिक पुनर्जन्म झाला आणि मी 'व्हॉट आय बिलिव्ह'– (माझी श्रद्धा) हे पुस्तक लिहून माझ्या मनातील श्रद्धेचे स्वरूप स्पष्टपणे मांडले. माझ्या या पुस्तकाच्या सर्व


प्रती सरकारने जप्त केल्या. मी माझ्या श्रद्धेप्रमाणे शक्य तितका साधेपणाने जगू लागलो. श्रमांची प्रतिष्ठा कळल्यावर मी रोज शारीरिक श्रमांची कामे करू लागलो. मी वेगळा पंथ मात्र काढला नाही. १८९१ सालच्या भीषण दुष्काळात काम केले. १८९३ साली 'द किंगडम् ऑफ गॉड इज विदिन यू' हे पुस्तक लिहून माझा जीवनविषयक दृष्टिकोन सम्यकरीतीने मांडला. मी रोज प्रार्थना करीत असे. परंतु रशियातील ऑर्थडॉक्स चर्चच्या निकषानुसार मात्र मी पाखंडी होतो. अखेर २४ फेब्रुवारी १९०१ला मला धर्मातून बहिष्कृत करण्यात आले. मी माझी धर्मविषयक आणि ईश्वरविषयक मते स्पष्टपणे मांडीत होतो. मी चर्चच्या अधिकाऱ्यांना लिहिले की कोणत्याही गोष्टीपेक्षा मी सत्य हे श्रेष्ठ मानतो. ख्रिस्ताच्या शिकवणुकीचे जे सत्य स्वरूप मला उमगले त्याप्रमाणे मी वागत आहे. माझी श्रद्धा मी बदलू शकणार नाही. असा झाला माझा प्रवास. धर्मगुरूंनी मला धर्मभ्रष्ट मानले आणि मी माझ्या अंत:प्रेरणेप्रमाणे वागत होतो; म्हणून माझी पत्नी माझ्यावर भयंकर रागवू लागली. माझा गृहत्याग आणि अखेरच्या प्रवासाबद्दल मी तुला पूर्वी सांगितले आहे.'' दुसऱ्या दिवशी टॉलस्टॉय गांधींना म्हणाले, ''काल मी स्वत:च्या आध्यात्मिक प्रवासाबद्दल सांगितले. तुझ्या या प्रवासाची कहाणी मला ऐकायची आहे.'' गांधीजींना हे अपेक्षित होते. ते म्हणाले, ''माझ्या बुद्धीचा आवाका आपल्या बुद्धीच्या मानाने अगदीच लहान आहे. मी आपल्यासारखे चौफेर वाचन करून सत्याचा शोध घेतला नाही. मी माझ्या आयुष्यात सत्याचे प्रयोग केले. आपल्यासारख्या महान व्यक्तीसमोर या प्रयोगांची कहाणी सांगायला मला संकोच वाटतो. माझ्या आत्मकथेत मी हे सारे लिहिले आहे. तीच मी आपल्याला देतो.'' असे म्हणून गांधीजींनी त्यांचे 'माय एक्सपेरिमेंटस् विथ ट्रूथ' हे आत्मकथन टॉलस्टॉयना दिले. ते वाचून झाल्यावर एक दिवस दोघेजण बोलत बसले असताना गांधीजी म्हणाले, ''मी बॅरिस्टर होण्यासाठी इंग्लंडमध्ये गेलो असताना बायबल वाचले. बायबलचा, ख्रिस्ताच्या शिकवणुकीचा माझ्या मनावर खूप प्रभाव पडला. पण मला ख्रिस्ती धर्म स्वीकारावा असे मात्र वाटले नाही. भगवद्‌गीतेचा अभ्यास मी पुढे दक्षिण आफ्रिकेत केला. हिंदुस्थानात परत गेल्यावर भगवद्‌गीतेची जी मुख्य शिकवण आहे, असे मला वाटले तो 'अनासक्ती योग' मी शक्य तितक्या सोप्या शब्दांत मांडला.'' गांधीजी पुढे म्हणाले, लो.टिळकांनी लिहिलेले गीतारहस्य मी काळजीपूर्वक वाचले होते. टिळक फार व्यासंगी, विद्वान होते. त्यांची बुद्धिमत्ताही कुशाग्र होती. म्हणून त्यांनी 'कर्मयोग' हा

गीतेचा संदेश आहे हे सांगताना अनेक तत्त्वज्ञानांच्या विचारधारांचे विस्तृत विवेचन केले आहे. शंकराचार्यांनी भगवद्‌गीतेचा संदेश संन्यास मार्ग हा आहे, हे जे लिहिले आहे त्या मताचे टिळकांनी पूर्णपणे खंडन केले आहे. असे विवेचन करणे मला जमणार नाही. माझ्या अंत:प्रवृत्तीला भगवद्‌गीतेचा जो अर्थ उमगला तो केवळ मी मांडला आहे.'' मात्र माझ्या आध्यात्मिक प्रवासात मी सिद्धांतापेक्षा प्रयोगांना अधिक महत्त्व दिले आणि तेच मी माझ्या आत्मचरित्रात मांडले आहे. गांधीजी थोडे थांबून म्हणाले, 'मला तात्त्विक चर्चेपेक्षा भारताचे जीवन कसे व्हावे, याबद्दल माझे वास्तवतेवर आधारलेले विचार मांडण्यात अधिक रस होता आणि 'हिंद स्वराज्य' या माझ्या पुस्तकात मी माझे ते विचार सूत्ररूपाने आणि सुस्पष्टपणे मांडले आहेत.'' असे म्हणून गांधीजींनी 'हिंद स्वराज्य'ची प्रत टॉलस्टॉयना दिली.

एक दिवस टॉलस्टॉय आणि गांधीजी बोलत बसले असताना गांधीजी म्हणाले, ''आपण आपल्या पूर्वायुष्यातील चुकांची कबुली देणारे 'कन्फेशन्स' हे पुस्तक लिहिलेत, 'व्हॉट देन मस्ट वुई डू?' (तर मग आम्ही काय करावे?) या पुस्तकात जीवनातील अनेक समस्यांना सामोरे जाताना आपण काय केले पाहिजे, हे सडेतोडपणे सांगितले आणि परमेश्वर शेवटी माणसाच्या अंत:करणात आहे, हे सांगितलेत, यामुळे माझ्यासारख्या असंख्य लोकांना प्रकाश मिळाला. आज जगात अधिकाधिक संहारक अस्त्रे निर्माण केली जात असताना 'पेट्रिऑटिझम ॲण्ड गव्हर्मेंट' (देशभक्ती आणि शासनसंस्था) या निबंधातून आपण, 'दाऊ शॅल नॉट किल' (तू हिंसा करू नकोस) हा जो संदेश दिला आहे, तो मला फार मौलिक वाटतो. मला आज आपले ईश्वराबद्दलचे एखादे तरी वाक्य ऐकावेसे वाटते.''

टॉलस्टॉय म्हणाले, ''माझ्या अखेरच्या प्रवासात आगगाडीतून जात असताना, मी तिसऱ्या वर्गाच्या डब्यात जाऊन बसलो. त्यावेळी एका विद्यार्थ्याने मला असेच विचारले, तेव्हा मी म्हणालो, ''ही सृष्टी निर्माण करणाऱ्या ईश्वरावर माझा विश्वास नाही. पण प्रत्येकाच्या हृदयातील सदसद्‌विवेक बुद्धीत जागे असणाऱ्या ईश्वराच्या अंशावर माझी दृढ श्रद्धा आहे.'' थोडे थांबून टॉलस्टॉय म्हणाले, ''गांधी, मृत्यूपूर्वी मी जे शेवटचे वाक्य बोललो ते काय होते ते सांगू? ते होते, 'सत्य! त्याचेच मला सर्वांत जास्त महत्त्व वाटते...' आणि गांधी, तू तर आयुष्यभरचा सत्याग्रही. म्हणून तर आपली मनं जुळली.''

❋



परिशिष्ट २ :

रशियन क्रांतीचे टॉलस्टॉयच्या तत्त्वज्ञानात आढळणारे प्रतिबिंब

लेखक : **ब्लादिमीर लेनिन**

टॉलस्टॉय या थोर लेखकाची क्रांतीशी सांगड घालणे म्हणजे काहीतरी ओढून-ताणून केलेला व विक्षिप्त प्रयत्न आहे, असे वरवर पाहता वाटेल. कारण या क्रांतीचे स्वरूप टॉलस्टॉयने कधी ओळखले नव्हते व तिच्यापासून तो दोन हात दूरच राहिला होता. एखाद्या घटनेचे स्पष्ट प्रतिबिंब जर कशात नीट पडलेले दिसत नसेल तर त्याला त्या घटनेचा आरसा म्हणता येणार नाही. पण रशियन क्रांती ही अत्यंत गुंतागुंतीच्या घडामोडींनी भरलेली घटना आहे. या घडामोडींमध्ये प्रत्यक्ष भाग घेणाऱ्या किंवा ओढल्या गेलेल्या अनेक सामाजिक वर्गांपैकी कित्येक विभागांत या घटनेचे स्वरूप-आकलन झालेले नव्हते हे उघडच आहे; आणि असेही घटक त्यात दिसतात की ज्यांनी पुढे स्पष्ट दिसणारी कामगिरी ऐतिहासिक प्रगतीच्या दृष्टीने अंगावर घेणे आवश्यक असून अंगाबाहेर टाकली. परंतु तसे पाहता टॉलस्टॉय हा खरोखरच थोर प्रतिभेचा लेखक होता. तेव्हा क्रांतीच्या घटनेची निदान काही मूलभूत अंगे तरी त्याच्या लिखाणात प्रतिबिंबित झाल्याशिवाय कशी राहतील?

आज टॉलस्टॉयच्या ऐंशीव्या वर्षाची पुण्यतिथी साजरी होत आहे आणि रशियन वृत्तपत्रांत टॉलस्टॉयसंबंधी लेख, स्फुटे वगैरेंची रेलचेल दिसत आहे. पण या सर्व लिखाणात, रशियन क्रांतीचा व तिच्यामधील प्रेरक शक्तींचा टॉलस्टॉयच्या लेखांत कसा पडसाद उठला आहे, यासंबंधी मुळीच विचार झालेला दिसत नाही. उलट या वृत्तपत्रांतील लिखाणात इतका ढोंगीपणा भरलेला दिसत आहे, की त्याची शिसारीच यावी. 'सरकारी' व 'मवाळ' असा दोन जातींचा ढोंगीपणा यात दिसेल. पहिला भाडोत्री कलमबहाद्दरांचा. या सद्गृहस्थांना काय? कालपर्यंत टॉलस्टॉयवर तोंडसुख घेण्याची कामगिरी चालविल्यानंतर आज ह्यांना हुकूम सुटलेला आहे, की युरोपच्या विद्वानांना रुचेल अशा तऱ्हेने सदभिरुचीला धरून टॉलस्टॉयवर लिहा आणि तो एक मोठा

देशभक्त होता, असे रंगवा. अशा लेखक महाशयांना कशी सरकारी चंदी मिळते, हे सर्वांना ठाऊक असल्याने यांच्या नाटकाने कोणी फसणार नाही, पण दुसरी मवाळ लेखकांची जात मात्र ढोंगीपणामध्ये जास्त हुषार आहे व म्हणून त्यांचे लिखाणही जास्त घातुक व भयंकर आहे. 'रेख' मासिकातील बाललेकिन प्रभृती लेखक घ्या. त्यांचे लेख वाचून कोणालाही वाटावे की, टॉलस्टॉयच्या पुण्यस्मृतीने यांची हृदये सद्‌गदित झाली आहेत. पण खरा प्रकार वेगळाच आहे! टॉलस्टॉयचे श्रेष्ठत्व कोणते? तर 'ईश्वरी तत्त्वा'चा शोध लावण्यात त्याने आयुष्य वेचले, असे मोठ्या साळसूदपणे आणि पांडित्यपूर्ण शब्दावडंबराने हे गृहस्थ सांगतात; पण ही निव्वळ कपटाची नाटकी भाषा आहे. टॉलस्टॉयने प्रतिपादन केलेला 'ईश्वर' या रशियन मवाळ पंथीयांना कशाला हवा आहे? आणि प्रचलित समाजपद्धतीवर जी प्रखर टीका टॉलस्टॉयने केली आहे; ती काय या मवाळांना रुचणारी आहे? टॉलस्टॉयला बहुजन समाज मान देतो ना! मग आपण त्याच्या नावाचा उपयोग करून घ्यायचा व आपले राजकीय प्रस्थ वाढवावयाचे, एवढाच या लोकांचा उद्देश आहे. कारण झारशाहीविरोधी आंदोलनाची राष्ट्रीय सूत्रे आपल्या हातांत ठेवण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा आहे. टॉलस्टॉयच्या तत्त्वज्ञानात अगदी स्पष्ट दिसणारे विसंगतीचे दोष आहेत. ते का आहेत? रशियन क्रांतिकारक चळवळीतील अमुक एका पंगुत्वामुळे किंवा अपरिपक्वपणामुळे हे दोष उत्पन्न झाले आहेत, असे सांगता येत नाही काय? हे खरे प्रश्न आहेत. त्याची स्पष्ट उत्तरे न देता उगीच अगडबंब शब्दांचा भडिमार करून वेळ साधून नेण्याचा मवाळांचा प्रयत्न आहे.

टॉलस्टॉयच्या तत्त्वज्ञानामध्ये व लिखाणामध्ये आढळणारी विसंगती म्हणजे अत्यंत मूलभूत स्वरूपाचे अंतर्गत विरोध आहेत.

एकीकडे, आपल्यासमोर टॉलस्टॉयची कला उभी राहते. रशियन भाषेतला इतकेच नव्हे, तर एक जगद्वंद्य साहित्यिक म्हणून त्याचे नाव अजरामर राहील. पण दुसरीकडे पहा! ख्रिस्ताच्या पुढे गुडघे टेकून हा जमीनदार त्याला म्हणत आहे "जीवन किती यातनामय आहे!"

एकीकडे समाजातली पापे व ढोंगे यांच्याविरुद्ध अंत:करणापासून त्वेष प्रगट करणारा खंबीर व साधुवृत्तीचा टॉलस्टॉय दिसतो; तर दुसरीकडे हाच टॉलस्टॉय आपल्या 'टॉलस्टॉयन' पद्धतीने आक्रंदून व स्फुंदून जगाला म्हणत आहे, 'मी पापी आहे, मी नीच आहे; पण मी नैतिक आत्मशुद्धीने चांगला होण्याचा प्रयोग करीत आहे. मी आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी पशूंची

हिंसा होऊ देत नाही, तर केवळ भातभाजी वर जगतो." रशियामधील सुशिक्षित वर्गात स्वत्व उरलेले नाही व उगीच आक्रोश करून आपल्या यातनांचा बाऊ करून जगापुढे आपली रडकथा मोठ्याने गाऊन दाखविण्याची त्याला खोड जडली आहे. तोच प्रकार टॉलस्टॉयचा झाला आहे.

भांडवलदारांनी चालविलेल्या पिळवणुकीचा कडक निषेध करणारा, झारशाहीच्या जुलुमाचे व न्यायदानाच्या हिडीस पद्धतीचे स्वरूप उघड करून दाखविणारा, तसेच, सरकारी अंधाधुंदीवर प्रकाश पाडणारा टॉलस्टॉय पहा! तसेच सांस्कृतिक प्रगतीबरोबरच एकीकडे संपत्तीमान वर्गाची वाढती धनदौलत व दुसरीकडे गरिबांची वाढती अन्नान्नदशा पाहून आणि श्रमजीवी जनतेला सहन कराव्या लागणाऱ्या हालअपेष्टा व कंठावे लागणारे पशुतुल्य जीवन पाहून या सामाजिक अनवस्थेचे अंतरंग उघड करणारा टॉलस्टॉय पहा आणि मग दुसरीकडे हे चित्र पहा! "जुलुमाचा प्रतिकार करू नका" असे तोच टॉलस्टॉय घसा फोडून सांगत आहे.

एकीकडे पहावे तर, दांभिकपणाच्या प्रत्येक बाबीच्या व एकंदर ढोंगबाजीच्या चिंधड्या उडविण्याचा चंग बांधून उभा राहिलेला टॉलस्टॉय समोर उभा राहतो वा असे वाटते की, याची तीक्ष्ण नजर वस्तुस्थितीचा नीट ठाव घेत आहे. पण लगेच असेही दिसते की हाच गृहस्थ धर्माला शरण जात आहे. जगातल्या अत्यंत नासक्या, कुजक्या वस्तूत धर्माची गणना केली पाहिजे; पण टॉलस्टॉयची सारी धडपड अशी दिसते, की सध्याच्या सरकारी पाद्र्यांऐवजी एक नवी नीतिमार्तंडाची जात निर्माण करावी. पाद्रीशाही वाईटच, पण अशी साळसूद नीतिमार्तंडाची जात तर फारच घातुक ठरेल. सारांश, टॉलस्टॉयच्या बाबतीत खरा प्रकार असा आहे; ते खालील कवितेत उत्तम प्रतिबिंबित झाले आहे.

'माझी मातृदेवता, माझी जन्मभूमी रशिया
तू दीन आहेस, तू समृद्ध आहेस.
तू सामर्थ्यवान आहेस, तू असहाय आहेस."

("रशियामध्ये सुखी कोण आहे?" या नेक्रासॉव्हच्या कवितेतील हे चरण आहेत– अनुवादक.)

अशा विसंगतीच्या हेलकाव्यांत, कामगारांची चळवळ कशी चालली आहे व समाजवादासाठी चाललेल्या आंदोलनात तिचे स्थान काय, या प्रश्नांसंबंधी टॉलस्टॉयच्या मनात काही प्रकाश पडू शकला नाही आणि रशियन क्रांतीविषयीही त्याला काही उमगले नाही; परंतु, टॉलस्टॉयच्या

शिकवणुकीमध्ये व तत्त्वज्ञानामध्ये हे आत्मगत विरोध उगीच अचानकपणे उद्भवलेले आहेत असे मात्र वाटते. एकोणीसाव्या शतकातील शेवटच्या तीस वर्षांत रशियन जीवनात जे विरोध होते त्यांचे प्रतिबिंब टॉलस्टॉयच्या शिकवणुकीत आहे. पितृसत्ताक पद्धतीने नांदत असलेली ग्रामसंस्था ''भूदास-पद्धती'' रद्द करण्याचा कायदा झाल्यानंतर नुकतीच स्वतंत्र होऊ पहात होती, पण खरे पाहता भांडवलदारी व शासनसंस्था यांच्या दंडुकेशाहीपुढे व सर्वभक्षक बकासुरापुढे तिला बकऱ्याप्रमाणे बळी दिले गेले होते. ग्रामीण आर्थिक व्यवहार व जीवन आजपर्यंत शतकानुशतके ज्या पद्धतीनुसार बिनबोभाट चालत होते, ती पद्धतीच ढासळली, नव्हे अत्यंत झपाट्याने जमीनदोस्त झाली. टॉलस्टॉयच्या तत्त्वज्ञानातील परस्परविरोधी मते का व कशी उत्पन्न झाली, यांचा अर्थ समजून घेण्यासाठी नुसते आधुनिक कामगार आंदोलनाकडे व आधुनिक समाजवादाकडे पाहून चालणार नाही, (या गोष्टींकडे पाहून अर्थ लावणेही जरूर आहेच, पण तेवढेच करून भागणार नाही). उलट भांडवलदारीचे हातपाय पसरू लागल्याने ग्रामीण समाजाची कशी वाताहत झाली व खेड्यापासून त्याला कसे परागंदा व्हावे लागले आणि या घडामोडींमुळे प्राचीन ग्रामसंस्थेच्या वतीने केवढा आक्रोश होत होता, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. अर्थात, मानवतेच्या उद्धारासाठी एखादा नवा मंत्र टॉलस्टॉयने जगाला दिला, असे मानणे म्हणजे केवळ स्वतःचे हसू करून घेणे आहे. टॉलस्टॉयच्या तत्त्वज्ञानातील सर्वांत टाकाऊ भाग म्हणजे अशा मंत्राची कल्पना आणि नेमका तो भाग डोक्यावर घेऊन नाचणाऱ्या रशियन व परदेशीय 'टॉलस्टॉयवाद्यांच्या' या आचरटपणाचा निषेध करावा तेवढा थोडाच.

भांडवलदारी पद्धतीची समाजक्रांती रशियन जीवनात होत गेली, त्याबरोबरच कोट्यवधी रशियन शेतकऱ्यांच्या डोळ्यांपुढे निरनिराळ्या कल्पना नाचू लागल्या, व त्यांची मते निरनिराळ्या भावनांनी भारली जाऊ लागली. त्या सर्वांचे प्रतिबिंब टॉलस्टॉयच्या तत्त्वज्ञानात आढळते व यातच श्रेष्ठत्व आहे. टॉलस्टॉयची मतप्रणाली एकंदरीने घातुक आहे खरी; पण रशियन क्रांती ही शेतकरी भांडवलदारी क्रांती आहे, ही आपल्या क्रांतीसंबंधीची प्रामुख्याने ओळखण्याची गोष्ट टॉलस्टॉयच्या एकंदर तत्त्वज्ञानाचा विचार करता त्याने ओळखली आहे हे दिसते. यात त्याच्या प्रतिभेची साक्ष आहे. एकदा टॉलस्टॉयच्या शिकवणुकीतील विसंगतीकडे पाहण्याची ही दृष्टी लाभली की मग असे उमगते की आपल्या क्रांतीमध्ये

अशाच काही परस्परविरोधी शक्तींच्या साठमारीमध्ये आपला शेतकरी सापडला होता की त्याच्या मन:स्थितीचे जिवंत चित्रच टॉलस्टॉयच्या विसंगतीमध्ये उमटलेले आढळते. एकीकडे, शतकानुशतके सरंजामदारीच्या जुलमाखाली रगडला गेलेला, 'सुधारणांच्या' नंतरच्या काळात झपाट्याने झालेल्या वाताहतीमुळे वैतागलेला शेतकरी घ्या. सूडाच्या वृत्तीने व त्वेषाने डोळे लाल करून 'मरेन किंवा मारीन' अशा निश्चयाने मुठी वळून पुढे सरसावलेल्या शेतकऱ्याची विराट मूर्ती तुम्हांला दिसेल. आपल्या क्रांतीमध्ये शेतकरी वर्गाने जेव्हाजेव्हा प्रगतीकारक दृष्टीने पुढे पाऊल टाकले, तेव्हा तेव्हा त्याच्यापुढे नेहमी एकच उद्दिष्ट असल्याचे एकसारखे दिसून येईल. ते उद्दिष्ट असे-- शासनसंस्थेचा एक भाग असलेल्या चर्चचे वर्चस्व झुगारून देणे; तसेच जमीनदार वर्ग व त्यांच्या हातचे बाहुले असलेले सरकार यांना उलथवून टाकणे, जमिनीवरचे जुने मालकीहक्क व वहिवाटीच्या पद्धती रद्द करून जमिनीची अशा तऱ्हेने 'साफसफाई' करून मिरासदारी वर्गाच्या वतीने पोलीसशाही गाजविणाऱ्या सत्तेच्या जागी लहानसहान शेतमालकांना समतेने व स्वतंत्रपणे जगता येईल अशी समाजव्यवस्था स्थापन करणे. टॉलस्टॉयच्या लिखाणातील तात्त्विक आशयदेखील शेतकऱ्यांच्या पुढे असणाऱ्या उद्दिष्टांसारखाच आहे, हे सहज दिसून येईल. त्याच्या विचारांचे मंथन करून आध्यात्मिक "ख्रिश्चन अराजकवाद" नावाचा एक सिद्धांत त्यातून काढून म्हणणारे काही लोक आहेत. त्यांची उठाठेव मुळातच चुकीची आहे.

दुसरीकडे या शेतकरी वर्गासंबंधी आपण असेही पाहिले पाहिजे की, त्याला नव्या सामाजिक जीवनाचे क्षितिज दिसू लागले होते हे जरी खरे, तरी नव्या जीवनासंबंधी त्याच्या कल्पना नुसत्या अंधुकच नव्हत्या, तर सनातनी व धार्मिक होत्या. अर्थात, दास्य-विमोचनासाठी करावा लागणारा लढा, त्यामध्ये लागणारे पुढारी, या शेतकरी क्रांतीकडे भांडवलदार व मध्यमवर्गीय लोक कशा तऱ्हेने पाहतील, यासंबंधीचे अंदाज वगैरे संबंधीच्या सर्वच कल्पना अशा होत्या. मोठ्या जमीनदारांचा मिरासदारी वर्ग नष्ट करावयाचा तर आधी झारची सत्ता धुळीस मिळविली पाहिजे. ही गोष्टही त्याच्या जाणीवेत अंधुकच होती. जमीनदार व सरकारी अंमलदार यांच्याविरुद्ध शेतकरी जळत होता. कारण त्याचे पिढ्यानूपिढ्या जीवनच तसे गेले होते; पण ह्या सगळ्या जाचाविरुद्ध काय करावयाचे? या प्रश्नाचे उत्तर काही त्याला त्या अनुभवातून मिळत नव्हते. नुसत्या अनुभवाने ते कसे मिळेल? आणि म्हणूनच शेतकरी वर्गाचा एक छोटा हिस्साच आपल्या क्रांतीत ओढला गेला

व त्याने क्रांतीमध्ये संघटनेचे व लढ्याचे कार्य केले. आपल्या वैऱ्याशी म्हणजे झारशाहीच्या शिपायांशी व जमीनदारांशी, ज्यांनी अखेरचा प्रत्यक्ष सशस्त्र सामना केला, असा विभाग फारच लहान होता. मोठा हिस्सा अशा शेतकऱ्यांचा होता की ज्यांनी आपले डोळे आकाशाकडे लावून ठेवले किंवा नुसतीच आसवे गाळली. यापैकी कोणी नीती, धर्म यांची जपमाळ घेऊन बसले; तर कोणी शेखमहंमदी स्वप्ने पाहत झोपी गेले. कोणी अर्जतक्रारी गुदरण्यात गर्क झाले व कोणी आपली 'शिष्टमंडळे' पाठवीत बसले आणि आपले लियो निकोलायेव्हिच टॉलस्टॉय महाशय तरी काय? डोक्यात असल्याच कल्पना बाळगून बरोबर हेच करीत होते. मग असल्या प्रकारात नेहमी होते तेच झाले! टॉलस्टॉयने राजकारणातून संन्यास घेतला; त्याला शिवायचे नाही असे ठरविले व उदासीन राहण्याचे व्रतच घेतले; म्हणजेच राजकारणाचा विपरित अर्थ स्वत: मनाशी लावला. त्यामुळे वर्गजागृत क्रांतिकारक कामगारांच्या खांद्याला खांदा लावून लढण्यासाठी शेतकऱ्यांपैकी एक लहान विभागच पुढे आला व बहुसंख्य शेतकऱ्यांनी तत्त्वशून्य, नीच भांडवलदारी सुशिक्षितांच्या हाती आपली मान दिली. या सुशिक्षितांनी 'दूदोव्हिक' पक्षाच्या सभांतून पलायन केले व कॅडेट पक्षाचे निशाण उभारून झारशाहीकडे 'तडजोडी'ची मागणी केली. अर्थात ही मागणी मान्यही करण्यात आली. पण लवकरच त्यांना बुटाच्या लाथाही खात खात बाहेर पडावे लागले. आपल्या शेतकऱ्यांनी केलेल्या उठावणीमध्ये आढळणारा कमकुवतपणा व दोष यांचे उत्तम चित्र आपल्याला टॉलस्टॉयच्या तत्त्वज्ञानात मिळते; तसेच आपल्या प्राचीन ग्रामसंस्थेमधील शेतकऱ्यांची लेचीपेची मनोवृत्ती व त्या 'अल्पसंतुष्ट' कुणब्यांच्या हाडी भिनलेली लाचारीची सवय यांचे प्रतिबिंबही त्यात मिळते.

सन १९०५/०६ मध्ये सैन्यात उठाव करणाऱ्या बंडखोर सैनिकांचे उदाहरण घ्या. सामाजिक दृष्टीने, आपल्या क्रांतीमधील ह्या लढवय्यांना शेतकरी वर्ग व कामकरी वर्ग यांच्या दरम्यानचा दर्जा द्यावा लागेल. त्यांच्यामध्ये कामकऱ्यांचे प्रमाण कमी असल्याने एकंदर रशियामधील आंदोलनात जितका दृढनिश्चयीपणा दिसून आला, त्यामानाने थोडाही या सैनिकांच्या बंडामध्ये दिसत नाही. सोशल डेमोक्रॅट पक्षाचे सभासद बनल्यामुळे कामगारांनी आपल्या पक्षाबद्दल इतकी वर्गजागृतीची निष्ठा दाखविली की हा प्रकार एकाएकी घडून कसा आला असे लोकांना आश्चर्य वाटेल. त्या निष्ठेशी तर सैनिकांच्या बंडामधील शिस्तीची


तुलनाही करता येत नाही. परंतु ऑफिसरांनी योग्य मार्ग न दाखविल्यामुळे ती बंडे मोडली गेली असा निष्कर्ष मात्र काढता येणार नाही. उलट, आजपर्यंत 'मुक्या जनावरा'प्रमाणे वळवता येणारे हे शिपाईगडी आता स्वतंत्र अस्तित्व पटवून देत होते व त्यामुळे लिबरल जमीनदार व लिबरल ऑफिसरांची पाचावर धारण बसली होती. सैनिकांनी आपल्या बंदुका आपल्या ऑफिसरांच्यावर रोखल्या. ह्यावरून उघड दिसते की, ''नारोडनाया व्होल्गा''च्या काळानंतर क्रांतीच्या मार्गावर जनतेने कितीतरी लांब पल्ला गाठला आहे. शेतकऱ्याला मुख्यत: जमीन पाहिजे होती व जमिनीचे नाव काढताच डोळे आशेने चमकू लागत, आणि त्याला शेतकऱ्याच्या ध्येयाबद्दल सहानुभूती होतीच. कित्येकदा या बंडामध्ये अशी वेळ आली की काय हवे ते ठरविण्याइतकी ताकद सैनिकांच्या हाती आली; पण हाती आलेल्या या शक्तीचा नीट खंबीरपणे उपयोग करण्याइतके परिस्थितीचे भान त्यांना राहिले नाही. सैनिकांनी नेहमी ढिलाई दाखविली. एखाद्या फारच दुष्ट ऑफिसरला ठार करावयाचे आणि थोड्याच दिवसांत, केव्हा केव्हा तर थोड्या तासांनी, बाकीच्या ऑफिसरांना सोडून द्यावयाचे व वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बोलणी सुरू करावयाची असला प्रकार सैनिकांनी केला. मग बिचारे निमूटपणे फासावर लटकत, फटक्यांचे वार हूं की चूं न करता सोशीत व पुनश्च आपल्या जुन्या जोखडाखाली मान देत. लियो निकोलायेव्हिच टॉलस्टॉय महर्षीचा उपदेश अगदी मन:पूर्वक आचरणात आणावयाचा म्हणजे तरी काय? हेच! अनेक शतके घुमसत राहिलेला त्वेष, जास्त चांगल्या जीवनाची तीव्र आकांक्षा व जुन्या खोड्यातून बाहेर पडण्याची धडपड, या सर्वांचे प्रतीक म्हणजे टॉलस्टॉय; तसेच ग्रामीण जनतेची क्रांतीच्या बाबतीत आढळणारी पोचट मनोवृत्ती, राजकारणातील नवशिकेपणा, मनोराज्ये पाहात बसण्याचा खोटेपणा व कच्चेपणा यांचाही टॉलस्टॉय हा मूर्तिमंत पुतळा आहे. ऐतिहासिक व आर्थिक परिस्थिती पाहून हे सांगता येते की, क्रांतिकारक उठावाचा हा प्रयत्न जनतेकडून होणारच होता; परंतु त्याच दृष्टीने हेदेखील ओळखले पाहिजे, की या लढायांमध्ये यशासाठी आवश्यक तयारी जनतेची नव्हती; आणि हेही पाहिले पाहिजे की, क्रांतीच्या सुरुवातीच्या चकमकीतील अपयशाला मुख्यत: कारणीभूत झालेली 'प्रतिकार शून्याची' टॉलस्टॉयची शिकवणही त्याच परिस्थितीतून जन्माला आली.

लढाई केलेल्या सैन्याला लष्करी डावपेच नीट शिकविता येतात, अशी म्हण आहे. एखाद्या क्रांतिकारक वर्गाची सैन्याशी तुलना करता येईल; पण अर्थातच ढोबळमानाने कोट्यवधी शेतकऱ्यांना सरंजामदारी जमीनदार व त्यांची झारशाही यांच्याबद्दल वाटणाऱ्या त्वेषाने संघटित केले होते. तिकडे भांडवलदारी समाजव्यवस्थेमध्ये दर घटकेला जास्तच अनावस्था माजल्याने या शेतकऱ्यांची दु:स्थिती एकसारखी आणखी दु:सह होत गेली. याचा परिणाम असा झाला की, क्रांतिकारक लोकसत्ताक लढ्यामध्ये हे शेतकरी सामील झाले. शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनातदेखील जुनाट ग्रामसंस्थेची घडी विस्कटून पैशाचे व्यवहार वाढले. बाजारपेठेवर जास्तीतजास्त विसंबून राहावे लागू लागले; तसेच पैसे जवळ बाळगणाऱ्यांच्या हाती सर्व जाऊ लागले. अर्थातच जुन्या घडीशी जुळणारी टॉलस्टॉयची तात्त्विक विचारसरणीही मागे पडू लागली. क्रांतीच्या पहिल्या प्रयोगातील अनुभव, विशेषत: जनतेच्या क्रांतिकारक लढ्यात काहीवेळा घ्यावी लागलेली माघार, वाया गेली असे नाही. त्यामुळे एक गोष्ट निश्चितपणे घडून आली. आतापर्यंत जनतेमध्ये डळमळीतपणा व भोंगळपणा होता तो या पराभवामुळे साफ गेला. आता सारे फरक व मतभेद स्पष्ट उजेडात दिसू लागले आहेत. अमुक वर्ग म्हणजे त्यांची वाणगूक कशी व त्याच्या मर्यादा कोणत्या, हे कळून आले आहे. तेच राजकीय पक्षासंबंधाने. आता स्टॉलिपिनच्या या कारकिर्दीत त्याच्या सोटेशाहीमुळे एक निश्चित होईल की लोक जास्तजास्त शिकतील व क्रांतिकारक सोशल डेमॉक्रॅटिक पक्षाच्या बिनचूक व खंबीर प्रचारकार्यामुळे केवळ समाजवादी कामगार वर्गातूनच नव्हे तर लोकशाहीसाठी लढणाऱ्या शेतकरी वर्गातूनही असे खंबीर, अनुभवी व शूर कार्यकर्ते निघतील, की एका ऐतिहासिक अवस्थेत आपल्याला भोवलेल्या टॉलस्टॉयच्या घातुक तत्त्वज्ञानामुळे त्यांचा बुद्धिभेद होणेच अशक्य होईल.

'प्रोलेतारी' १, अंक ३६, ११ सप्टेंबर १९०८.

(लेनिन यांच्या या लेखाचा हा मराठी अनुवाद प्रा.दि.के.बेडेकरांनी केला असून तो त्यांच्या 'धर्म' या पुस्तकात प्रसिद्ध झाला आहे.)

❋ ❋



''आदरणीय लिओ टॉलस्टॉय,

सादर प्रणाम,

... मला आपला सहवास लाभला असता, आपणाशी बोलायला मिळाले असते, तर ते माझे परमभाग्य झाले असते, परंतु आपले निधन झाल्यानंतर माझा जन्म झाला, त्यामुळे ते शक्य झाले नाही. असे असले तरी आपले व्यक्तिमत्त्व आणि विचार स्थलकालातीत आहेत; त्यामुळे आपण आज हयात नसलात तरी माझ्यासारख्या साधकाला आपणापासून प्रकाश मिळतो आणि चैतन्यही लाभते. त्यामुळेच मी आपणाशी पत्रव्यवहार करणार आहे.

आपणास जगातून अनेकजण पत्रं लिहीत असत आणि आपण सर्व पत्रांची दखल घेऊन, बऱ्याच पत्रांना उत्तरे लिहीत होतात. हे माहीत असल्यामुळेच मी आपणास काही पत्रं लिहिणार आहे. आपल्या उदात्त जीवनाशी माझा जो भावबंध आहे, त्यामुळेच मला हे करावेसे वाटते. या पत्रांमुळे हा भावबंध अधिक दृढ होईल आणि माझ्या जीवनाच्या या संध्यासमयी तो मला मोठा आधार वाटेल.''

आपला नम्र,